# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९८ |
| वर्ष | : | तिसरे |
| अंक | : | ५ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**"ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : २५**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक
# दिशा
वर्ष तिसरे / अंक ५ / नोव्हेंबर १९९८



## संपादकीय

### धर्मप्रसार

पश्चिमेकडील युरोपियन राष्ट्रांमध्ये १६व्या शतकामध्यें वैज्ञानिक क्रांतीला सुरुवात झाली. युरोपमध्ये १५व्या शतकापर्यंत सृष्टिरचनेची कल्पना आणि सामाजिक संस्थांची बांधणी, प्रामुख्याने बायबल आणि ॲरिस्टॉटलच्या सिद्धांतावर आधारित होती. या संकल्पनांना पहिला धक्का १६व्या शतकात लागला. तो धक्का कोपर्निकस यानी सृष्टिरचनेच्या बाबतीत आपल्या सूर्यकेंद्रित सिद्धांताने दिला. यामुळे पृथ्वी हा सृष्टीचा मध्यबिंदू नसून सूर्याभोवती फिरणाऱ्या अनेक ग्रहांपैकी तो एक ग्रह आहे हे मांडले गेले. मानवाच्या आणि सृष्टीच्या निर्मितीबाबतीत बायबलने मांडलेल्या अनेक कल्पनांना धक्का बसला. यामुळेच कोपर्निकसच्या सिद्धांताला ख्रिस्तीधर्म मार्तंडांचा विरोध होणे साहजिक होते. १५४३ साली कोपर्निकसचे निधन झाले. पुढे इटालीमध्ये गॅलिलिओने आपल्या दुर्बिणीने आकाशाचे निरिक्षण करून कोपर्निकसच्या सिद्धांतांना पुष्टी दिली. गॅलिलिओला यामुळे धर्मबाह्य करण्यात आले. पुढे बेकन, देकार्त, न्यूटन यांनी या नविन वैज्ञानिक प्रगतीमध्ये भर घालून युरोपमधील औद्योगिक क्रांतीचा पाया घातला.

सर्वच आघाड्यांवर युरोपमध्ये यावेळी बदल घडत होते. अनेक साहसी आणि धाडशी व्यक्तींनी युरोपबाहेरील अनेक देशांना भेटी द्यायला सुरवात केली. वास्को-द-गामाचा भारताचा प्रवास, कोलंबसचा अमेरिकेचा शोध ही या साहसी वृत्तीची बोलकी उदाहरणे आहेत. युरोपीय विज्ञान आणि ख्रिस्ती धर्म यांचा जगभर जो प्रसार झाला त्याला आणखी एका घटकाचे फार मोठे सहाय्य झाले. तो घटक म्हणजे ख्रिस्ति धर्म प्रसारकांचा. जगाच्या जवळ जवळ सर्व कानाकोपऱ्यांमध्ये हे धर्मप्रसारक पोचले. आशिया, आफ्रिका, दक्षिण अमेरिका हे सर्व खंड त्यांनी पादाक्रांत केले. त्या काळात प्रवास आजच्यासारखा सोपा नव्हता. भारतामध्ये पोचायला कित्येक महिने लागायचे. शेकडोंनी असे धर्मप्रसारक वाटेतच प्रतिकूल परिस्थितीला बळी पडून गतप्राण झाल्याची नोंद आहे. एवढ्या मोठ्या दिव्यातून पार पडल्यावर सुद्धा नवीन देशातील हवामान, अन्न, भाषा आणि चालीरीती हे सर्वच त्यांना नविन व प्रतिकूल असे, तरीही अत्यंत मेहनतीने, चिकाटीने ते धर्मप्रसारक आपले धर्मप्रसाराचे कार्य करित राहीले. नविन जागातील समाजाच्या चालीरीती, वेषभूषा, भाषा, धर्मविषयक संकल्पना या सर्वांचाच त्यांनी अभ्यास चालू केला. ही गोष्ट दिसते किंवा वाटते तेवढी सोपी नाही. प्रचंड त्याग, मेहनत आणि चिकाटीची आवश्यकता या करिता लागते, हे धर्मप्रसारक नुसतेच भाषा शिकले असे नाही तर त्यांनी चिकित्सेने त्या भाषेचा अभ्यास केला. पुढे तर त्यांनी त्या त्या भाषेचे व्याकरण लिहिले. मराठी, कानडी, बंगाली, कोकणी आणि तामीळ या सर्व भाषांची पहिली व्याकरण ख्रिस्ति धर्मप्रसारकांनी लिहिली आहेत. भाषेबरोबरच चालीरीती, धर्मसंकल्पना यांचाही त्यांनी प्रचंड अभ्यास केला. अनेक संस्कृत ग्रंथ आणि साहित्य आज आपल्याला या धर्मप्रसारकांनी जपून ठेवले म्हणून उपलब्ध आहेत. संस्कृत भाषेचा तर त्यांनी केलेला अभ्यास आपल्या सर्वांना ठाऊक आहे.

याचाच परिणाम म्हणून आपल्या भाषेपासून तत्त्वज्ञानातील गहन सिद्धांतापर्यंत सर्वच गोष्टींचा अभ्यास आज आपल्याला त्यांनी लिहून ठेवलेल्या साधनसामुग्रीतून करावा लागतो.

समाजामध्ये आपली अभ्यासू, मानवतावादी आणि मवाळ अशी प्रतिमा यामुळे या धर्मप्रसारकांची निर्माण झाली. या धर्मप्रसारकांना दुसऱ्याच्या धर्मातील, चालीरीती मधील वैगुण्ये मिळवण्यास त्यांच्या या अभ्यासाचा चांगलाच उपयोग झाला. धर्मपरिवर्तनाकरिता याचा चांगलाच वापर करण्यात आल्याचे इतिहास साक्ष देतो. लोकांचे अज्ञान, गरीबी याचा फायदा घेऊन पुढे या देशामध्ये मोठ्या प्रमाणावर धर्मपरिवर्तन करण्यात आले. अनेक क्रूर आणि असंस्कृत मार्ग या धर्मप्रसारकांनी वापरले. तरीही आज जनमानसामध्ये त्यांची प्रतिमा ही अभ्यासक म्हणूनच जिवंत आहे. धर्मप्रसारामधील एक मोठे युद्ध त्यांनी आपल्या या नीतीने झिंकले आहे. पैसा, प्रसारमाध्यमे आणि नियोजन यांचा अतिशय चांगला वापर यांनी करवून घेतला. धर्माच्या नावाखाली इतका मोठा 'अधर्म' शिताफीने वापरल्याची जगात कमी उदाहरणे आहेत.

फादर हेन्रिच रॉथ (Father Heinrich Roth 1620-1668) हा असाच एक धर्मप्रसारक. त्याचा जन्म डिलिंगन (Dillingen) येथे १८ डिसेंबर १६२० मध्ये झाला. त्याच्या वडिलांचा वकिलीचा व्यवसाय होता. डिलिंगनला १५५४ साली विद्यापीठ स्थापन झाले. कला, विज्ञान, साहित्य या सगळ्या विषयांचा अभ्यास तेथे होत असे. रॉथही याच विद्यापीठात शिकला. रॉथचा पिंडच सुरुवातीपासून वेगळा होता. त्यावेळी तेथे युद्ध नुकतच संपुष्टात आले होते. लढाई आणि लष्कराचा रॉथला उबग आला होता. सुरवातीला त्याला जरी स्विडनच्या सेनेमध्ये सामील व्हायला लागले तरी तेथून तो पळाला आणि इन्सब्रुकला स्थाईक झाला. तिथेच धर्मप्रसाराच्या कार्याकडे तो अकर्षित झाला. १६३९ साली तो जेझुईट पंथामध्ये सामील झाला. सुमारे १० वर्षांनंतर त्याला धर्मगुरुपद बहाल करण्यांत आले आणि धर्मप्रसाराकरिता बाहेर पडण्याचा त्याने निश्चय केला. १६५० मध्ये आपल्या एका सहकाऱ्याबरोबर रॉथ ईथियोपियाला गेला. तेथे पोचल्यावर त्यांच्या लक्षांत आले की ईथियोपियामध्ये ख्रिस्तिधर्मप्रसारावर त्यावेळी बंदी होती. त्यामुळे रॉथने गोव्याला प्रयाण केले व १६५२ मध्ये गोव्याला पोचला. गोव्याला आल्या आल्या त्यानी तेथील भाषा आत्मसात करायला सुरवात केली. त्यावेळी आग्र्याला जेझुईट पंथांचे एक शिक्षण केंद्र होते. रॉथ गोव्याहून आग्र्याला आला व त्या केंद्राच प्रमुख बनला. आग्र्याच्या दरबारात त्याची डॉक्टर म्हणूनही नेमणूक झाली. आग्र्यालाच रॉथ पंडितांकडे संस्कृत शिकू लागला आणि लवकरच त्याने ती भाषा चांगल्याप्रकारे आत्मसात केली. रॉथ हा पहिला युरोपियन की ज्यानी संस्कृतवर प्रभुत्व मिळवले. संस्कृत सारखी प्रगत भाषा युरोपमधील पंडितांना समजावी म्हणून त्याने चक्क संस्कृतचे व्याकरण लिहायला सुरवात केली. आणि लौकरच त्यांने पाणिनियन सूत्रांवर आधारित संस्कृतचे लॅटिनमध्ये व्याकरण लिहिले. अर्थातच तो संस्कृतचे युरोपियन भाषेमध्ये व्याकरण लिहणारा पहिला युरोपियन ठरला. संस्कृतभाषा अवगत झाल्यावर त्यांने हिंदुतत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला सुरवात केली. 'वेदांत सार' आणि वेणीदत्ताच्या 'पंचतत्त्वप्रकाश' या ग्रंथांचेही त्याने हस्तलिखित तयार केले. १६६२ मध्ये आणखी दोन जेझुईस्ट धर्मप्रसारक चीनहून तिबेटमार्गे आग्र्याला पोचले. यातला एक धर्मप्रसारक प्रवासामुळे एवढा थकला की त्याचे आग्र्यालाच निधन झाले. दुसरा धर्मप्रसारक म्हणजे प्रसिद्ध अभ्यासक ग्रुबर (Grueber) हा होय. ग्रुबरने तिबेटवरती फार मोठे संशोधन करुन ठेवले आहे. त्या काळांत ग्रुबेरनी ४०,००० किलो मीटरचा पायी प्रवास धर्मप्रसारासाठी केला होता. ग्रुबर आणि रॉथ दोघेही आग्र्याहून पुन्हा रोमला आले. त्यांच्या प्रवासास सुमारे एक वर्ष लागले. पुन्हा दोघांनाही रोममधून धर्मप्रसाराकरिता भारतात पाठविण्यात आले. रॉथ १६६६ मध्ये आग्र्याला परत पोचला आणि दोन वर्षांनी तिथेच त्याचे निधन झाले. रॉथच्या संस्कृत्या व्याकरणाचे युरोपमध्ये चांगले स्वागत झाले आणि अनेक अभ्यासकांनी ते प्रकाशित व्हावे अशी इच्छा व्यक्त केली. पण त्यावेळी ते प्रकाशित होऊ शकले नाही. नंतर सुमारे २०० वर्षे हे हस्तलिखित कुठे आहे याची माहितीच नव्हती. १९६० नंतर पाश्चात्य अभ्यासकांनी पुन्हा एकदा याचा शोध घ्यायला सुरवात केली. अर्नल्फ कॅम्प्स (Arnulf Camps) या डच संशोधकाला १९६७ साली रोम येथील पोपच्या ग्रंथालयामध्ये ते सापडले. या अभ्यासकालाही त्याचे प्रकाशन करायला २० वर्षे थांबायला लागले. आणि १९८८ साली हॉलंड मधल्या इ.जे.ब्रिल (E.J. Brill ) या कंपनीने ते इंग्रजीमध्ये प्रकाशित केले.

आजची आपली परिस्थिती पाहता आपण इतिहासापासून कोणतेच धडे घ्यायला तयार नाही असे दिसते.

(पान क्र. ८ वर)

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष तिसरे / अंक ५ / नोव्हेंबर १९९८

**संपादक**
डॉ. विजय वा. बेडेकर

**सहसंपादक**
श्री. प्रकाश ल. वैद्य

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

**वार्षिक देणगी**
रु. २०० / -

**मुद्रक :**
परफेक्ट प्रिण्टर्स
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) | सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) | भारतीय मूर्तीशिल्प(२) मूर्तीसाठी उपयुक्त शिळा | डॉ. र.पु. कुलकर्णी | ५ |
| ४) | भारतीय मूर्तीशिल्प(३) मूर्तीसाठी उपयुक्त लाकूड | डॉ. र.पु. कुलकर्णी | ९ |
| ५) | मौखिक परंपरेत पुस्तकांचे महत्व | श्री. प्रदीप कर्णिक | १२ |
| ६) | "पुरभिलेखाचा अभ्यास" | डॉ. संजीव देसाई | १९ |
| ७) | पुराणकालीन परराष्ट्रधोरण | श्री. ग.वा. तगारे | २४ |
| ८) | समान नागरी कायदा आवश्यक की अनावश्यक ? | श्री. गणेश खराडे | ३० |
| ९) | ग्रंथालय कायदे आणि सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास काही वस्तुस्थितींचे निर्देशन | प्रा. मोहन पाठक | ३२ |
| १०) | मला आवडलेले पुस्तक | श्री. गणेश खराडे | ३४ |
| ११) | महाविद्यालयीन वार्ता | प्रा. मोहन पाठक | ३८ |

# लेखक - परिचय

१. ***डॉ. विजय वा. बेडेकर***
वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. ***प्रा. (डॉ) मोरेश्वर वि. पराडकर***
संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधूननिवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती; संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. ***श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी***
अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

४. ***श्री. प्रदीप कर्णिक***
मुंबईच्या रुपारेल महाविद्यालयामध्ये ग्रंथपाल. वाचन, ग्रंथव्यवहार व प्रकाशन यांचा गाढा अभ्यास. महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, दैनिकांतून ग्रंथ वग्रंथालय चळवळ यावर भरीव लेखन. संदर्भ प्रकाशन या स्वतःच्या प्रकाशन संस्थेद्वारा अनेक दर्जेदार ग्रथांचे प्रकाशन. मारठी साहित्य व ग्रंथालय शास्त्र यांचा व्यासंग, अघापन.

५. ***डॉ. संजीव देसाई***
निवृत्त अधिकारी, पुराभिलेख, महाराष्ट्र शासन. अनेक संशोधन लेख प्रकाशित आणि अनेक पुस्तके प्रकाशित.

६. ***श्री. ग. वा. तगारे***
संस्कृत व प्राकृतचे गाढे अभ्यासक. अनेक पुराण ग्रंथांचे संपादन. अनेक संशोधन पत्रिकांमधून विपूल शोध निबंध प्रकाशित.

७. ***श्री. गणेश खराडे***
तृतीय वर्ष, के.ग. जोशी कला महाविद्यालय, ठाणे. वकृत्व व निबंध स्पर्धेमध्ये सहभाग.

८. ***प्रा. मोहन पाठक***
गेली २०-२२ वर्षे वि.प्र. मंडळाच्या बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सेवा, मराठी व ग्रंथपालन शास्त्राचे गेली १६ वर्षे अध्यापन. मुंबईच्या साहित्य संघातून 'साहित्य विशारद' ही पदवी प्राप्त. १९७५ पासून सातत्याने अनेक नियतकालिकांतून विविध विषयांवर विपुल लेखन. ठाण्यातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक संस्थांशी घनिष्ठ संबंध.

# सुभाषित

बहूनामप्यसाराणां संहतिः कार्यसाधिका।
तृणैर्विधीयते रज्जुर्यथा नागोऽपि बध्यते ॥१॥

मोक्षस्य न हि वासोऽस्ति न ग्रामन्तरमेव वा।
अज्ञानहृदयग्रन्थिनाशो मोक्ष इति स्मृतः ॥२॥

ब्रह्मघ्ने च सुरापे च चौरे भग्नव्रते तथा।
निष्कृतिः विहिता लोके, कृतघ्ने नास्ति निष्कृतिः ॥३॥

यावत् वित्तो पाजत्तनसक्ता वत्रिजपरिवारो रक्तः।
पश्चात् जर्जरभूते देहे वार्ता कोऽपि न पृच्छति लोके ॥४॥

प्लवो नदीनां पतिरङ्गनानां राजाच सद्वृत्तरतः प्रजानाम्।
धनं नराणां क्रतवस्तरूणां गतं गतं यौवनमानयन्ति ॥५॥

पिता रक्षति कौमारे भर्ता रक्षति यौवने।
पुत्रश्च स्थाविरे भावे न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति ॥६॥

**डॉ. मो. दि. पराडकर**

असार म्हणजे सारहीन किंवा दुबळे, असमर्थ पुष्कळ लोक असतात हे खरे परंतु त्यांची संख्या जर बरीच झाली आणि ते एकत्र आले म्हणजेच त्यांची एकी (संहति) झाली तर मात्र मोठे कार्यही करू शकते. लोकशाहीत तर हा अनुभवाचा विषय झालेला आहे. कुठल्याही कार्यालयात चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी म्हणजे असमर्थ, दुबळे, त्यांच्याकडून सर्वांनी काम करून घ्यावयाचे असते; परंतु हे सर्व एक झाले, म्हणजे आजच्या परिभाषेत त्यांची संघटना तयार झाली तर आणि त्यांनी 'संहति' करून संप केला तर काय होते हे सर्वांना माहीत झालेले आहे. हीच गोष्ट जुन्या काळी सुभाषितकाराने व्यवहारातले उदाहरण घेऊन सांगितली. तृण म्हणजे साधे गवत त्याला काय किंमत ? परंतु त्याच गवताची दोरी (म्हणजे रज्जू) वळली तर ती हत्ती सारख्या बलाढ्य किंवा सशक्त पशूलाही बांधू शकते. तुच्छ किंवा नगण्य गवतापासून म्हणजेच गवत एकत्र आणून त्याची दोरी केली तर हत्तीला बांधून ठेवण्याचे मोठे कार्य होऊ शकते. प्रश्न दुबळेपणाचा नाही; दुबळ्यांनी एकत्र येण्याचा आहे. 'संहितः कार्यसाधिका' याचेच इंग्रजी रूपांतर 'United we stand; Divided we fall' या गाजलेल्या शब्दांत झालेले आहे. अनेक लोक विशिष्ट हेतूने एकत्र आले तर, अशक्य वाटणारे कार्यही होऊ शकते याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.

२. मोक्ष हा सर्वांना हवा असतो, वेदान्ती त्याचे समर्थक आहेत, बौद्ध त्याला निर्वाण असे नाव देतात तर सांख्य त्याला कैवल्य म्हणतात. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात न जाताही मोक्षाचे स्वरूप या सुभाषितात सहजपणे सांगितले. अज्ञानाच्या हृदयातल्या ग्रंथींचा, गाठींचा नाश म्हणजे मोक्ष असे सांगून त्याची आवश्यकता पटवून दिलेली आहे. पहिल्या ओळीत, मोक्षाचे वेगळे घर नसते आणि मोक्ष मिळवणे म्हणजे निराळ्या गावाला जावे लागत नाही तो 'याचि देही आणि याचि डोळा' मिळू शकतो. वस्तुतः मोक्ष म्हणजे सुटका. 'मुच' धातूपासून झालेले हे नाम. अज्ञानापासून सुटका म्हणजेच मोक्ष. तत्वज्ञानात मोक्ष म्हणजे 'पुनरपि जननं पुनरपि मरणम्' म्हणजे जन्म आणि मरण यांपासून मुक्तता. यालाच मुक्ती असे म्हणतात. ही मुक्ती मिळवण्यासाठीही ज्ञानाची म्हणजे अज्ञानाची मनावर चढलेली पुटे काढून टाकावी लागतात. तेव्हा या सुभाषितात सांगितलेली मोक्षाची कल्पना मूलतः खरीच आहे.

३. या श्लोकातला व्यवहारिक उपदेश महत्त्वाचा आहे. साधारणपणे प्रत्येक पापाला प्रायश्चित्त आहे. ब्रह्मघ्ने म्हणजे ब्रह्महत्या; ब्राह्मणाची हत्या करणाऱ्याच्या ; सुरापे म्हणजे दारु पिणाऱ्याच्या; चौरे म्हणजे चोराच्या बाबतीत आणि भग्नव्रते म्हणजे एखादे स्वीकारलेले व्रत करण्यात खण्ड पडलेल्या किंवा व्रतभंग झालेल्या व्यक्तीच्या बाबतीत निष्कृती म्हणजे प्रायश्चित्त आहे आणि हे 'विहित' म्हणजे शास्त्रात सांगितलेले अहे. या सर्वांपेक्षाही अधिक अपराधी म्हणजे केलेल्याची जाणीव पुसून टाकणारी कृतघ्न व्यक्ती. याच्या बाबतीत मात्र प्रायश्चित्त नाही असे सांगून या सुभाषितकाराने भारतवर्षाच्या मुळात असलेल्या नैतिकतेला स्पर्श केला असे म्हणणे योग्य ठरेल. प्रायश्चिताचा संबंध चित्ताशी म्हणजे मनाशी आहे. ब्रह्मघ्न, सुराप, चौर आणि भग्नव्रत यांच्या हातून चूक घडली हे खरे आणि चुकीला आयुष्यात दण्ड झाला पाहिजे, परन्तु साधारणपणे मनाने या व्यक्ती मुळात चांगल्या असतात म्हणून त्यांच्या बाबतीत प्रायश्चित्त किंवा दण्ड उपयोगी ठरतो; परंतु कृतघ्नता ही मनालाच लागलेली कीड आहे; यावर उतारा कसा

मिळणार? साहजिकच कृतघ्नता हे फार मोठे पाप असे या सूक्तिकाराचे म्हणणे पटण्यासारखेच आहे. ब्रह्मघ्न या शब्दाचे अधिक स्पष्टीकरण आवश्यक : ब्राह्मणाचा वध हे पाप; मग एखाद्या दुसऱ्या वर्णातल्या किंवा वर्गातल्या व्यक्तीला (म्हणजे क्षत्रियाला, वैश्याला किंवा शूद्राला) मारणे हे पाप मानले नाही का ? वस्तुतः तसे नाही, ब्राह्मणाला समाजात पूर्वी ज्ञान मिळवण्याचे आणि देण्याचे व्रत स्वीकारल्यामुळे मान होता. त्याचा वध करणे हे समाजाने ज्याला ज्ञाननिधी होऊ दिले त्याची हत्या म्हणून अधिक निंद्य हा भावार्थ.

४. हा श्लोक श्रीशंकराचार्यांच्या सुप्रसिद्ध चर्पटपञ्जरी स्तोत्रातला. जोपर्यंत व्यक्ती धनार्जन करण्यात मग्न असते तोपर्यंतच त्याचा स्वतःचा परिवार त्याच्यावर प्रेम करतो, त्याच्या भोवती पिंगा घालतो हे व्यवहारात खरेच आहे. तूर्त हे अधिकाधिक तीव्रतेने पटू लागलेले आहे. नंतर एकदा देह जर्जर झाला की मग त्याच्याच घरात त्याची वास्तपुस्त करणारे कोणी राहत नाही, त्याची अडचण होऊ लागते; त्याला टाळण्याचे प्रयत्न केले जातात. ज्या काळात हा श्लोक लिहिला गेला त्यावेळी हा प्राधान्याने वेन्दान्तातला विचार होता. गृहस्थाचे काम होते पैसे मिळवून घर चालवणे; तेच होईनासे झाले म्हणजे गरज संपल्यासारखे त्या काळीही होत असले पाहिजे. एका दृष्टीने ते स्वाभाविक. आज तर तेच स्वाभाविक कारण 'धनान्यर्जयध्वम्' चा उद्घोष होऊ लागलेला आहे. उपनिषदात म्हटलेले आहे 'न वा अरे पत्युः कामाय पतिः प्रियो भवति, आत्मनस्तु कामाय पतिः प्रियो भवति' 'पतीसाठी तो प्रिय नसतो, स्वतःसाठी असतो' हे तत्त्वतः खरे आहे. या श्लोकातले चित्र आज अनेक कुटुंबात बघायला मिळते; कारण पैशाला आज नको तितके महत्त्व आलेले आहे. म्हणून हा श्लोक सुभाषितासारखाच झाला . तो संन्यास घेतलेल्या शंकराचार्यांनी लिहावा यावरून ते संन्यासी असले तरी लौकिकज्ञ होते, व्यवहार जाणणारे होते हे उघड आहे.

५. या श्लोकात, गेलेले यौवन परत मिळवून देणाऱ्या वस्तूंची दैनंदिन व्यवहारातील मनोरंजक यादी दिली आहे. नद्यांना पूर आला, स्त्रियांना पती मिळाला, प्रजेला चांगल्या वागण्याबद्दल आस्था असणारा राजा मिळाला, लोकांना पैसा मिळायला लागला आणि झाडांना योग्य ऋतू आला म्हणे या सर्वांचे गेलेले तारुण्य पुन्हा येते. नष्ट झालेला उत्साह पुन्हा जागृत होतो. यात 'सद्वृत्तरतः राजा' प्रजेला उत्साह पुन्हा आणून देतो, हे सांगून सुभाषितकाराने जाता जाता राजा आणि प्रजा यांच्या चांगल्या संबंधावर भर दिला हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

६. मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायातला हा तिसरा श्लोक; मनूवर आगपाखड करणाऱ्या बुद्धिवाद्यांचे ब्रह्मास्त्र. यात स्त्रीचे संरक्षण कोमार्यात तिचा पालक (पिता) करतो. तारुण्यात ते काम पतीचे तर म्हातारपणात ते कर्तव्य मुलाचे असे म्हटलेले आहे. किंबहुना कन्या, पत्नी आणि माता या अवस्थांतल्या स्त्रीच्या संरक्षणाची जबाबदारी मनूने पुरुषावर टाकलेली आहे. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या शब्दांचा अर्थ संदर्भाशिवाय लावला जातो आणि मनूने स्त्री स्वतंत्र होण्यास योग्य नाही असे म्हणून तिला घरातच डांबून टाकली असा सोईस्कर परंतु चुकीचा अर्थ सर्रास केला जातो. वस्तुतः संरक्षणाशिवाय स्त्रीला एकटे राहू देऊ नये असे म्हणणारा मनू इसवी सनापूर्वी दुसऱ्या किंवा इसवी सनानंतरच्या दुसऱ्या शतकातल्या स्त्रीच्या शीलाच्या संरक्षणाची जबाबदारी तिच्या तुलनेने बलवान् असणाऱ्या पुरुषावर टाकीत होता. त्याला स्त्रियाही कराटेच्या वर्गात जाऊन संरक्षण करू शकतील याची कल्पना येणे शक्य नव्हते. तिचे घरातले हक्क कायम होते; किंबहुना विशिष्ट काळापर्यंत वाट बघून कुमारींनी स्वतः आपल्या विवाहाची व्यवस्था करावी असे म्हणणारा मनू तिला योग्य ते स्वातंत्र्य देण्याचा आग्रह धरणारा होता. घरातला पैशाचा व्यवहार पुरुषाने तिच्यावरच सोपवावा असे आवर्जून म्हणतो. शारीरिक बळाच्या दृष्टीने मात्र पुरुष तिच्यापेक्षा उजवा आणि तिच्या शीलावर पुरुषाने बळाने घाला घालू नये म्हणून तिच्या रक्षणाचे कर्तव्य पुरुषावर त्याने सोपवले. आजही पुरुषाच्या तुलनेने शारीरिक शक्तीत स्त्री कमी पडते, हे खरेच आहे ना ? अगदी कराटे शिकलेली स्त्रीही कराटे प्रवीण असलेल्या पुरुषाच्या तुलनेने कमीच ठरते. फार कशाला ? पाश्चात्य जगतातही स्त्रियांचे टेनिस आणि पुरुषांचे टेनिस यांत फरक असतोच. मानसिक दृष्ट्या तिची तुलना मनूने केलेली नाही. तेव्हा' स्त्रीच्या स्वातंत्र्याशी या श्लोकाचा संबंध नाही'. पण लक्षांत कोण घेतो ? • • •

# भारतीय मूर्तिशिल्प(२)
# मूर्तीसाठी उपयुक्त शिळा

डॉ. र. पु. कुलकर्णी

देवादिकांच्या मूर्ती शिळेतून तयार करतात. लाकडाचा तसेच मातीचा वापर करूनही देवमूर्ती तयार करतात. त्याचप्रमाणे चुना तसेच धातूंपासूनही मूर्ती तयार करतात. याबद्दलची अगदी प्राथमिक स्वरूपाची माहिती, पहिल्या लेखांकात, मूर्तीचे त्या ज्या पदार्थांच्या केल्या ओत त्यानुसार वर्गीकरण करताना दिली आहे. हे जे निरनिराळे पदार्थ देवमूर्ती घडविण्यासाठी वापरतात ते पदार्थ उत्कृष्ट असले पाहिजेत. देवमूर्ती चिरंतन काळापर्यंत अभंग असावयास हवी. यासाठी चांगल्या शिळेची लाकडाची, वगैरेंची वैशिष्टी (Specification) शिल्पशास्त्राच्या पुस्तकांत दिलेली असते.

**मूर्तीसाठीच्या शिळेची वैशिष्टी :**

ही वैशिष्टी देताना केवळ शिळेच्या मजबुतीकडेच लक्ष दिले जात नाही तर शुभाशुभ गोष्टींचा देखील विचार केला जातो. उत्तम शिळेची सर्व लक्षणे असलेली एखादी शिळा असेल पण ती स्मशानापाशी किंवा बुद्धांच्या चैत्यापाशी, म्हणजे समाधिस्थळी किंवा चाण्डाळांच्या वस्ती जवळ असेल तर ती त्याज्य समजतात. मूर्तीसाठी शिळा निवडावयाची म्हणजे ती सर्व दृष्टीने उत्तम असली पाहिजे हा कटाक्ष ठेवला गेला आहे. यासाठी शिळा ही डोंगर, पर्वत, समुद्र किंवा नदीचा किनारा, तीर्थक्षेत्र किंवा जंगल तसेच क्षीरवृक्षाजवळ असेल तर चांगली समजतात. याउलट जेथे चाण्डाळ, मच्छीमार, भंगी वगैरे लोकांची वस्ती आहे; जेथे खूप मुंग्या किंवा कीटकांची वस्ती आहे; स्मशान, चैत्यमंदिर तसेच कबरस्तान वगैरे ठिकाणी असलेली शिळा त्याज्य समजतात. जेथे जमीन दलदलीची आहे, जिच्यात क्षारांचे प्रमाण जास्त आहे, जिला दुर्गंध येतो आहे किंवा ज्या जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण बरेच आहे (peat), अशा ठिकाणचे दगड देवमूर्ती घडविण्यास वापरू नयेत. दलदलीची, अति क्षार असलेली जमीन, दुर्गंधयुक्त जमीन वगैरे प्रकारच्या जमिनीत गाडल्या गेलेल्या शिळा या पाण्यामुळे तसेच सेंद्रिय पदार्थांमुळे अपक्षीण झालेल्या असतात; म्हणून अशा शिळा देवमूर्ती घडविण्यासाठी अयोग्य समजतात.

**शिळांचे वर्गीकरण :**

एखादी शिळा देवमूर्ती घडविण्यासाठी योग्य आहे की नाही हे तिच्यातील दोष, तिचे वयोमान, लिंग वगैरेवरून ठरवितात. यासाठी शिळांचे वर्गीकरण करतात.

**शिळेच्या रंगावरून तिचे वर्गीकरण :**

शिळा प्रामुख्याने चार रंगांच्या असतात : पांढरी, लाल, पिवळी व काळी शिळा. या रंगांच्या अनेक छटा असू शकतात. उदाहरणार्थ पांढऱ्या रंगाच्या सात निरनिराळ्या छटा असू शकतात. यापैकी कोणतीही छटा असलेल्या दगडाचे वर्गीकरण पांढऱ्या रंगाचा म्हणून करतात. गाईच्या दुधासारखा पांढरा रंग, शंखाप्रमाणे, कुन्दाच्या फुलाप्रमाणे, चंद्रासारखा, मोती किंवा स्फटिकासारखा व मल्लिकेच्या फुलासारखा, अशा पांढऱ्या रंगाच्या सात छटा आहेत.

जपा किंवा किंशुक यांच्या फुलाप्रमाणे अरुण रंग, पावसाळ्यात दिसणाऱ्या लाल रंगाच्या इंद्रगोप नांवाच्या किड्यांच्या लाल रंगाप्रमाणे, जातिलिंग म्हणजे नर्मदेत सापडणाऱ्या तांबड्या रंगाच्या दगडाप्रमाणे (jasper), सशाच्या रक्तासारखा लालभडक, तसेच डाळिंबाच्या फुलासारखा लाल अशा तांबड्या रंगाच्या छटा आहेत. बन्धूक किंवा कोरण्डीच्या फुलासारखा पिवळा रंग असलेल्या शिळा असतात. म्हशीच्या डोळ्याप्रमाणे काळा, काजळ, निळे कमळ, भुंगा, मोराची मान, काळ्या रंगाची

गाय, काळ्या रंगाचे व लहान आकाराचे मूग इत्यादींच्या रंगाप्रमाणे असे काळ्या रंगाचे अनेक प्रकार असू शकतात.

भारतीय शिल्पशास्त्राप्रमाणे पांढऱ्या रंगाचा दगड मूर्तिकामासाठी सर्वोत्तम समजतात. त्याच्या खालोखाल लाल, पिवळा व काळा रंग असलेले दगड अनुक्रमाने कमी कमी ग्राह्य असतात. विष्णुधर्मोत्तर पुराणाच्या मताने पांढरा किंवा फिका पांढरा रंग असलेले, निळ्या कमळाप्रमाणे रंग असलेले, काळे मूग, भुंगा यांच्या सारखा काळा रंग असणारे किंवा कबुतराप्रमाणे म्हणजे पारवा रंग असलेले दगड मूर्तीसाठी चांगले समजतात. काश्यपशिल्प या शिल्पविषयक ग्रंथाच्या मताने हिरव्या, काळ्या आणि विशेषतः पांढरा रंगाचे दगड उत्तम असतात. मूर्तीसाठी जी शिळा निवडावयाची तिचा रंग सगळीकडून एकच असला पाहिजे. मिश्रवर्ण असलेली शिळा या कामासाठी योग्य समजत नाहीत. दगडामध्ये नेहमीच लोखंड काही प्रमाणात उपलब्ध असते. ऊन, पाऊस वगैरेमुळे जो दगड क्षीण झाला आहे त्यातील लोखंडाच्या क्षारांचे अनेक वर्णात रूपांतर होते. तेव्हा दगडात जर अनेक वर्ण असतील तर त्याचा अर्थ झाला की ऊन, पाऊस वगैरे नैसर्गिक कारणांनी तो दगड अपक्षीण झालेला आहे. तेवढ्यासाठी हा नियम दिला आहे.

**शिळेचे वयोमानानुसार वर्गीकरण .**

शिळेचे तिच्या वयोमानानुसार तीन प्रकार होतात. बाला, तरुणी व वृद्धा. ज्या शिळेला ठोकले असतांना बद बद असा किंवा हलका पिचका आवाज येतो, घणाच्या आघाताने जिचे जवळजवळ चूर्ण होते, किंवा कच्च्या विटेप्रमाणे जी शिळा ठिसूळ असते किंवा ज्या शिळेचा आकार द्राक्षवेलीप्रमाणे म्हणजे रुंदी, व जाडी एकदम कमी व नुसतीच लांबलचक किंवा झाडाच्या पानाप्रमाणे आकार असलेली म्हणजे लांब, रुंद परंतु जाडी खूपच कमी अशा शिळेला 'बाला' म्हणतात.

ज्या शिळेला ठोकले असता घंटेप्रमाणे खणखणीत व पुष्कळ गुंजणारा आवाज असतो, जिचा स्पर्श गुळगुळीत व शीतल आहे, जिच्यापासून येणारा सुगंध मनोहारी आहे व जिच्यात लहानमोठी छिद्रे नसतात अशा शिळेला 'तरुणी' म्हणतात.

ज्या शिळेला ठोकले असता खणखणीत आवाज येत नाही. जी शिळा फोडली असता मासा किंवा बेडूक यांच्या सारखे आकार दिसून येतात (Conchoidal Fracture) जिचा स्पर्श खडबडीत आहे, जिला सापाच्या कातीप्रमाणे अनेक भोके भोके आहेत किंवा ज्या शिळेवर ऊन, पाऊस वगैरेंचा परिणाम होऊन जी अपक्षीण झाली आहे अशा शिळेस 'वृद्धा' म्हणतात.

मूर्तिकामासाठी 'बाला' तसेच 'वृद्धा' शिळा उपयोगाच्या नाहीत. 'तरुणी' शिळा मूर्ती कामासाठी ग्राह्य असते असे मयमतकाराचे मत आहे.

**शिळेचे लिंगानुसार वर्गीकरण.**

जी शिळा भली मोठी, काहीशी गोल, दहा किंवा बारा कोन असलेली, जिला ठोकले असता घण्टेप्रमाणे खणखणीत आवाज निघतो, अयताकृती म्हणजे लांबी, रुंदी व जाडी जवळ जवळ सारखीच असलेली, तरुणी, दिसण्यास मनोहारी, मुळापासून अग्रापर्यंत जवळजवळ सारखाच आकार असलेली व सर्वत्र एकाच रंगाची, वजनदार व घणाचा घाव घातला असता जिच्यातून स्फुलिंग उडतात, जिचे अग्र पूर्व किंवा उत्तर दिशेकडे असेल अशी शिळा 'पुलिंगी' असते.

शिळा खाणीतून काढतांना, तिच्या मूळ अवस्थेत तिच्या वरच्या टोकाला 'अग्र' व खालच्या भागाला 'मूळ' म्हणतात. शिळेचे अग्र पूर्व अथवा उत्तर दिशेकडे असणे शुभ मानतात. शिळेचे अग्र नैऋत्य किंवा आग्नेय दिशेला व मूळ अनुक्रमे ईशान्य व वायव्य दिशेला असेल तरीही ती शिळा शुभ समजतात. याच्या विरुद्ध दिशांना अग्र व मूळ असल्यास ती शिळा ग्राह्य समजत नाहीत.

शिळा फार मोठी नाही, तसेच फार लहानही नाही, जिला चार ते आठ कोन असतात, जिला ठोकले तर झांजेप्रमाणे मंजुळ आवाज येतो अशी, अग्र लहान व मूळ त्यामानाने मोठे असलेली, मध्यम वजनदार, स्पर्शाला गार अशी शिळा 'स्त्रीलिंगी' समजतात.

शिळेचा आकार लहान असेल तर, जी गोट्याप्रमाणे संपूर्ण गोल असते, खडबडीत, जिला ठोकले तर खणखणीत

आवाज येत नाही, अग्र आकाराने मोठे व मूळ त्यामानाने लहान, त्रिकोणी आकाराची किंवा जिची एक बाजू समोरच्या बाजू पेक्षा फारच लहान आहे अशा शिळेस 'नपुंसकलिंगी' शिळा मानतात.

पुल्लिंगी शिळेपासून देवमूर्ती घडवावी, स्त्रीलिंगी शिळेपासून देवतेची मूर्ती तयार करावी व देवमूर्तीच्या आसनाखाली जो पाया त्यासाठी नपुसकलिंगी शिळा वापराव्यात असा नियम मयमतात तसेच काश्यपशिल्पात दिला आहे. जेव्हा देव व देवी यांची मूर्ती एकाच शिळेत घडवावयाची असेल तर ती शिळा पुल्लिंगी असावी.

**शिळेमधील दोषः**

शिळांमधील अनेक दोषांची चर्चा शिल्पशास्त्रविषयक ग्रंथांत केलेली असते. शिळेवरती रेघा (Veins), डाग (porphyry) व कलंक (amygdule) असू नयेत. हा झाला सर्वसाधारण नियम. याविषयी अधिक सूक्ष्म विचार केलेला आढळून येतो. शिळेवरती तीन प्रकारच्या रेघा दिसून येतात. अ) दोरीसारखी रेघ. दोरीला जसा पीळ दिलेला असतो तसे पीळ तिच्यात दिसतात व जी वेडीवाकडी गेलेली असते. ब) सूर्यकिरणप्रमाणे सरळ असलेली रेघ. मात्र सूर्यकिरणांत जसे धूलिकण दिसतात तसे अगदी बारीक बारीक ठिपके किंवा कण तिच्यात दिसतात. क) पावसाच्या पाण्याच्या धारेप्रमाणे एकाच रंगाची रेघ.

पांढऱ्या ते काळ्या दगडांत जर पांढऱ्या रंगाची रेघ असेल तरी ते दगड उपयुक्त समजतात. मात्र कोणत्याही रंगाच्या दगडांत काळ्या रंगाची रेघ असेल तर तो दगड अग्राह्य समजतात. पुष्कळदा पांढऱ्या रंगाची रेघ ही स्फटिकाची (quartz) असते. स्फटिक फार कठीण असतो, त्यामुळे त्यावर ऊन व पावसाची मात्रा एव्हढी चालत नाही. तेव्हा अशी रेघ जरी शिळेत असली तरी त्यामुळे तिच्या मजबुतीत फरक पडत नाही; म्हणून असा दगड मूर्तिकामासाठी ग्राह्य समजतात. या उलट काळ्या रंगाची रेघ ही गौण खनिजाची (secondary mineral) असते. यावर ऊनपाऊस वगैरेंचा प्रभाव पडून पर्यायाने ते दगड लवकर अपक्षीण होऊ शकतात. त्यामुळे ज्या दगडांत काळ्या रंगाची रेघ आहे ते अग्राह्य ठरवितात.

शिळेवर जे डाग असतात त्यांचे त्यांच्या आकारमानानुसार तीन प्रकार करतात. हे डाग वर्तुळाकृती असतात. जांभळाच्या आकाराचा डाग, द्राक्षाच्या आकाराचा डाग व त्याहून लहान आकाराचा डाग असे तीन प्रकार आहेत. शिळेवर डाग असू नयेत. मात्र ज्या दगडावरील डाग (prophyry) पांढऱ्या रंगाचे असतील तरी तो दगड योग्य समजतात. मात्र कोणत्याही रंगाच्या दगडात काळ्या रंगाचे डाग असतील तर तो दगड मूर्ती बनविण्यासाठी अयोग्य समजतात. याची कारणमीमांसा वर दिल्याप्रमाणे आहे.

कलंकाचे तीन प्रकार असतात. लोखंडाप्रमाणे काळ्या रंगाचा, भुंग्याच्या रंगाचा व मोराच्या पिसाच्या रंगाचा असे कलंकाचे तीन प्रकार सांगितले आहेत. लोखंडाप्रमाणे, कांशाच्या धातूप्रमाणे व सोनेरी हे ते तीन प्रकार आहेत. कांसे व सोनेरी रंगाचे विभव म्हणजे आधुनिक लोहसार (Iron pyrites). लोखंडावर वातावरणाचा परीणाम लवकर होत असल्याने अशी शिळा त्याज्य समजतात. 'कलंकित' शिळा म्हजे आपण ज्याला 'मांजऱ्या' दगड म्हणतो तो.

दोषपूर्ण शिळांचे वर्णन देखील दिले आहे. पाऊस, वारा व इतर नैसर्गिक घटकांमुळे अपक्षीण व कमजोर झालेल्या शिळा, क्षारयुक्त पाण्याचा परिणाम झालेले दगड, ज्या शिळेत वाळू जास्त व बंधकद्रव्य कमी अशी शिळा, मातीची शिळा (shale) किंवा कलंक (amygdule) असल्याने खडबडीत अशी शिळा या त्याज्य होत.

बंधकद्रव्य नसलेली वाळूची शिळा याचे उत्तम उदाहरण नागपूर, भंडारा जिल्ह्यांत सापडणाऱ्या दगडांचे देता येईल. निसर्गावस्थेत हा दगड बराच कठीण असतो. पण तो खणून जमिनीवर काढला व त्याला कोरडे होऊ देऊन पाण्याच्या बादलीत टाकला तर तो विरघळून त्याची बारीक पूड बादलीच्या तळात जमते.

अशुभ जागेत असलेली, खरखरीत, दुसऱ्या कामासाठी वापरलेली, रेघा, डाग, कलंक असलेली, वृद्धा,

वाकड्या आकाराची, गौण खनिजांचे प्रमाण जास्त जास्त आहे अशी अनेक रंगांची, भेगा असलेली शिळा अग्राह्य मानतात.

ज्या दगडांचा रंग, कावळा, ससाणा, उंट, माकड यांच्या रंगासारखा आहे; ज्यांचा आकार मांजर, गिधाड, साप, जंगली डुक्कर, बेडूक यांच्या प्रमाणे असलेला, घणाच्या आघाताने ज्यांचे अनेक लहान तुकडे होतात, गोल गोटे, आकाराचे फार मोठे किंवा फार लहान, तसेच ज्या दगडांत अनेक भोके (क्षते) आहेत असे दगड मूर्तिकामासाठी त्याज्य समजतात.

मूर्ती तयार करण्यासाठी आतमध्ये पोकळ असलेली शिळा कधीही वापरू नये अशा शिळेला 'गर्भिणी' समजून तिचा त्याग करावा असे शिल्पशास्त्रावरचे सर्व ग्रंथ सांगतात. एखादी शिळा, न फोडता आत पोकळी असलेली आहे की नाही हे जाणण्यासाठी काही परीक्षा देखील या ग्रंथांत दिल्या आहेत. मात्र या परीक्षांमधील कारणपरंपरा समजत नाही. भूगर्भशास्त्रांत दर्दी असलेला कोणी तज्ज्ञ याबाबत काही स्पष्टीकरण देऊ शकेल म्हणून या परीक्षांची माहिती देत आहे.

अतिविष, हिराकस व गेरू यांचे समभाग चूर्ण करावे; त्यात दूध घालावे व या मिश्रणाचा लेप दगडाला लावावा. एक रात्र उलटून गेल्यावर या लेपाचा रंग बघावा. तो बदललेला नसेल तर शिळेत पोकळी नसेल. पण रंग बदललेला असेल तर त्या रंगानुसार त्या पोकळीचा आकार देखील समजू शकतो. ही माहिती खाली तक्त्यात दिली आहे.

गर्भिणी शिळेतील पोकळीचा आकार

| लेपाचा एक रात्रीनंतरचा रंग | पोकळीचा आकार |
|---|---|
| मंजिष्ठेप्रमाणे लाल | बेडकाप्रमाणे |
| पिवळा | मगराप्रमाणे |
| लाल(कपिल) | उंदराप्रमाणे |
| काळा किंवा फिकट पांढरा | सापाप्रमाणे |
| कबुतरासारखा, पारवा | मुंगुसाप्रमाणे |
| रक्ताप्रमाणे लाल | सरड्याप्रमाणे |
| मधाप्रमाणे | काजव्यासारखा |
| मिश्र रंग | मुंगीसारखा |
| धुरकट रंग | भुंग्यासारखा |
| निळा किंवा पिवळा | कासवा सारखा |

जटामासी, रोग व अश्वमारी यांचे समभाग मिश्रण पावसाच्या पाण्यात व शेळीच्या दुधात कालवावे. हा लेप शिळेला लावावा. तीन दिवसानंतर जर लेपाचा रंग बदलला तर शिळेत विष आहे असे समजते. जटामासी, कुष्ठ, गधारात्री, यांचे समभाग चूर्ण त्रिफळाच्या पाण्यात मिसळून लेप तयार करतात. हा लेप दगडाला लावल्यानंतर तीन रात्रींनंतर जर लेपाचा रंग बदलला तर त्याच्यात कालकूट नावाचे भयंकर विष आहे असे समजावे. असेच अनेक लेप शिल्परत्न तसेच विष्णुधर्मोत्तर पुराणात दिले आहेत. त्यांच्या खरेपणाची प्रचीती प्रत्यक्ष प्रयोग करूनच ठरवावयास हवी.

मूर्तीकरिता शिळा निवडावयाची ती डोंगरातील प्रसिद्ध खाणीतून निवडावी. ज्या पर्वतातील अथवा डोंगरातील शिळा उत्तम प्रतीच्या आहेत हे प्रसिद्ध आहे, अगोदर माहीत आहे, तेथील खाणीतील शिळा पारखून घ्यावी. जमिनीखाली असलेले दगड निवडावयाचे असतील तर ते अवजड, मोठ्या आकाराचे, घणाच्या माराखाली स्फुल्लिंग उडतील, आवाज खणखणीत असेल असे दगड घ्यावेत.

• • •

(मुखपृष्ठ २वरून)

**संपादकीय**

ख्रिस्ती धर्माच्या प्रसारावरून एक गोष्ट लक्षांत येते की धर्माचा प्रसार धर्मग्रंथ वाचून कधीच होत नसतो. पराकोटीचा त्याग, साहस, चिकाटी, निरीक्षण शक्ति हे गुण जर का धर्मप्रसारकांमध्ये नसतील तर तो कधीच यशस्वी होऊ शकत नाही. ख्रिस्ति धर्म प्रसारकांपासून हा धडा ज्या दिवशी आपण घेऊ तेंव्हाच आपल्यामध्ये रॉथ आणि मॅक्सम्यूलर निर्माण होतील.

• • •

# भारतीय मूर्तिशिल्प(३)
# मूर्तीसाठी उपयुक्त लाकूड

डॉ. र. पु. कुलकर्णी

लाकडाच्या देवमूर्ती करतात. परंतु देवमूर्ती जास्त करून शिळेपासून तयार करतात. त्यांच्या मानाने लाकडाच्या देवमूर्तींची संख्या फार कमी आहे. चटकन आठवणारे उदाहरण म्हणजे ओरिसा राज्यातील पुरी येथील पुरुषोत्तमाच्या मंदिरातील कृष्ण, बलराम व सुभद्रा यांच्या मूर्ती. या तिन्ही मूर्ती लाकडाच्या करतात. त्या दर बारा वर्षांनी नवीन बनवितात. मात्र मातीच्या किंवा चुन्याच्या मूर्ती करतात. त्यासाठी त्यांच्या आत आधारासाठी लाकडी सांगाडा वापरतात व अशा मूर्तींची संख्या पुष्कळच असू शकेल. हल्ली गोपुरांवर अथवा अनेक मजली मंदिरांवर ज्या चुन्याच्या (सिमेंटच्या?) मूर्ती बसवितात त्या बनविताना आधारासाठी पोलादी सळई वापरतात तेच काम पूर्वीच्या काळी हा लाकडाचा सांगाडा करीत असे. त्याच्या विषयी इत्थंभूत माहिती पुढे येईलच (याला संस्कृतमध्ये 'शूल' म्हणतात.) या सांगाड्यासाठी जे लाकूड वापरावयाचे तसेच वास्तुरचनेसाठी जे लाकूड उपयोगी आणावयाचे त्यांची वैशिष्ट्ये शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत दिलेली असते.

देवमूर्तींसाठी उत्तम लाकडाचा वापर करावयास हवा. देवमूर्ती लाकडाची असल्याने कालांतराने तिला फटी पडावयास नकोत, तिच्या चिरफळ्या व्हावयास नकोत याची काळजी घेणे आवश्यक आहे. याविषयी देखील लाकूड वापरावयाच्या अगोदर ते सुकविण्यासंबंधी नियम दिले आहेत. त्यांचीही माहिती शेवटी दिली आहे.

उत्तम लाकडाच्या वैशिष्ट्यांचा उगम फार प्राचीन काळच्या ग्रंथांत मिळतो. आपस्तंब श्रौतसूत्रांत (कमीत कमी इ.पू. ८०० वर्षे) याबद्दल माहिती मिळते. यज्ञामध्ये पशूला बांधून ठेवण्यासाठी यूपाची योजना करतात. हा यूप लाकडाचा बनवितात. यूपाची लांबी एक अरत्नि (१/२ मीटर) ते, यज्ञाच्या प्रकारानुसार ३३ अरत्नि (१६ मीटर) असू शकते. तेव्हा ज्या लाकडापासून यूप बनवायचा ते चांगल्या प्रतीचे असावयास हवे. यूपासाठी पलाश, खैर, बिल्व किंवा रोहितक वृक्षाचे लाकूड वापरावे. यूप कोणत्याही फांदीपासून तयार करू नये. ज्या मोठ्या फांदी पासून अनेक फांद्या फुटतात अशा फांदीचा त्यासाठी वापर करावा. मात्र यूपासाठी झाडाच्या खोडाचा उपयोग करू नये. अशा झाडाला खूप पाने असावीत, तो शुष्कपर्ण असू नये. त्याचा अगदी वरचा शेंडा देखील पानांनी बहरलेला असावा. ते टोक कोरडे पडलेले असू नये. झाडाची फांदी आतून पोकळ असता कामा नये. ती फांदी किंवा वृक्ष पांढऱ्या मुंग्या, वाळवी किंवा तत्सम किड्यांनी पोखरलेली असू नये. फांदी वाकडीतिकडी न वाढता सरळ सोट असावी. तिच्यापासून निघालेल्या फांद्या खाली झुकलेल्या नसून वरच्या दिशेला वळलेल्या असाव्यात. तो वृक्ष अर्धवट जळालेला, आपोआप पडलेला किंवा आपोआप शुष्क झालेला नसावा.

पुढे जी लाकडाची वैशिष्ट्ये दिली आहे त्यावरून दिसून येईल की वर दिलेले उत्तम वृक्षाचे वर्णन जवळ जवळ परिपूर्ण असेच आहे.

लाकूड वृक्षांपासून मिळते तेव्हा लाकडाचे गुणधर्म हे त्या त्या वृक्षांवर अवलंबून असतात. भारतीयांना वृक्षांची माहिती बऱ्याच प्राचीन काळापासून होती व त्यांनी वृक्षांना निरनिराळी नावे देखील दिली होती. कोणत्या वृक्षाच्या लाकडापासून रथ, गाडी, मंडपाचे खांब व तुळ्या बनवाव्यात याची देखील माहिती त्यांना होती. शतपथ ब्राह्मणात (इ.पू. १४००) अनेक वृक्षांची नावे दिली आहेत. अश्मगन्धा, अध्यण्डा, पृश्निपर्णी, अश्वत्थ, विभीतक, बिल्वक, स्फूर्जक, हारिद्र, न्यग्रोध, अश्ववाल, उदुम्बर, करमरी, पलाश, प्लक्ष, बिल्व, वेणु, खदिर, शमी इत्यादी. खैराचे लाकूड मजबूत असते हे माहीत होते. उदुंबराचे लाकूड सभामंडपाच्या खांबांसाठी वापरले जात असे. मंडपाची तुळई वांबूची बनवीत. शाल्मली नावाचा वृक्ष तर ऋग्वेदकाळी देखील

ज्ञात होता.

सुतार, रथ तयार करणारा रथकार, वांबू चिरून त्याचे टोपली वगैरे पदार्थ बनविणारी स्त्री, विदलकारी, अशी कारागीरांची नावे मिळतात. लाकडावर नक्षी कोरणाऱ्या मिस्त्रींला 'पेशितृ' म्हणत. तेव्हा अगदी प्राचीन काळी लाकूड काम करण्यात भारतीय बरेच पटाईत होते.

लाकडांचे वर्गीकरण त्यांच्या वयोमानाप्रमाणे व लिंगाप्रमाणे केले जात असे. लाकडांचे वयोमानानुसार वर्गीकरण करताना वृक्षाची कमाल वयोमर्यादा १०३ वर्षे समजत असत. सोळा वर्षांपेक्षा कमी वय असलेले वृक्ष 'बाल' व पन्नास वर्षांपेक्षा जास्त वय असलेले वृक्ष 'वृद्ध' समजतात. सोळा ते पन्नास वर्षे वय असलेले वृक्ष 'तरुण' असून त्यांचे लाकूड बांधकामासाठी तसेच मूर्तिकामासाठी योग्य असते.

जो वृक्ष चांगल्या सुपीक जमिनीत उगविलेला असतो, ज्याची मुळे जमिनीत खोलवर गेलेली असतात, ज्याच्या फांद्यांची जाडी मुळापासून अग्रापर्यंत जवळ जवळ सारखीच असते; ज्याच्या फळांना व फुलांना मंद गंध येतो, जो वृक्ष मजबूत असून स्पर्शाला समशीतोष्ण असतो अशा वृक्षाला 'पुल्लिंगी' संबोधतात.

ज्याच्या फांद्यांचे मूळ जाड व ते पुढे क्रमाने लहान होत जाते, गुळगुळीत, ज्याच्या फुलांना उत्तम व गर्द सुगंध येतो, स्पर्शाला जो शीतल व ज्याच्यात द्रव पदार्थांची मात्रा काहीशी जास्तच असते अशा वृक्षाला 'स्त्रीलिंगी' म्हणतात.

ज्याच्या खोडाचा खालचा भाग कमी रुंदीचा व वरचा भाग जास्त रुंदीचा किंवा ज्याचा खालचा व वरचा भाग अरुंद व त्यामानाने मधला भाग रुंद असतो. ज्याची मुळे, फळे व फुले दुर्बल असतात असे झाड 'नपुंसकलिंगी' असते. पुल्लिंगी वृक्ष उत्तम, स्त्रीलिंगी मध्यम व नपुंसकलिंगी झाड कनिष्ठ समजात.

**लाकडाची वैशिष्टी**

स्निग्ध, बलवान, ज्यांचे वय फार कमी नाही किंवा जास्त नाही, सरळसोट, पवित्र पर्वत, तीर्थस्थान इत्यादी स्थानी उगविणारे व दिसण्यास सुंदर अशा वृक्षांची लाकडे खांबासाठी उत्तम असतात.

झाडाच्या आतला भाग पांढऱ्या रंगाचा असेल तर अशा झाडाचे लाकूड सर्वोत्तम गणले जाते. या भागाचा रंग तांबडा, पिवळा किंवा काळा असेल तर अशा वृक्षांचे लाकूड अनुक्रमे कमी कमी योग्य समजतात. सरळ सोट, मजबूत, दृढ, हवा व पाणी यांचा ज्याच्यावर परिणाम होत नाही, जेथे पाणी भरपूर असते तेथे उगविणारी झाडे चांगली असतात. झाड तोडताना त्याच्यातून दुधासारखा पांढरा द्रव बाहेर आला तर त्या झाडाचे लाकूड चांगले असते. मात्र जर द्रव तांबड्या रंगाचा असेल तर अशा झाडाचे लाकूड वापरू नये.

देवालयाच्या जवळपास असलेले, आकाशातील वीज पडून अर्धवट जळालेले, ज्या झाडांवर पक्षांची घरटी खूप आहेत, रस्त्याच्या कडेने लावलेली झाडे, गावातील झाडे, ज्या झाडांवर अनेक पशु, पक्षी यांचा निवास असतो, ज्यांच्यावर वारा, पाऊस, आग याचा परिणाम झालेला असतो, जी झाडे चाण्डाळांच्या वस्तीत अथवा जवळपास उगविलेली असतात, जेथे मुंग्या व इतर किटाणू खूप प्रमाणात आहेत, ज्यांना लतांनी वेष्टिलेले आहे, ज्यांच्या फांद्यांवर आगांतुक झाडांच्या फांद्या उगवल्या आहेत, जे आतमधून पोकळ आहेत, ज्यांना ऋतुकाळपरत्वे फळे धरत नाहीत, जे स्मशान, चैत्य यांच्या आसपास आहेत, तलावाच्या मध्यभागी किंवा तीरांवर असलेल्या अशा वृक्षांचे लाकूड अयोग्य समजतात.

तसेच जे वृक्ष निर्बल आहेत, ज्यांची पाने जीर्ण झाली आहेत, जे आपणहून पडून गेले आहेत किंवा वाऱ्यावादळामुळे उन्मळून पडले आहेत, शुष्क झालेले, अनेक गाठी असलेले, राजा व शूद्र यांच्या वस्तीच्या आसपास असलेले वृक्ष त्याज्य समजतात.कडू, आंबट, तीक्ष्ण चवीची किंवा क्षारयुक्त जमीन अथवा जेथे जमीन भेगाळलेली असते अशा ठिकाणची झाडे अग्राह्य असतात. ज्या झाडांना छिद्रे आहेत, फांद्या वाकड्यातिकड्या आहेत तसेच काटेरी झाडे यांचेही लाकूड योग्य नसते वृक्षांची फळे सुमधुर व खुप गरयुक्त असतात, ज्यांच्या फुलांना उत्तम सुगंध

असतो अशी झाडे किड्यांना आकर्षित करतात म्हणून त्यांचेही लाकूड वापरू नये.

ज्या झाडांचे लाकूड वापरू नये त्यांची यादी देतात. अश्वस्थ, उदुंबर, प्लक्ष, वड, सप्तपर्णी, वेल, पलाश, कुटज, पील, श्लेष्मातकी, लोध्र, कदंब, पारिजातक, शिरीष, कोविदार, तिन्त्रिणी, शिलीन्ध्र, सर्पमार, शाल्मली, सरल, किंशुक, अरिमेद, अभयास, आमलक, कपित्थ, कण्टकी, पुत्रजीव, डुण्डुक, कारस्कर, करंज, बरण, अश्वमारी, बोरी, बकुळ, पिण्डी, पद्मक, तिलक, पाटली, अगरु, कापूर इत्यादी. हे वृक्ष देवांप्रमाणे पूज्य असल्याने मानवी वस्तूसाठी त्यांचा उपयोग करू नये. असे मयमत, शिल्परत्न, समरांगण सूत्रधार, विश्वकर्मा वास्तुशास्त्र इत्यादी ग्रंथांत उल्लेखिलेले आहे.

खैर, शाल, मधूक, स्तम्बक, शिशव, अर्जुन, आजकर्णी, क्षीरिणी, चन्दन, पिशित, धन्वन, पिण्डी, सिंह, राजादन, शमी, तिलक या झाडांच्या लाकडाचा उपयोग खांबांसाठी करावा. तसेच सिलिन्द्रक, तिन्दुक यांच्या लाकडाचाही उपयोग त्यासाठी केल्यास हरकत नाही. ताल, नारळी, क्रमुक, बांबू, केतकी इत्यादींचे लाकूड झोपडीच्या खांबांसाठी योग्य समजले जाते. नीम, असाणा, शिरीष, एक, काल, कट्फल, तिनिश, लिकुच, फणस, सप्तवर्णी या वृक्षांचे लाकूड तुळईसाठी उपयुक्त असते. शाक, शाल, मधूक, सर्ज, खैर, सरल, अर्जुन, फणस, श्रीपर्णी, शिंशव, हारिद्र, चंदन, आंबा, तिंदुक या झाडांचे लाकूड वास्तूसाठी उपयुक्त असते. मात्र वास्तूमध्ये एकाच प्रकारच्या झाडाच्या लाकडांचा उपयोग करावा. आंबा, नागरंग, जिन्दुक, खैर, बांबू, पाटल, विभीतक, सरल, कर्कन्धू, कश्मरी, पारिभद्र, श्रीपर्ण, तिलक, नक्तमाल, भद्रक, नीम वगैरे झाडांच्या लाकडांचा उपयोग खिडकी, दारे, तुळ्या, झोपाळा, छत, जिना, खांब वगैरेंसाठी करावा. मात्र मधूक, तिनिश, पूतिक व क्षीरवृक्ष यांचे लाकूड तुळईसाठी तसेच नक्षीकामासाठी अयोग्य असते.

येथे केवळ मूर्तीकरिता किंवा मूर्तीच्या सांगाड्याकरीता उपयुक्त लाकडाची केवळ वैशिष्टी न देता किंवा त्यासाठी कोणत्या वृक्षाचे लाकूड उपयुक्त आहे त्यांचीच नावे न देता लाकडाचे जे इतर उपयोग आहेत त्यांचीही माहिती दिली आहे. वर जी चांगल्या लाकडांची वैशिष्टी दिली आहेत ती वास्तूसाठी उपयोगी लाकडांची आहेच परंतु मूर्तीच्या सांगाड्याकरीता जे लाकूड वापरावयाचे त्यालाही उपयुक्त आहे.

लाकडाची आणखी उपयुक्त माहिती काही कोशवाङ्मयात, संहिताग्रंथांत तसेच शिल्पशास्त्राच्या ग्रंथांत दिली आहे. शाल, जंबुकसाल, सरल, बकुल, मधूक, तिंत्रिणी, बाभूळ, व्याघ्र, खिरिणी, खैर व शमी यांचे लाकूड मानसार व मयमत या ग्रंथांनुसार रथ तयार करण्यासाठी उपयुक्त असते. यातील बकुल, तिंत्रिणी वगैरेंची लाकडे मानवाच्या वास्तूसाठी वापरू नयेत असे म्हटले आहे. कारण ती झाडे पवित्र समजली जाता. परंतु देवाच्या रथासाठी (रथयात्रेत वापरल्या जाणाऱ्या रथासाठी) त्यांचा उपयोग करावा असे सांगितले आहे. तेव्हा यात परस्परविरूद्ध मत नाही. देवकार्यासाठीच या पवित्र वृक्षांची लाकडे वापरली जातात.

याशिवाय भृगुसंहितेच्या मताने शाक, शिरीष, अर्जुन, निंब, पिशित, कट्फल, मधूक, खदिर, कालवन्धन, आंबा व नाग वृक्षाचे लाकूड रथासाठी उपयुक्त समजतात.

'युक्तिकल्पतरु' या भोजराजाने लिहिलेल्या लहानशा कोशात नाव बनविण्यासाठी जे लाकूड वापरावयाचे त्याची वैशिष्टी दिली आहे. नावेसाठी वापरावयाचे लाकूड मऊ, वजनाला हलके, मात्र कठीण असले तरी त्यावर काम करणे सोपे असेल, असे असावे.

आगस्त्य संहितेप्रमाणे विमान तयार करण्यासाठी जे लाकूड वापरावयाचे ते मऊ, वजनाला हलके तसेच काम करावयास सोपे असावे. पलाश, चंदन, बकुल, फणस यांचे लाकूड यासाठी चांगले असे ही संहिता सांगते.

एकदा कोणते झाड लाकडासाठी पाडावयाचे हे निश्चित झाले म्हणजे ते झाड कापावयास किंवा कुऱ्हाडींनी तोडावयास सुरुवात होते. या बाबतीत एक नियम असा की झाड पडते तेव्हा ते पूर्व किंवा उत्तर दिशेला पडले पाहिजे; तरच ते शुभदायक. इतर दिशांना पडले तर ते अशुभसूचक समजतात व त्याचे लाकूड वापरू नये अशी समजूत आहे.

(पान क्र. १८ वर)

# मौखिक परंपरेत पुस्तकांचे महत्त्व

श्री. प्रदीप कर्णिक

लेखनकला अस्तित्वात येण्याआधीही गुरुशिष्य परंपरेमधून विद्यादानाचे कार्य होत असे. त्या काळात पुस्तकांचे इतके महत्त्व नव्हते. वैदिक स्वर आणि उच्चार गुरूशिवाय लक्षात येत नसत. पुस्तकांवरुन त्यांची कल्पना येत नसे.

स्मृतीमध्ये त्याविषयी वचने आढळतात. त्यावरुन हे मत स्पष्ट होऊ शकते.

''पुस्तकप्रत्ययाधीतं नाधीतं गुरुसंनिधौ।

भ्राजते न सभामध्ये जारगर्भ इव स्त्रियः ॥''

उपनिषत्कालामध्ये वेदांतविद्येचा उदय व प्रसार झाला व गुरूचे महत्त्व अधिक वाढले. ब्रह्मविद्येची गूढ तत्त्वे गुप्त ठेवली जात, ही तत्त्वे पुस्तकांशिवाय विशद करणारी संस्था केवळ गुरु हीच होती. म्हणून या कालखंडात पुस्तकांना विशेष महत्त्व नसे.

सार्वजनिक शिक्षणसंस्था इसवी सनाच्या पाचव्या शतकापर्यंत भारतात निर्माण झाल्या होत्या असे दिसत नाही. त्यामुळे गुरुशिष्य परंपरेत वाचन, ग्रंथालय यांचा सहभाग फारच अल्प प्रमाणात केल्याचे दिसून येते. किंबहुना तो नव्हताच असे अ. स. अळतेकर यांच्या 'प्राचीन भारतीय शिक्षणपद्धति' या ग्रंथावरून दिसते. 'विद्यार्थिदशा व तीतील जीवनक्रम' विशद करताना त्यांनी असे म्हटले आहे की, ''स्मृतिग्रंथ किंवा जातके या दोहोमध्येही, वर्ग केव्हा भरत असत याबद्दल बिलकुल माहिती मिळत नाही. प्रायः मुखमार्जन, स्नान, व संध्यादी धार्मिक कृत्ये संपली म्हणजे शिक्षणास सुरुवात होत असावी. बौद्धविहारामध्येही हीच पद्धत असे. दोन प्रहरी भोजनाची वेळ होईपर्यंत अध्ययन-अध्यापन चाले; मग भोजन, विश्रांती वगैरे करिता दोनतीन तास सुट्टी मिळे. सूर्याचा उष्मा जरा कमी झाला म्हणजे पुन्हा अध्ययन सुरू होई व ते सायंकाळपर्यंत चाले. यानंतर उपनिषत्कालाच्या अखेरपर्यंत तरी, सर्व विद्यार्थी मिळून अरण्यामध्ये समिधा आणण्यास जात. त्यावेळी विद्यार्थ्यांमध्ये बराच विनोद व थट्टामस्करी चाले व व्यायाम होऊन त्यांचा वेळ आनंदात जाई. होमादिकांचा ऱ्हास इ. स. पू. ४०० च्या सुमारास होऊ लागल्यावर समिधाहरणार्थ दररोज जाणे बंद झाले असावे. त्यानंतर सायंकाळचा काळ विद्यार्थी इतर कोणत्या तरी व्यायामामध्ये घालवीत असावेत. अस्तमानाबरोबर संध्यावंदनास सुरुवात होई व मग पुन्हा सायंकाळच्या होमामध्ये विद्यार्थ्यांचा वेळ जाई. मग भोजन होई व त्यानंतर काही वेळाने विद्यार्थी झोपत असत. या दिनक्रमामध्ये घरच्या अभ्यासाचा निराळा वेळ दिसून येत नाही; पण त्याची फारशी जरुरीही नसे. शाळेमध्येच गुरूच्या समोर पाठ करण्याचा वगैरे अभ्यास होई; हल्लीसारखी पूर्वी प्रत्येक विद्यार्थाच्या जवळ स्वतःची पुस्तके नसत. त्यामुळे त्यांना सर्व काही वर्गामध्येच शिकावे लागे. झालेल्या पाठाची आठवून उजळणी करणे तेवढे घरी शक्य असे; संध्याकाळी जेवणानंतर निजण्यापूर्वीचा वेळ प्रौढ विद्यार्थी याकरिता उपयोगात आणीत असावेत.''

यावरून विद्यार्थ्यांसाठी पुस्तकांचा संग्रह, ग्रंथालय नावाची संस्था अस्तिवात नव्हती असे म्हणता येते. शिवाय दिनक्रमात पुस्तकांचा समावेशही नव्हता.

लेखनकलेची मदत बरीच वर्षे भारतीय शिक्षण पद्धतीमध्ये घेण्यात आली नव्हती, त्यामुळे पाठांतरावर जोर दिला गेला होता. त्यामुळेच प्राचीन काळी ग्रंथ कंठगत असणे मानाचे समजले जाई. ग्रंथकारांनाही 'आपला ग्रंथ विद्वानांनी पाठ केला जाऊन त्यांच्या कंठभरणतेस प्राप्त व्हावा याबद्दल ग्रंथकारांचा प्रयत्न असे' असे आळतेकरांनी नमूद केले आहे.

लिखित स्वरूपात पुस्तके उपलब्ध झाली तरी त्यांवर विसंबून राहता येत नसे, कारण त्या प्रती लिहीताना

त्यांत चुका होत असत. आणि वेदमंत्रात उच्चारात चूक होणे म्हणजे अनर्थ ओढवत असे असा समज होता. या कालखंडात साहित्य, अलंकार, धर्मशास्त्र, न्याय वगैरे शास्त्रांचे अध्ययन सुरू झाले होते. वेदांकडे दुर्लक्ष होऊ नये म्हणून अखेर काश्मीरमधील वसुन्द्र ब्राह्मणाने नवव्या शतकामध्ये वेदमंत्र व त्यांवरील टीका लिहून काढली. नंतर त्यांच्या प्रती अस्तित्वात आल्या तरी त्या एक तर दुर्मिळ होत्या व बऱ्याच महागही होत्या. त्यामुळे पुस्तक वाचून अध्ययन करणे ही क्रिया त्यामानाने दुर्मिळच होती.

इत्संगच्या वृत्तांत असा उल्लेख आहे की, 'त्रिपीटकांच्या लेखी प्रती अस्तित्वात असल्यावरही त्या महाग व दुर्मिळ असत, म्हणून विद्यार्थ्यांना त्या कंठगत कराव्या लागत.'

म्हणजे लिखित स्वरूपात ज्ञान अस्तित्वात येऊनही महाग असल्याकारणाने पुस्तकांना विशेष महत्त्व त्या काळात नव्हते. गुरु विद्यार्थ्यांच्या उच्चारावर लक्ष ठेवीत असत. चुका दाखवत असत व त्या सुधारून घेत असत. पण केवळ पाठांतरावरच भर असाही त्याचा अर्थ नाही. व्याकरण, पूर्व व उत्तर मीमांसा, न्याय, सांख्य वगैरे ग्रंथ नुसते पाठांतराने शिकता येण्यासारखे नव्हते. हे ग्रंथ शिकवताना त्यांचे विवरण करावे लागे. दिवाकरसेनाच्या आश्रमामध्ये जे निरनिराळ्या श्रौत व श्रुतिबाह्य सिद्धांतांचे प्रौढ विद्यार्थी असत ते प्रथम आपापल्या सिद्धांताचे विवरण ऐकत, मग त्याचा विचार करून ते नीट समजून घेत, शंका कुशंका येतील त्या गुरूंना विचारीत आणि नंतर प्रतिपक्षीयाशी वादविवाद करीत, हे हर्षचरितावरून दिसून येते.

गुरूच्या घरी, आश्रमात हे कार्य चालत असे. त्यामुळे सार्वजनिक शिक्षणसंस्था निर्माण झाल्या नाहीत. सार्वजनिक शिक्षणसंस्था प्रथम बौद्ध मठांत निर्माण झाल्या. कारण बुद्धाने असा नियम करून दिला होता की, दहा भिक्षू एकत्र आले की त्यांचा संघ करावा. नवीन श्रमणास भिक्षुत्वाची दीक्षा दिल्यावर दहा वर्षांपर्यंत त्याला त्रिपिटकादिकांचे सांगोपांग शिक्षण वृद्ध भिक्षूंनी दिले पाहिजे. हिंदूंना शिक्षणसंस्था सुरू करण्याची कल्पना यावरून सुचली असावी. त्यांच्या सर्व सार्वजनिक शिक्षण संस्था इ.स. नंतर नवव्या शतकात निघाल्या आहेत.

मौखिक परंपरा जरी भारतात असली, तरी ग्रंथलेखनाचे कार्य, व ग्रंथसंग्रहाचे कार्य इतरत्र झालेच नाही असे नाही. हे स्वरूप त्रोटक जरी दिसत असले, तरी काही महत्त्वाचा प्रकाश प्रागैतिहासिक काळावर पडतो. पुढे ऐतिहासिक कालखंडात तक्षशिला विद्यापीठासारख्या अनेक विद्यापीठ संस्था निर्माण झाल्या. त्यांनी ग्रंथनिर्मितीचे कार्य फारच उत्तम प्रकारे केलेले दिसते.

## लेखनसाधने आणि आजच्या पुस्तकांचा पूर्वज

लेखनकला मानवाला अवगत झाल्यानंतर काही स्वरूपाचे लेखन सुरू झाले आहे. भारताच्या संदर्भात हा शोध सिंधु संस्कृतीत सापडतो. उत्खननात सापडलेल्या काही सीलांवर कोरलेली काही चिह्ने आहेत, पण त्यांचा अजून अर्थबोध झालेला नाही. जॉन मार्शल यांना उत्खननात काही मानवी शिल्पाकृती व बैलाच्या शोभिवंत कलाकृती सापडल्या व त्यांवर काही अक्षरेही आढळून आली. इ.स. पूर्व ३८०० च्या सुमारास अक्कड येथील राज्यकर्ता पहिला सार्गन याने केलेल्या संग्रहाचा सर्वात प्राचीन संग्रह म्हणून उल्लेख तज्ज्ञ करतात. या संग्रहात, भाजलेल्या विटांवर कोरून काढलेल्या लिखाणाचे नमुने वसतीतून मातीवर सापडतात. इ.स. पूर्व २५००-२००० मध्ये बाबिलोनियामधील नागरी वसतीतून मातीवर कोरलेल्या २५,००० विटांचा संग्रह उजेडात आला तेव्हा एक नवीन ठेवा हाती गवसला. इजिप्तमध्ये पापिरसाची भेंडोळी सापडली. पापिरसावर लिहिलेली पुस्तके टिकाऊ नाहीत, असे लक्षात आल्यावर विटा, शिळा, तांबे ही साधने वापरली गेली. यानंतर जनावराच्या कातड्यांचा उपयोग करण्यात आला. या साधनांचा वापर टिकाऊ तर होताच, पण दोन्ही बाजूंना लिहिता येते हे समजले. हलवण्यास सोपे असे हे साधन आहेच, पण त्याच्या घड्याही घालता येतात. एक, दोन, तीन घड्या घालता येऊन, एका बाजूला शिवता यायला लागले. फोलिओ, कार्टो, ऑक्टेव्हो (दुपत्री, चतुष्पत्री, अष्टपत्री) घड्या घालण्याच्या क्रियेतच आजच्या पुस्तकाचा जन्म आहे. १९४७ मध्ये मृत समुद्राजवळ

उत्खनन झाले, त्यात चौथ्या शतकातील, कातड्यावर केलेल्या लिखाणाचा नमुना सापडला आहे.

सुमेरियन, बाबिलोनियन, असीरियन, ईजिप्शियन, फिनिशियन, आर्मेनियन, हिब्रू, ग्रीक, रोमन आणि चिनी संस्कृतीत अशा प्रकारे विविध साधनांवर लेखननिर्मिती झाली आहे.

### पुस्तकांचा संग्रह

प्राचीन भारतातही संग्रहाची दीर्घ परंपरा आहे. ही परंपरा संख्यात्मक पातळीवर झाली असल्याने, विद्यार्जनाच्या कार्यात त्यांचे महत्त्व फारच विशेष आहे. ग्रंथालये व ग्रंथसंग्रह यांचे शैक्षणिक कार्यात जे योगदान आहे त्याला तोड नाही. ना. बा. मराठे यांनी 'भारतीय ग्रंथालयांचा इतिहास' नावाचे पुस्तक लिहिले आहे, त्यात भारतातील अनेक प्राचीन विद्यापीठांत असणाऱ्या संग्रहांचे दाखले दिले आहेत. भूर्जपत्र, ताडपत्रे, अशा साधनांचा वापर करून अनेक पोथ्या तयार केल्या जात असत. इ. स. पूर्व ६ व्या शतकातील गुणशील विद्यापीठात पोथ्यांवरून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात असे. इ. स. ८वे ते १२वे शतक यांमध्ये उदंतपुरी महाविहारामध्येही नालंदा विद्यापीठाप्रमाणे मोठा ग्रंथसंग्रह होता. विद्यार्थ्यांना या संग्रहातील मूळ पुस्तकांच्या नकला करून घ्याव्या लागत. हे विद्यार्थी जेथे जात असत तेथे ते त्यांचा प्रचारही करीत असत. नालंदा विद्यापीठ तर त्याच्या ग्रंथभांडारासाठी विख्यात होते. यास 'धर्मगंज' असे म्हणत. या संग्रहासाठी खास तीन इमारती होत्या. त्यापैकी दोन इमारती सहा मजली होत्या तर एक नऊ मजली होती, यावरून त्यातील संग्रहाची कल्पना येते. नवीन ग्रंथाचे लेखन व नकला करण्याचे कार्य इथे चालत असे. मिथिला विद्यापीठात शिक्षणासाठी आलेल्या विद्यार्थ्याने आपली पोथी लिहून घ्यायची व दीक्षांताच्या वेळी ती विद्यापीठाला अर्पण करायची ही परंपरा होती.

नागवी शिलालेख, उडिपी शिलालेख, चिदंबर शिलालेख, श्रीरंगम् शिलालेख, इत्यादी शिलालेखांतही ग्रंथालयांचे उल्लेख सापडतात.

इ. स. दुसऱ्या शतकात चीनमध्ये कागदाचा शोध लागला आणि टिकाऊ, हलक्या आणि हालवायला सोप्या अशा साधनाचा शोध आस्ते आस्ते सर्व जगाला लागला. कागदाचा शोध लागण्यापूर्वी ग्रंथसंग्रह हलवणे व संभाळणे जिकिरीचे काम असे. चीनने तर मुद्रणकलाही आणली. लाकडी ठोकळ्यात किंवा चिकण मातीच्या खापरात अक्षरे कोरून छपाई करायला चिनी लोक शिकले व जगाला एका महत्त्वाच्या क्रांतीच्या टप्प्यावर त्यांनी आणून सोडले. यातून पुढे मुद्रणकलेची प्रगती जी झपाट्याने होत गेली ती पाहता जगाचा चेहरामोहराच तिने बदलून टाकला. एकाच वेळी अनेक प्रती मिळण्याची सोय झाली. नक्कल करताना वेगवेगळ्या नकलांमध्ये वेगवेगळ्या चुका होण्याची भीती लोप पावली. लिहिण्याचे, नक्कल करण्याचे कष्ट वाचल्याने ग्रंथवाचकाची महत्त्वाची अशी सोय तर झालीच, पण नक्कल करण्यासाठी येणारा खर्च छापील ग्रंथामुळे अत्यंत अल्प झाला. ज्ञान सर्वांना खुले झाले ते छपाईमुळेच! जगात ही घटना ग्रंथव्यवहाराच्या इतिहासात ऐतिहासिक अशी आहे.

### मुद्रणपूर्व पुस्तकनिर्मितीची प्रक्रिया

पुस्तक आणि ग्रंथ यांमध्ये थोडा फरक करण्याचा कल दिसून येतो. ग्रंथ म्हणजे जाडजूड वैचारिक साठा असणारा असा, तर पुस्तक म्हणजे पुस्तिका, साधा सोपा विचार मांडणारा, असा फरक सर्वसाधारण करतात. पण मूळ 'पुस्तक' हा शब्द संस्कृत वाङ्मयात सापडत नाही. संस्कृत भाषेने तो स्वीकारला तरी तो मुळचा इराणी शब्द आहे. 'पोस्त' या शब्दावरून तो आला. पोस्त याचा इराणी भाषेत कातडे असा अर्थ आहे. कातड्यावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांचा जो इतिहास मागे आलाय त्याच्याशी हा संबंध लावला तर त्याचे स्वरूप लक्षात येईल. ग्रंथ म्हणजे जोडणे, ओवणे, जुळवणे अशा धातूपासून त्याची व्युत्पत्ती सापडते. जोडणे, ओवणे म्हणजे पुस्तकाची निर्मिती ! ही निर्मिती कशी होत असे ?

मुद्रणपूर्व काळातही पुस्तक तयार करण्याची विशिष्ट पद्धत होती. भारतात गाईचे, हरणाचे कातडे पुस्तकासाठी निषिद्ध मानले आहे. पण पोथीची लांबी, रुंदी किती व कशी

असावी ते सांगितले आहे. हरिवंशात त्याचे प्रमाण दिले आहे.

''मानं वसे पुस्तकस्य शृणु देवि समासतः।

मानेनाऽ पि फलं विद्यादमाने श्रीहंता भवेत ॥

हस्तमात्रं मुष्टिमात्रमाबाहु द्वाऽशांगुलम्

दशांगुल तथाऽष्टौच तत्यो हीनं न कारयेत ॥''

याचा अर्थ असा आहे की, ''देवी, पुस्तकाचे थोडक्यात मोजमाप सांगतो ऐक ! ठराविक मोजमाप घेतल्याने पुस्तकाची शोभा वाढते, योग्य मोजमाप न घेतल्याने पोथी बेढब दिसेल. पुस्तकाची लांबी, एक हात, रुंदी मुठभर, बारा अंगुळे, दहा अंगुळे किंवा आठ अंगुळे घ्यावी. याहून कमी घेऊ नये.''

आधुनिक काळात लेआऊट डिझायनिंगची संकल्पना फार महत्त्वाची मानली जाते, त्याचा हा आरंभबिंदू मानता येईल. मत्स्य पुराणात, उत्तम लेखक कुणाला म्हणावे हे सांगताना, अक्षरांना मात्रा द्याव्या, ती पुरी लिहावी, त्यांचे वळण एकसारखे व ती एकाच सरळ ओळीत लिहिली जावीत अशा सूचना दिल्या आहेत. मुद्रणाच्या कालखंडात अक्षरजुळणी करताना जो विचार केला जातो, त्याच्याशी हे नाते किती जवळचे आहे हे लक्षात येईल.

पुस्तकाची बांधणी हा महत्त्वाचा टप्पा. ग्रंथ टिकवण्यासाठी उत्कृष्ट बांधणी असणे आवश्यक असते. देवी पुराणात त्याचेही तपशील सापडतात. 'ताडपत्राचा समान संच तयार करुन दोन्ही बाजूंनी झाडाच्या सालीचे तांबडे अथवा काळे आवरण घालून ते नीटनेटके सुताने बांधलेले असावे.

पुस्तकाची छपाई टप्पाटप्पाने होत असते. तशाच प्रकारे पूर्वी पुस्तकाच्या लेखनाचेही टप्पे ठरवण्यात आले होते. वह्निपुराणात असे नमूद केले आहे की 'पहिल्या दिवशी फक्त पाच श्लोक लिहावेत. हे पाच श्लोक लिहून झाल्यावर मग थांबण्यास हरकत नाही'

मुद्रणकलेच्या साह्याने झालेली पुस्तकनिर्मिती आणि हाती तयार झालेली पुस्तके यांत किती काटेकोरपणा होता याची साक्ष तर यावरून मिळतेच, पण कशीही लिहून काढलेली पुस्तके असे त्यांचे स्वरूप नक्कीच नव्हते. त्या पाठीमागे एक शास्त्र होते, साधकबाधक विचारही होता.

## मुद्रणकलेनंतरची पुस्तके

मुद्रणकलेचा शोध लागल्यानंतर तिचा विकास झपाट्याने होत गेला. एक रंगी छपाई, चार रंगी छपाई, कागदी बांधणी, पुठ्ठा बांधणी अशा विविध स्वरूपांत पुस्तके उपलब्ध होऊ लागली. क्राऊन, डेमी, रॉयल आकारही मुद्रण कलेमुळे प्राप्त झाले. एकत्रपणे चार, आठ, सोळा, चौसष्ट पानांची छपाई करणे वेळोवेळी विकसित होत गेले.

पुस्तकांनाही अनेक प्रकार प्राप्त होत गेले. पाठ्य पुस्तके, संदर्भग्रंथ, कोशवाङ्मय इत्यादी प्रकारांनुसार त्यांची निर्मिती होत आली आहे. टिकाऊपणा हा महत्त्वाचा निकष मानण्यात आला. वापर हा त्याचा दुसरा निकष ठरवण्यात आला.किती वाचक ग्रंथ हाताळणार आहेत, हे लक्षात घेऊन कागद, बांधणी यांचा विचार केला गेला आहे. पाठ्यपुस्तकादी प्रकारात कमी आयुष्य गृहीत धरले आहे. परवडेल अशी स्वस्त किंमत हाही निकष त्यासाठी वापरला जातो. ग्रंथालयात पुस्तकनिवडीच्या क्रियेत या निकषांना फार महत्त्व दिले गेले आहे. कोशवाङ्मय दीर्घकाळ टिकेल असे आहे किंवा नाही ते पाहिले जाते. पुस्तकाचा कणा कितपत टिकाऊ आहे, बांधणी किती मजबूत आहे, कागद जाड आहे की नाही हे पाहणे ग्रंथालयांनी महत्त्वाचे मानले.

प्रथम मुद्रकच प्रकाशक असत. तेच पुस्तकांची विक्रीही करत असत. पुढे पुढे व्याप वाढत गेल्यावर मुद्रक, प्रकाशक, विक्रेते असे तीन वेगवेगळे गट निर्माण झाले. स्वतंत्रपणे त्यांचा कारभार सुरू झाला. त्यातही प्रकाशक या गटाकडे महत्त्वाच्या जबाबदाऱ्या आल्या. लेखकाकडून लेखन करून घेणे, नवनवे विषय शोधून काढणे, त्यानुसार लेखन करवून घेणे, जे लेखन केले गेले ते तपासून घेणे, त्यावर संपादकीय संस्कार करणे, मुद्रणप्रत तयार करणे,

मुद्रणालयाकडून त्याची छपाई करून घेणे, चित्रकाराकडून योग्य ती चित्रे काढून घेणे, मुखपृष्ठ तयार करून घेणे, मांडणी रचना करून घेणे, प्रुफे तपासणे इत्यादी अनेक प्रकारची कामे प्रकाशकाला पार पाडावी लागतात. त्यामुळे लेखक, संपादक, चित्रकार, मुद्रितशोधक, मुद्रक, विक्रेते असे विविध स्तरांतील लोक प्रकाशक या गटाशी निगडित होत गेले.

पुस्तकाचेही बाह्यांग व अंतरंग असे दोन भाग पडले. अंतरंगात व बाह्यांगात वरील सर्व लोकांचा कोणत्या ना कोणत्या कारणाने सहभाग होत असतो.

अर्धशीर्षक पृष्ठ, शीर्षक पृष्ठ, इंप्रिंट पान, अर्पणपत्रिका, अनुक्रमणिका, प्रस्तावना, प्रकाशकाचे चार शब्द, लेखकाचे मनोगत, सूची, निर्देशसूची, परिशिष्टे, मुखपृष्ठ, मलपृष्ठ इत्यादी पाने पुस्तकाचे अत्यावश्यक भाग बनली आहेत. पैकी इंप्रिंट पानावर मुद्रक प्रकाशक, लेखकाचा पत्ता, प्रकाशनवर्ष, प्रकाशनस्थळ, पत्ता इत्यादी तपशील देण्यात आल्याने पुस्तकाच्या मुद्रणाचा इतिहास मिळण्याचे हमखास ठिकाण निर्माण झाले. ग्रंथालयात तालिकीकरण करताना पुस्तकातले हे पान महत्त्वाचे मानले जाते. पुस्तकाची आवृत्ती, प्रकाशनवर्ष या तपशिलाबरोबर अलिकडे प्रकाशनाचा इतिहास देण्याची पद्धत आहे. पहिल्या आवृत्तीचा तपशील, पुनर्मुद्रण इत्यादींबाबत झालेले बदल वगैरे माहिती देणे महत्त्वाचे ठरले आहे. ISBN नंबर अलिकडे सर्वच प्रकाशक देतात.

शीर्षकपानाबाबतही फार बदल झालेत. शीर्षक आकर्षक ठेवणे, रंगीत ठेवणे इत्यादी गोष्टी प्रकाशक फार महत्त्वाच्या मानतात. मुखपृष्ठ तर आकर्षक असतेच मुळी हा जणू दंडकच आहे. मुखपृष्ठावरून पुस्तकाची विक्री होते. ते उचलून घ्यावे असे असायला हवे. लोकप्रिय पुस्तकांचे प्रकाशक तर याबाबतीत अधिक जागरूक असतात.

**तंत्रज्ञानाचा 'पुस्तक' या संकल्पनेला धक्का**

ग्रंथालये सुरुवातीला केवळ संग्रह करून ठेवणे याच उद्देशाने निर्माण झाली होती. त्यामुळे ग्रंथालयांना वेळोवेळी वेगवेगळ्या नावांनी संबोधले गेले. नालंदा विद्यापीठात ग्रंथालयांना 'धर्मगंज' म्हणत, तर जैन मठात 'ज्ञानभांडार' म्हणत. दक्षिण भारतात 'सरस्वती भांडार', 'भारती भांडार', 'सरस्वती महाल' अशी नावे असत. याचा अर्थ उघड आहे. पुस्तकावरून नाव देण्याची तेव्हा प्रथा नव्हती. मोगलांनी 'किताबखाने' नाव दिले, तर पेशव्यांनी 'पुस्तकशाळा' असे ग्रंथालयांना संबोधले, कारण तेव्हा छपाईमुळे पुस्तक नावाची वस्तू अस्तित्वात होती, त्यापूर्वी होत्या त्या पोथ्याच!

मुद्रणालयाच्या तंत्रामुळे पुस्तकांची संख्या वाढली म्हणून ग्रंथालयशास्त्राचा शोध लागला, असे नव्हे. प्राचीन काळातही ग्रंथालयशास्त्राचा विचार केला गेला होता. ऑरेलियने अलेक्झांड्रियाचा जो ग्रंथसंग्रह नामशेष केला त्याबद्दल असे सांगतात की तेथे ४० निष्णात ग्रंथालयसेवक होते, गुंडाळ्या ठेवण्यासाठी लाकडी कप्पे असत किंवा चिनी मातीचे डेरे असत व त्यात हे गुंडाळे ठेवले जात असत. ग्रंथालयवर्गीकरणाचा हा फार प्राचीन अवशेष म्हणता येईल. या ग्रंथालयाचे काम करणाऱ्या सेवकांची यादीही प्रसिद्ध आहे. इजिप्तमध्येही मातीचे किंवा धातूचे डेरे वापरत असत. त्यांना बोधांकही होते असे उल्लेख आहेत.

हस्तलिखित स्वरूपात पोथ्यांचा संग्रह असणारे ग्रंथालय व मुद्रणकला आल्यानंतर पुस्तकांचा संग्रह करणारे ग्रंथालय यांत फरक नक्कीच आहे. पण पुढे जगातल्या तंत्रज्ञानादी विकासाचा फार मोठा परिणाम प्रथम 'पुस्तक' या संकल्पनेवर पडला, आणि त्यामुळे ग्रंथालयांवर त्याचा परिणाम दिसून यायला लागला. किंबहुना पुस्तक बदलले, त्यामुळे ग्रंथालये बदलली असे म्हटले तर वावगे होणार नाही.

मुद्रणाने ग्रंथांची संख्या वाढली, तरी पुस्तकातील उतारा हवा असल्यास तो लिहूनच काढावा लागत असे. पानेच्या पाने नकल करून घ्यावी लागत. त्याला दुसरा उपाय नव्हता. होता तो असंस्कृत जगातला होता. पुस्तकाची पानेच फाडून घेणे ! आजही तंत्रज्ञानाची इतकी प्रगती होऊनही सर्वच ग्रंथालयांना वाचकांच्या या रानटी प्रवृत्तीला तोंड द्यावे लागत आहे, त्याला काय म्हणावे ?

रशियन लेखक निकोलाय गोगोल यांची 'ओव्हरकोट' नावाची एक अत्यंत सुंदर कथा आहे. त्या कथेचा नायक सरकारी कर्मचारी आहे. अत्यंत गरीब, अविवाहित, तुटपुंज्या पगारात जीवन कंठणारा. कचेरीतील माणसं त्याच्यावर कामाचा बोजा टाकतच राहतात. त्याचे काम एकच. समोर आलेल्या कागदांची इमानेइतबारे नक्कल करणे. आयुष्यभर त्याने हेच केले. दुसरे त्याला जमण्यासारखेच नव्हते. इतर जनांची कामे त्याच्यावर इतर सहकारी ढकलत म्हणून त्याला अनेकदा संध्याकाळी घरी काम आणावे लागे. तो जेव्हा घरी हे काम करत असे तेव्हा त्याचे सहकारी मनोरंजनात दंग असत. बिछान्यावर पाठ टेकली तरी त्याला उद्याचीच भ्रांत असे. उद्या नक्कल करायला कोणता कागद पुढ्यात येईल याची तो कल्पना रंगवीत बसे. हे त्याचे वर्णन म्हणजे त्या काळाचे चित्र आहे. गोगोलने १८३४ ते १८४१ मध्ये सर्व कथा लिहिल्या. त्या काळात टाईपरायटरचा शोधही लागायचा होता.

टाईपरायटरमुळे अधिक प्रती मिळू लागल्याने हस्तलिखित आणि छापील प्रत यांमधली एक अवस्था निर्माण झाली. ग्रंथालयाला त्याचा विचार करावा लागला. पुढे सायक्लोस्टाईलचा शोध लागला आणि टंकलिखित स्वरूपात मिळणाऱ्या पाच सहा प्रतींची संख्या एकदम १००,२०० अशी करता यायला लागल्याने, त्याचा वापर समाजाने फार मुक्तपणे केला. ग्रंथालयात त्याही स्वरूपात साहित्य यायला लागले. पुढे झेरॉक्सचा शोध लागल्याने तर पुस्तकाच्या संकल्पनेत आमूलाग्र बदल झाला. हव्या तेवढ्या प्रती, अत्यंत कमी वेळात, जशीच्या तशी प्रत यामुळे पुस्तकालाच जणू पर्याय निर्माण झाला. मुद्रणात झेरॉक्स ऑफसेटचे तंत्रज्ञान आल्याने पुस्तकाची जशीच्या तशी प्रत कमी संख्येच्या गरजेसाठी निघू लागली. यातून 'पायरेटेड' पुस्तकांची चलती सुरू झाली. झेरॉक्समुळे आधीच कॉपीराईटच्या कायद्याला चाट बसू लागली होतीच. झेरॉक्स, झेरॉक्सऑफसेटमुळे छोट्या छोट्या समूहांना कमी पृष्ठांमध्ये आपले विचार प्रसिद्ध करता यायला लागले. त्यातून पुस्तिका, अहवाल, शोधनिबंध, भाषण, पत्रक, जाहीरनामे प्रसिद्ध होऊ लागले. ग्रंथालयांना अशा पुस्तकांचीही सोय करावी लागली. ग्रंथालयाने या साहित्याला 'ग्रे लिटरेचर' असे नाव दिले. टंकलिखित प्रती (विशेषत: प्रबंध इत्यादी) साठी 'ग्रंथेतर साहित्य' असे नाव ठेवावे लागले.

दूरध्वनीचा शोध लागल्यावर पुस्तकांची मागणी नोंदवणे त्वरित करता यायला लागले, शीघ्र संदर्भसेवा नावाची सेवा देता यायला लागली, संपर्क वाढला. माहिती जलद गतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाऊ लागली. पूर्वी जी केवळ पोष्टखात्याच्या मार्फत किंवा प्रत्यक्ष भेटीतून जात असे. आज पेजर, मोबाईल मागे पडून टेलिकॉन्फरन्सच्या माध्यमात तंत्रज्ञान आले आहे. फॅक्सची यंत्रणा अस्तित्वात आल्यावर संपूर्ण लिखित मजकूरच्या मजकूर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवता यायला लागल्यावर ग्रंथालयांना पुन्हा बदल करून घ्यायला लागला.

आकाशवाणी, चित्रपट, गाण्यांच्या तबकड्या, यांचा शोध लागल्याने पुस्तकाची संकल्पनाच बदलून गेली. पुढे तर टेपरेकॉर्डरचा शोध लागला, दूरचित्रवाणी व्हीसीआरचा शोध लागल्याने ध्वनिफीत व चित्रफीत माध्यमांतून पुस्तके निर्माण व्हायला लागली. यांना Non print book नावाची संकल्पना ग्रंथालयाने वापरली.

छापील पुस्तकांना भरपूर जागा लागले. ती कमी करण्याच्या दृष्टीनेही ध्वनिफीत/चित्रफीत उपयोगात आणता यायला लागली, तरी त्या दृष्टीने खास प्रयत्न केले गेले. मायक्रोफिश, मायक्रोफिल्म या माध्यमांतून कमीत कमी जागेत पुस्तकाची अनेक पाने जतन करता आल्याने, जागेचा प्रश्न तर सुटलाच, पण ग्रंथांचे संरक्षणही व्हायला लागले.

Non print book या माध्यमातून पुस्तके यायला लागल्याने ग्रंथालयांना फार मोठे बदल करावे लागले, तरी उपकरणांच्या जाळ्यात ग्रंथालय अडकत गेले. झेरॉक्स, टेपरेकॉर्डर, रेडिओ, प्रोजेक्टर, दूरचित्रवाणी संच, व्हीसीआर, मायक्रोफिल्मिंगरीडर, अशा अनेक उपकरणांची आवश्यकता ग्रंथालयांना भासू लागली.

पूर्वी एखाद्या शब्दकोशाबरोबर भिंगही प्रकाशकाने दिल्यास त्याचे मोठे कौतुक ग्रंथालयांना असे, आता बारीक म्हणजे किती बारीक याची स्पर्धाच सुरू झाल्याने पुस्तक बदलत आहे, बदलत जाणारही आहे.

**पुस्तकविश्वातली चौथी क्रांती**

पुस्तकाच्या जीवनात लिपीचा शोध ही पहिली क्रांती होती. कागदाचा शोध लागणे ही दुसरी क्रांती होती. मुद्रणकलेचा शोध ही तिसरी क्रांती. या तिसऱ्या क्रांतीमुळे पुस्तके आमूलाग्र बदलली. जगाचा चेहरामोहरा बदलला. आणि ५० वर्षांपूर्वी लागलेला संगणकाचा शोध ही चौथी क्रांती ठरली. संगणकामुळे तर जगाचे स्वरूप इतके बदलले, आणि बदलत जात आहे, की हा प्रवास जगाला दर क्षणाला बदलून टाकत आहे. हे बदल इतके विविध आहेत की आपण कुठे असणार आहोत, कसे असणार आहोत, आपले काय होणार आहे, अशा प्रश्नांतून आपल्या अस्तित्वाचाच प्रश्न जणू पुस्तकांना सध्या भेडसावतो आहे.

तीन क्रांत्यांनी ग्रंथालयांना समृद्ध केले. चौथ्या क्रांतीच्या पूर्वार्धातही ग्रंथालये बदलून गेली असली तरी ग्रंथालयांच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला नव्हता, उत्तरार्धात मात्र तो निर्माण झाला आहे. पुस्तकाच्या अस्तित्वाचा प्रश्न जसा गंभीर आहे, तसाच ग्रंथालयाच्या अस्तित्वाचाही प्रश्न गहन व गंभीरच आहे.

कागदच नसलेला समाज (Paperless Society) भिंती नसलेली ग्रंथालये (Libraries without walls) या संकल्पनेपर्यंत आज पुस्तके व ग्रंथालये आली आहेत. उद्या ती कशी असतील ते काहीच सांगता येत नाही, पण चौथ्या क्रांतीत निर्माण झालेल्या पुस्तकांनी खूप मोठे प्रश्न निर्माण केले. ते पहिल्या पुस्तकांपेक्षा खूप वेगळे आहेत. तो एक स्वतंत्र लेखाचाच विषय आहे.

• • •

(पान क्र. ११ वरून)

**भारतीय मूर्तिशिल्प (३)**

**मूर्तीसाठी उपयुक्त लाकूड**

भारतीयांच्या प्रत्येक कृतीला शुभाशुभाचे लफडे मागे लागलेले असते. दक्षिण दिशा प्रेताधिपाची तेव्हा ती अपवित्रच, अशुभच हा निश्चय ठामपणे झालेला. भारतीयांनी मृत्यूचे भय किती वाटते तेच यावरून दिसून येते.

झाड पाडल्यानंतर त्याच्या फांद्या तोडाव्यात व त्या करवतीने कापून त्यांच्या फळ्या व चौरस आकाराचे तुकडे करावेत. नंतर लाकूड रथात, शिबिकेत किंवा पालखीत असे ठेवावे की त्याचे अग्र पूर्व किंवा उत्तर दिशेला येईल. यासाठी प्रत्येक लाकडाचे अग्र कोठले व मुळाकडची बाजू कुठली यांच्या खुणा त्यावर करून ठेवावयास हव्या. ही लाकडे आठ, सहा किंवा कमीत कमी तीन महिने तरी कोरडी होण्यासाठी ठेवावीत व मगच त्यांना उपयोगात आणावे. यासाठी स्पष्ट नियम दिला आहे की लाकूड पूर्ण सुकलेले असावयास हवे, हे महत्त्वाचे. ते किती दिवस सुकत ठेवले त्याला इतके महत्त्व नाही. या बाबतीत घाई अजिबात करता उपयोगी नाही.

समजा लाकूड खांबासाठी वापरावयाचे आहे तर ते असे उभे करावयाचे की त्याचे अग्र वर व खालचा भाग खाली असेल. यासाठी देखील लाकडाचे अग्र व मूळ ही माहीत असावयास हवी व त्यासाठी योग्य त्या खुणा प्रत्येक लाकडावर करावयास हव्यात.

याशिवाय वास्तुरचनेसाठी जेव्हा लाकडाचा उपयोग करावयाचा असतो तेव्हा शक्य तो एकाच प्रकारच्या झाडाचे लाकूड वापरावे. ते सर्वात. उत्तम अशी वास्तू श्रेष्ठ समजली जाते. जेथे दोन प्रकारच्या झाडांच्या लाकडांचा वापर होतो ती मध्यम वास्तू व जेथे तीन प्रकारच्या वृक्षांच्या लाकडांचा वापर होतो ती कनिष्ठ वास्तू समजली जाते. तीनपेक्षा जास्त प्रकारच्या वृक्षांचे लाकूड वास्तूसाठी वापरू नये. यावरून असे म्हणता येईल की मूर्तीच्या सांगाड्यासाठी फक्त एकाच प्रकारच्या वृक्षाचे लाकूड वापरावे. याशिवाय मूर्तीच्या सांगाड्यासाठी फार जास्त लाकडे लागत नाहीत तेव्हा केवळ एकाच प्रकारच्या वृक्षाच्या लाकडांचा उपयोग यासाठी करावा असे म्हणावयास हरकत नसावी.

• • •

# "पुराभिलेखाचा अभ्यास"

डॉ. संजीव प. देसाई

प्रत्येक व्यक्तीला किंवा संस्थेला (मग ती शासकीय किंवा खाजगी कार्यालय समिती, मंडळ किंवा कोणत्याही स्वरूपात असो) स्वतःच्या उपयोगासाठी काही मजकूर लिहून किंवा नोंदून ठेवावा लागतो. हा मजकूर लिहून ठेवण्यामागे उद्देश त्या व्यक्तीचे किंवा संस्थेचे विहित कार्य मार्गाला लागणे हा जरी प्रमुख असला, तरी त्या कार्याला वैध स्वरूप देण्याच्या दृष्टीनेही हे लिखाण महत्वाचे असते. हे लिखाण हस्तलिखित, टंकलिखित किंवा छापील स्वरूपात असते. माणसाला किंवा संस्थेला हे लिखाण संदर्भासाठी, स्मरणासाठी काही काळ किंवा कधी कधी कायमही जतन करून ठेवावे लागते. या लिखाणातून मानवाचे किंवा संस्थेचे मनोगत, हेतू, कार्य व व्यवहार दृग्गोचर होतात आणि अशा प्रकारे व्यावहारिक गरजेपोटी केलेल्या लिखाणाला 'अभिलेख' म्हणतात. हेच लिखाण कालांतराने त्या माणसाचा किंवा संस्थेचा इतिहास लिहिण्यासही उपयोगी पडते. अशा इतिहासोपयोगी लिखाणालाच 'पुराभिलेख' अशी संज्ञा देता येते. हे लेखन ज्या वस्तूच्या पृष्ठभागावर केलेले असते, त्या वस्तूसहीत त्या लेखनाला 'अभिलेख' किंवा 'पुराभिलेख' ही संज्ञा प्राप्त होते. एखाद्या कागदावर महत्वाची नोंद करून ठेवली जाते तो कागद 'अभिलेख' होऊ शकतो. नुसताच कोरा कागद अभिलेख होऊ शकत नाही.

आधुनिक काळात व्यवहारात असलेले अभिलेख हे मुख्यतः कागदावरच लिहिले जातात. अगदी प्राचीन काळी कागदाचा शोध लागण्यापूर्वी लिहिण्यासाठी व चित्रे काढण्यासाठी दगड, विटा, हाडे, धातूचे पत्रे, जनावरांची चामडी, रेशमाचे कापड, काही झाडांची पाने किंवा साली, गुळगुळीत केलेल्या लाकडी फळ्या इत्यादींचा उपयोग करीत. प्राचीन लिखाण शिलालेख, ताम्रपट आणि नाणी यांमध्येही दृष्टीस पडते. पूर्वीच्या सम्राटांनी आपल्या पराक्रमाची साक्ष पटविण्यासाठी स्तंभ उभारले होते. शुभकार्यासाठी गावे दान देऊन त्याची नोंद करून ठेवली होती. अशा प्रकारचे लेखन म्हणजे इतिहासाचे अपूर्व साधन. इतिहास असा वेगळा लिहिण्याची चाल आपल्या राजांनी पत्करली नाही. पुढे मुसलमानी सुलतानांच्या दरबारांत रोजच्या हकिगती लिहिणारे सत्ताधीशांचे आत्मवृत्त लिहिणारे खास लेखक असत. त्यांनी लिहून ठेवलेल्या तवारिखांचा उपयोग इतिहासाची साधने म्हणून महत्त्वाचा. त्यांच्या अभावी त्रोटक माहिती पुरविणारे-इतिहासाची माहिती पर्यायाने सुचविणारे लेखी उल्लेख तर खास महत्त्वाचे.

कागदासारखा ज्यांचा उपयोग प्राचीन काळापासून भारतात करण्यांत आलेला आहे, अशा दोन वस्तू म्हणजे ताडपत्र व भूर्जपत्र होत. ताडपत्र हे ताडाच्या पानांचे अडीच ते दहा सेंटीमीटर पर्यंतच्या रुंदीचे तुकडे कापून तयार करीत. हे तुकडे पाण्यात उकळून नंतर ते वाळवीत. त्यानंतर कवटी किंवा शंख यासारख्या गुळगुळीत वस्तूने त्यांची पृष्ठे घोटून अणकुचीदार सळईने कोरून लिहीत. कधी कधी कोरलेल्या लेखावर काजळ लावीत व त्यामुळे कोरून लिहिलेली अक्षरे काळी होत व ती सहज वाचता येत. अशी पाने जुळवून त्यांना एक भोक पाडीत, त्या भोकातून दोरी ओवून त्यांची पुस्तके बांधीत. दुसऱ्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात ताडपत्रावर लिहिलेली पुस्तके आढळली आहेत. पण त्याच्या बऱ्याच आधी व नंतरही ती प्रचारात होती. कागदाचा प्रसार झाल्यावर त्यांचा वापर जवळ जवळ थांबला. ताडपत्रांचा उपयोग फार पूर्वीपासून दक्षिण भारतात करीत असत. त्रिवेंद्रम येथील पुराभिलेखागारात अजूनही ताडपत्रे आढळतात. ती चटईप्रमाणे गुंडाळून राखून ठेवलेली आहेत.

भूर्जपत्रे ही भूर्ज नावाच्या वृक्षाच्या सालीपासून बनवीत. त्यांच्या साली सोलून व वाळवून त्यांना तेल लावून त्याची पृष्ठे गुळगुळीत करीत. भारतातील व मध्य आशियातील जुने संस्कृत ग्रंथकार भूर्जपत्रावर लिहीत. चौथ्या शतकापर्यंत भूर्जपत्रावरील लेख सापडलेले आहेत.

कागद उपलब्ध झाल्यानंतर भूर्जपत्रे व ताडपत्रे यांचा उपयोग जवळ जवळ थांबला.

कागद तयार करण्याचा शोध प्रथम चीनमध्ये लागला, असे प्रचलित आहे. चिनी इतिहासातील नोंदणीप्रमाणे इ.स. सुमारे १०५ साली त्साई लुन यांनी कागद बनवविण्याची कृती शोधून काढली. त्याने मासे पकडण्याची जाळी व चिंध्या यांचा लगदा तयार केला. त्यानंतर या वस्तूंखेरीज इतरही काही वनस्पतींचे धागे वापरून लगदा बनविण्यास सुरुवात केली. चिनी लोक त्साई लुन यांना त्यांच्या या शोधासाठी फार मान देतात. आठव्या शतकात समरकंद येथील लढाईत जे चिनी कैदी पकडले गेले, त्यांच्यापैकी काहींना कागद तयार करण्याची माहिती होती. त्यांच्या द्वारे अरबी लोकांस ती माहिती झाली. हरुन-अल-रशीद राज्य करीत असताना इ.स. ७९३ साली बगदाद येथे कागद तयार करण्याचा कारखाना सुरू झाला. त्यानंतर कित्येक शतके युरोपला होणारा कागदाचा पुरवठा मुख्यतः दमास्कस येथूनच होत होता. त्यानंतर हळू हळू युरोपातील इतर देशांत तो गेला.

भारतावर स्वाऱ्या करणाऱ्या मुसलमानांबरोबर कागद करण्याची कला भारतात आली, असे कित्येक युरोपियन विद्वानांचे मत आहे. पण इ.स. पूर्व ३२७ च्या सुमारास अलेक्झांडरबरोबर भारतात आलेल्या निआर्कस याने हिंदू लोक रुई (कापूस) कुटून कागद तयार करतात असे लिहून ठेवले आहे. यावरून तितक्या प्राचीन काळीही भारतात कागद तयार होत असे, असे दिसते. त्याचा उपयोग मात्र विस्तृत प्रमाणात होत नसे. मुसलमानांच्या स्वाऱ्यांनंतर मात्र काश्मीरात व पंजाबात हाताने कागद तयार करण्याचा उद्योग निघाला. या काळात कागद तयार करणे ही कला मानली जात असे. उत्तर भारतात त्यावेळी हातकागद बनविण्याचे 'कागदीपुरे' बरेच होते व धंदेवाईक कागद बनविणारे 'कागझी' भरपूर कमाई करीत. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी ह्या धंद्यास, भारतात कागद तयार करण्याचे कारखाने निघाल्यामुळे उतरती कळा लागली. ब्रिटिशांचे राज्य आल्यावर आणि त्यांच्या व इतर युरोपीय देशांतील यंत्रांच्या सहाय्याने तयार झालेला स्वस्त कागद भारतात येऊ लागल्यावर भारतातील हातकागदाचा धंदा साहजिकच बंद पडत चालला.

याखेरीज लेखनाकरिता कापसाचे किंवा रेशमाचे कापड वापरत असत. याचा उपयोग फार पूर्वीपासून तो अगदी कालपरवापर्यंत केलेला आढळतो. म्हैसुरातील धनिक व व्यापारी दुकानदार ८ ते १२ इंच रुंद व १२ ते १८ फूट लांब सुती कापडाची गुंडाळी लिहिण्याकरिता वापरत असत. तीनचारशे वर्षांपूर्वीचे कपड्यावरील लिखाण म्हैसूर येथील शृंगेरी मठात, पाटणा येथील जैन भांडारांत आढळते. जेसलमेर येथील जैन भंडारांत रेशमी कापडावर लिहिलेली जैन सूत्रांची यादी जतन करून ठेवलेली आढळते. आपल्याकडे 'दासोपंतांची पासोडी' हे फार मोठे उदाहरण कापडावर लिहिलेल्या ग्रंथांचे आहे ह्या पासोडीची रुंदी ४ फूट व लांबी २० फूट आहे व संपूर्ण कापडावर मजकूर लिहिलेला आहे. ही पासोडी ४०० वर्षांपूर्वीची आहे.

आज आपल्याला उपलब्ध असलेला बहुतेक पुराभिलेख हा कागदपत्रांच्याच स्वरूपात आहे. हे पुराभिलेख म्हणजे इतिहासाची साधने दप्तरखान्यांत म्हणजे पुराभिलेखागारांत आणि खाजगी संग्रहांत पडून आहेत. खाजगी संग्रहातील पत्रेव्यवहारही तत्कालीन इतिहासाची साक्ष देण्यास पुरेशी ठरतात. दप्तरखान्यांतील साधने विविध प्रकारची असतात. त्यांत राज्यकारभाराच्या सोयीसाठी लिहिलेली पत्रे, लष्करी मोहिमा चालू असताना वरिष्ठाने दिलेली आज्ञापत्रे, प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर होणाऱ्या घडामोडींची लगोलग माहिती देणारी वर्णनपत्रे, अशी लक्षावधी पत्रे शासकीय दप्तरखान्यांत आहेत. त्याशिवाय जमीनमहसूल, इतर करांची वसुली, तत्संबंधी आर्थिक पत्रव्यवहार, गाव कारभाऱ्यांना केलेले हुकूम इत्यादी साधनांवरून कारभारातील आर्थिक उलाढाल दर्शविणारी कागदपत्रे फार मोठ्या संख्येने अद्यापही शासकीय आणि जुन्या घराण्यांतील दप्तरांत आहेत.

गेल्या ५० वर्षांत भारतातील शासकीय दप्तरखाने, संस्थानिकांची दप्तरे, सरदार, जहागिरदार, वतनदार यांची कागदपत्रे प्रसिद्ध होत आहेत. काही इतिहाससंशोधकांच्या प्रयत्नांमुळे लंडन, पॅरीस, लिस्बन, येथील साधनांच्या

संग्रहांतून नवी साधने प्रकाशात येत आहेत. आणखी कितीतरी इतिहाससाधने पुराभिलेख विभागाच्या संग्रहात आणि खाजगी संग्रहांत पडून आहेत. त्यात कोणती माहिती दडून बसली आहे, हे सांगणे अशक्य आहे. त्यांचा शोध घेणे, त्यांतून मिळणाऱ्या माहितीचा उपयोग करून इतिहास लिहिणे, आणि त्यांचे विश्लेषण करून वाचकांना जास्तीत जास्त पुराव्यांसह ऐतिहासिक माहिती मिळवून देणे, हेच इतिहासलेखकाचे काम आहे.

कागदपत्राद्वारे मिळणारी इतिहासाची साधने विविध प्रकारची आहेत. त्यात राज्यकारभाराच्या सोयीसाठी लिहिलेली पत्रे, लष्करी मोहिमा चालू असताना वरिष्ठांनी दिलेली आज्ञापत्रे, प्रत्यक्ष युद्धक्षेत्रावर होणाऱ्या घडामोडींची लागलाग माहिती देणारी वर्णनपत्रे, अशी लक्षावधी पत्रे शासकीय पुराभिलेखागारांत आहेत. त्याशिवाय जमीन महसूल व इतर करांची वसुली, तत्संबंधी आर्थिक व्यवहार, गावकारभाऱ्यांना केलेले हुकूम इत्यादी साधनांवरून कारभारांतील आर्थिक उलाढाल दर्शविणारी कागदपत्रे फार मोठ्या संख्येने अद्यापही शासकीय पुराभिलेखागारांत आणि जुन्या घराण्यांतील दप्तरांत आहेत. अनेक वतनदार घराणी आणि त्यांचे वरिष्ठ सत्तांशी झालेले व्यवहार कैफियतींच्या स्वरूपात नंतर प्रकाशित झालेले आहेत. थोर पुरुषांची चरित्रे कृष्णाजी अनंत सभासद, मल्हार रामराव चिटणीस इत्यादी बखरकारांनी लिहिली. अशा अनेक बखरी साने, खरे, राजवाडे, पारसनीस यांनी संशोधित करून प्रकाशित केल्या जेधे करीना, पटवर्धन काका, इतर घराण्यांच्या कैफियती असे विविध प्रकारचे साहित्यही मराठ्यांचा इतिहास सिद्ध करण्यासाठी प्रसिद्ध झाले. राजवाडे यांनी प्रसिद्ध केलेली मराठ्यांच्या इतिहासातील साधने, रियासतकार सरदेसाई यांनी पेशवे दप्तरांतून निवडलेली सुमारे ९ हजार पत्रे, वासुदेव शास्त्री खरे यांनी मिरजेच्या पटवर्धनांच्या दप्तरांतून निवडलेली 'ऐतिहासिक लेखसंग्रह' या नावाने १५ खंडांत प्रसिद्ध केलेली पत्रे, पेशव्यांच्या रोजनिशीतील निवडलेली पत्रे, शिंदेशाही इतिहासाची साधने, पुणे अखबार, करवीरच्या इतिहासाची साधने अशी अनेक निवडक कागदपत्रे प्रसिद्ध झालेली आहेत. त्याशिवाय होळकर, बडोद्याचे गायकवाड, नागपूरचे भोसले यांच्या दप्तरखान्यांतील विविध प्रकारची साधनसामुग्री प्रकाशात आली आहे. अप्पासाहेब पवार यांनी कोल्हापूरच्या इतिहासाला उपयोगी पडतील अशी कागदपत्रे प्रसिद्ध केली. ही सर्व सामान्यतः सतराव्या शतकाच्या मध्यापासून एकोणिसाव्या शतकाच्या पहिल्या दोन दशकांपर्यंत पावणेदोन वर्षे घडलेल्या घटना आणि त्या घडविणाऱ्या व्यक्ती यांच्या संबंधी माहिती देणाऱ्या आहेत.

या कागदपत्रांचे संशोधन करताना जाणीवपूर्वक प्रयत्न झाले तर तत्कालीन सामाजिक व्यवहाराचे विविध पैलू सापडू शकतील आणि म्हणूनच सामाजिक सतराव्या व अठराव्या शतकांचा संबंधित इतिहास नव्याने लिहिण्याची गरज उत्पन्न झाली आहे. सध्या तरी सामाजिक इतिहासाला पोषक आणि पूरक होईल अशी फार थोडी माहिती उपलब्ध आहे. सत्ताधाऱ्यांच्या पत्रव्यवहारात राजकीय स्वरूपाचे उल्लेख प्रामुख्याने केलेले असतात आणि ते स्वाभाविकच आहे. राज्यसंपादन, राज्यसंगोपन, राज्यसंरक्षण आणि राज्यविस्तार या चार प्रश्नांच्या संदर्भात राज्यकर्त्यांच्या पत्रव्यवहार होत असतो. त्यांना आपल्या प्रशासकांशी आणि सेवाधिकाऱ्यांशी या प्रश्नांच्या संदर्भातच त्या त्या वेळच्या प्रसंगांना अनुसरून आज्ञा द्याव्या लागतात. आणि त्या आज्ञांना अनुसरून जे काही घडेल, ते समजून घ्यावे लागते. मराठी राज्याच्या संदर्भात अशा स्वरूपाचा पत्रव्यवहार विपुल आहे. एकट्या पेशवे दप्तरांत म्हणजे पुण्याच्या पुराभिलेखागारांत सुमारे चाळीस हजार दप्तरे (म्हणजे रुमाल) बांधून ठेवलेले आहेत. आणि त्यांत सुमारे चार कोटी कागद असल्याचे सांगण्यात येते. एवढ्या विपुल कागद संभारांत शासकीय स्वरूपाची कागदपत्रे बहुतांशी असतील हे त्या काळच्या राज्यकर्त्यांच्या धोरणावरून लक्षात येऊ शकते. पण या प्रचंड पत्रसंभारांत तत्कालीन सामाजिक स्थिती दर्शविणारी माहितीही मिळू शकते. त्या दिशेने संशोधन मात्र झाले पाहिजे. अर्थात या सर्व साधनांचा अभ्यास अत्यंत चिकाटीच्या जिज्ञासू संशोधकांचीही छाती दडपून टाकणारा आहे. हे खरे असले तरी, यापुढच्या काळांत सामाजिक इतिहासाची साधने शोधण्यासाठी हे काम करणे अभ्यासकांना अपरिहार्य आहे.

पण केवळ पेशवे दप्तर आणि तत्सम शासकीय पुराभिलेखागारांचा विचार करणेही पुरेसे पडणार नाही. महाराष्ट्रातील अनेक ऐतिहासिक घराण्यांकडे माळ्यावर इतस्ततः पडलेली कागदपत्रे सामजिक संबंध शोधण्यासाठी बहुमोल ठरू शकतील. त्यांतूनच ग्रामसंस्थांचा कारभार, त्यांची कार्यपद्धती, त्यांत सहभागी होणारे समाजघटक यांचाही परिचय होऊ शकेल. तसेच समाजाची उपजीविकेची साधने, विविध व्यवसाय, त्या व्यवसायांच्या समस्या आणि त्या सोडविण्यासाठी यंत्रपूर्वकालातील निरनिराळ्या व्यावसायिकांनी केलेले प्रयत्न व प्रयोग हे सर्व इतिहासकाळांतील समाजजीवन समजण्यासाठी उपयुक्त ठरू शकतील. या समस्यांच्या आणि त्या सोडविण्यासाठी केलेल्या प्रयत्नांच्या अनुषंगाने ग्रामजीवनात कसे परिवर्तन घडवून येत होते, हेही लक्षात येऊ शकेल. समाजाबरोबर धर्मकारण, जातिव्यवस्था, न्यायपद्धती या सर्वांतून उद्भवणारे संघर्ष समजून घेणेही सामाजिक परिवर्तनाची गती आणि दिशा समजण्यासाठी उपयोगी पडू शकेल.

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुराभिलेखागार म्हणजे दप्तरखाना पूर्वी राजगडावर होता. संभाजीच्या वधानंतर किल्ले रायगड ही छत्रपतींची राजधानीच मुसलमानांच्या हाती गेल्यावर त्यांनी तो नष्ट करून टाकला. जिंजी येथील राजारामाच्या दप्तरखान्याची तीच अवस्था झाली. शाहूंची सुटका मोंगलांच्या कैदेतून झाल्यावर त्यांनी साताऱ्यास मराठ्यांच्या गादीची स्थापना केली व नवीन सनदा देण्यास सुरुवात केली. शाहू महाराजांच्या कारकिर्दीपासूनची सर्व कागदपत्रे पुणे येथील पेशवे दप्तरात म्हणजेच पुणे पुरालेखागारात जतन करून ठेवलेली आढळतात. पेशवे थोरले बाजीराव यांनी सन १७२९ मध्ये पुण्यात शनिवारवाडा बांधून पेशवाईचा कारभार व त्याचे सर्व दप्तर पुण्यास आणले. तेव्हापासून पुणे ही लौकिकदृष्ट्या मराठ्यांची राजधानी झाली. त्या वेळेपासून मराठी दप्तर सुसंबद्धरीत्या सापडते. इ.स. १७६४ ते १७९६ पर्यंत हे दप्तर नाना फडणिसांच्या ताब्यात नानावाड्यात असल्यामुळे ते अगदी सुरक्षित होते.

इ.स. १८०८ मध्ये शनिवार वाड्यात आग लागली. तेव्हा ते गोविंदराव काळे व बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या घरी हलविण्यांत आले. तेथेच ते ब्रिटीश सत्ता महाराष्ट्रावर सुरू होईपर्यंत होते. हे सर्व दप्तर ब्रिटिश राज्याच्या सुरवातीस एकत्रित केले गेले. इनाम कमिशनने चौकशीसाठी अनामतदारांकडील सर्व रुमाल मागवून घेतले. तसेच इतर ऐतिहासिक घराणी होती, त्यांच्याजवळचे रुमालही एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. असे एकूण ३९ हजार रुमाल, म्हणजे जवळ जवळ ४ कोटी एवढे कागदपत्र (आणि तेही मोडी लिपीत) असलेला हा दप्तरखाना महाराष्ट्र सरकारच्या ताब्यात पुणे अभिलेखागारांत आहे.

या दप्तरखान्यात किंवा पुरालेखागारात फारसी, मराठी, इंग्रजी, गुजराती व हिंदी कागदपत्रे आहेत. मराठ्यांचा पत्रव्यवहार दिल्लीच्या खिळखिळ्या होत चाललेल्या सलतनतीशी होत असे. तो मूळ फारसीत. दिल्लीची राजकारणे फारसी मराठी दोन्ही भाषांत चालत. म्हणून या पेशवे दप्तरांत फारसी कागदपत्रांचा संग्रह सापडतो. गुजरातवर मराठ्यांची सत्ता ७५ वर्षे होती. तेव्हा तेथील घडणी विभागांतील कागदपत्र व रोजकिर्दी गुजरातीत लिहिलेल्या सापडतात. असे रुमाल ७४ आहेत. सबंध हिंदुस्थानावर मराठी सत्ता कमी अधिक प्रमाणात होती. सुभेदार मराठी होते तरी कमाविसदार, कुलकर्णी वगैरे नोकरवर्ग हिंदी भाषिकच होता. तो आपापल्या गावचा खर्डा हिंदीत भरून पाठवीत असे. अशा प्रकारचे देहझाडे, आदी कागदपत्रे आपणांस पेशवे दप्तरात मिळतात. इंग्रजी पत्रव्यवहार हा पूना रेसिडेन्सी कॉरस्पॉण्डन्स् रेकॉर्डस आणि डेक्कन कमिशनर्स् फाईल्स् या नावाने पुणे पुराभिलेखागारात आहे. या सुमारे ७५२८ फाईल्स् आहेत. व त्या एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या महाराष्ट्रातील राजकीय व सामाजिक परिस्थितीचे दर्शन देतात.

पुण्याच्या पेशवे दप्तरात रोजकीर्द, घडणी, चिटणिसी, प्रांत अजमास, जमाव, असे एकूण ३६ विभाग आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची साधनसामुग्री संभाळून ठेवणारे हे पुण्याचे पुरालेखागार इतिहासाच्या अभ्यासकांना आजही भुरळ घालीत आहे.

मुंबईचे पहिले पुराभिलेखागार टाऊन हॉलजवळ मुंबई सेक्रेटरिएटच्या आसमंतांत होते. ते १८३२ मध्ये

अपोलो स्ट्रीटवरील त्यावेळच्या जुन्या इमारतीत नेले. तेथे ते सन १८७४ पर्यंत राहिले. त्या वर्षी ते सध्याच्या जुन्या सेक्रेटरिएटमध्ये हालविले गेले आणि १८८८ पासून ते सध्याच्या एल्फिन्स्टन् कॉलेजच्या इमारतीत आहे. ही इमारत प्रथम सेक्रेटरिएट रेकॉर्ड ऑफिस व गव्हर्नमेंट सेण्ट्रल प्रेससाठी बांधावयचे ठरले होते. पण प्रेससाठी चर्नीरोडला स्वतंत्र इमारत त्यावेळी बांधण्यांत आली. मग रेकॉर्ड ऑफिसबरोबर कॉलेजही येथे एकत्र नांदू लागले.

इंग्रजी राज्य महाराष्ट्रात १८१८ मध्ये सुरू झाले. त्या वेळी विज्ञानाची हालचाल युरोपात सुरू होती. विज्ञानाच्या विकासाबरोबर तेथील राजकीय व सामाजिक परिस्थिती झपाट्याने बदलत होती. इंग्रज हिन्दुस्थानचे राज्यकर्ते बनल्यावर त्यांनी युरोपातील सुधारणा हिंदुस्थानात आणण्याचा प्रयत्न केला. देशात सडका नव्हत्या, दळवळणाची जुनी साधने होती. ती सर्व बदलून देशात दळवळणाची नवी साधने निर्माण झाली. वाफ, वीज सारख्या शक्तीने गिरण्या चालू केल्या. शेती, कारखाने, नवीन उद्योगधंदे, यांची भरभराट केली. एका बाजूला शोध लागत होते, तर दुसऱ्या बाजूस साम्राज्ये, वसाहती निर्माण होत होत्या. त्या वसाहतीत व साम्राज्यांतही हे विज्ञानविकासाचे लोण जात होते. सरकारी यंत्रणा, रस्ते, शेती, दळवळणाची साधने यावर आपले लक्ष केन्द्रीत करू लागली. तारायंत्रांचा शोध लागून विद्युत् संदेशवाहक सुरु झाले. वाफेवर चालणाऱ्या इंजिनांचा शोध लागून आगगाड्या आल्या. मोटारी आल्या, दळणवळण वाढले. तसे उद्योगधंदे वाढले. लोकांची जा ये सुरू झाली. प्रवास सुखकर होऊ लागला. यंत्रावर चालणारे हातमाग आले. गिरण्या उभारल्या गेल्या. त्यांत माणसे कामाला जाऊ लागली. शेतीच्या अवजारांत सुधारणा होऊ लागली. ही नवीन विज्ञानाची अपत्ये सांभाळण्याकरिता सरकारी खाती उघडली गेली. रस्ते-बांधणी व दुरुस्तीसाठी पब्लिक वर्क्स डिपार्टमेंट, आरोग्यखाते, लोकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस खाते, जमीन महसूल कायदा, शेती, उद्योगधंदे, स्थानिक स्वराज्य अशी अनेक खाती निघाली. ह्या सर्व खात्यांनी आपापले कारभार हाकताना जो पत्रव्यवहार केला तो 'आधुनिक पुराभिलेख' या सदरात येतो.

मुंबई पुराभिलेखागारात सध्या १८,००० हस्तलिखित डायऱ्या पुठ्ठा बांधणीच्या व ४ लाख व्हॉल्यूम्स् तसेच ८० हजार छापील ग्रंथ आहेत.

याखेरीज महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात कोल्हापूर येथे (करवीर संस्थानचे पुराभिलेख), नागपूर येथे (नागपूरकर भोसल्याचे पुराभिलेख), औरंगाबाद येथे विभागीय पुराभिलेख कार्यालये आहेत. याखेरीज खाजगी संग्रहातील पुराभिलेखही त्या त्या कार्यालयांत जमा करून ठेवलेले आहेत. हे सर्व पुराभिलेख महाराष्ट्राचा मध्ययुगीन व आधुनिक इतिहास लिहिण्यासाठी बरेचसे उपयुक्त होऊ शकतील.

पण केवळ इतिहासाची साधने व कागदपत्रे कितीही महत्वाची असली, तरी ती सामान्य माणसांकडून वाचली जात नाहीत. त्या साधनसामुग्रीचा योग्य उपयोग करून आणि तत्कालीन राजकारण व समाजजीवन यांचा मागोवा घेऊन लिहिलेला इतिहास वाचला जातो. तसे पाहिले तर इतिहासाचा विशिष्ट कालखंडांत कितीही खोल जाऊन शोध घेतला तरी निरपवाद सत्य सापडले आहे, असे कोणीही छातीठोकपणे सांगू शकत नाही, आणि हेच निरपवाद सत्य आहे ! हे ध्यानात घेऊन जसजसे पुरावे मिळत जातील, नवीन कागदपत्रे उजेडात येतील, तसतसे इतिहासाचे पुनर्मूल्यमापन करीत राहणे यालाच वास्तव इतिहासाची दिशा शोधणे, असे म्हणता येईल.

• • •

# पुराणकालीन परराष्ट्रधोरण

श्री. ग. वा. तगारे

'इ.स. पूर्व ५०० ते इ.स. ५०० हा कालखंड या ठिकाणी 'पुराणकाल' म्हणून मानला आहे. या कालखंडात महाभारत आणि प्राचीन पुराणांची रचना झाली. 'कौटिलीय अर्थशास्त्र' या काळातच लिहिले गेले असे मानले जाते. या ग्रंथांचे आधारे हे विवेचन.

या कालखंडात राजसत्ताक आणि प्रजासत्ताक (ऑलिगार्की, अरिस्टॉक्रसी इ.) अशा दोन राज्यपद्धती रूढ होत्या. त्या काळात Nation-state संकल्पना रुढ झाली नव्हती. पण १) राजा (= राज प्रमुख), २) अमात्य ३) राष्ट्र (Geographical Territory), ४) दुर्ग ५) कोश, ६) बल=सैन्य आणि ७) सुहृत (Allies) अशी सात अंगे असलेली संख्या म्हणजे राज्य. सप्तांग राज्यमुच्यते। (IX. 294) अशी मनूची कल्पना होती. अग्नि, स्कन्द इ. पुराणांचेही तसेच मत होते. स्वामी (= राजा, राजप्रमुख) याचे अंगी कोणते गुण असावेत याची यादी स्कंद व इतर पुराणांत आढळते. तसे आदर्श राजे प्राचीन काळी होते असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. पण परराष्ट्रधोरणाच्या यशस्वीपणात अमात्य, कोश, बल इत्यादींचा महत्त्वाचा वाटा असल्यामुळे परराष्ट्रधोरणाच्या अनुषंगाने त्यांच्या विषयी पुराणकालीन अपेक्षा काय होत्या यांचा प्रथम परामर्श घेऊन नंतर परराष्ट्रधोरणाचा विचार करू.

**अमात्य :**

राज्यपद्धती कोणतीही असली तरी तिच्यात अमात्यांना किंवा मंत्रिमंडळाला महत्त्वाचे स्थान होते. अमात्य मंडळ हे अर्वाचीन मंत्रिमंडळाचे पूर्वरूप होते. अमात्यांच्या साह्यानेच राज्य चालवणे शक्य असते. (सहायसाध्यं राजत्वम्) असे कौटिल्याने म्हटले आहे. शुक्रनीती सांगते : '' मनुष्य सर्वज्ञ नसतो. निरनिराळ्या लोकांमध्ये भिन्न भिन्न बुद्धिवैभव असते. म्हणून राजाने राज्याच्या अभिवृद्धीसाठी मंत्रिमंडळ निवडावे. मंत्रिमंडळाशी सल्लामसलत न करता (राज्य कारभार केला) तर राज्याचा निश्चितपणे नाश होईल.''

पुरुषे पुरुषे भिन्नं दृश्यते बुद्धिवैभवम्।<br>
न हि तत् सकलं ज्ञातुं नरेण केन शक्यते ?<br>
अतः सहायान् वरेद् राजा राज्याभिवृद्धये।<br>
विना प्रकृतिसंमंत्राद् राज्यनाशो भवेद् ध्रुवम्॥

- शुक्रनीति॥

स्कंद पुराणात 'मंत्री' या अर्थी 'अमात्य', 'सचिव' हे पर्याय वापरले असून त्यांचा दर्जा दाखविण्यासाठी त्या हुद्द्यापूर्वी महा-मुख्य, प्रधान-ही विशेषणे लावीत. मंत्रिमंडळात सर्वश्रेष्ठ स्थान महामात्य आणि राजपुरोहित किंवा पुरोधा यांचे असे. आणि महामात्य आणि राजपुरोहित यांच्या मध्ये राजपुरोहित अधिक श्रेष्ठ मानला जाई. तो जवळ जवळ राजाच्या दर्जाचा आहे असे मानले जाई. स्कंद पुराण म्हणते :

राजोपजीविनां श्रेष्ठौ राजामात्य पुरोहितौ।<br>
तयोः राजसमः पूज्यः पुरोधाः शास्त्रसंमतः॥

अमात्यांच्या खातेवाटपाची तत्त्वे किंवा प्रथा याबद्दल निश्चित माहिती नाही. मनू, शुक्र, यांच्या मते मंत्र्यांची संख्या आटोपशीर -सात किंवा आठ असावी. मनू म्हणतो : सचिवान् सप्तचाष्टौ वा कुर्वीत सुपरीक्षितान्।

प्रत्येक जिल्ह्याचा किंवा प्रांताचा प्रतिनिधी मंत्रिमंडळात घेतला पाहिजे अशी राजावर सक्ती नव्हती. महाभारत आणि कौटिलीय अर्थशास्त्र यांनी मंत्रिमंडळ यापेक्षा मोठे असावे असे मत व्यक्त केले आहे. महाभारतकार चारही वर्णांचे मंत्री घ्यावेत पण ते प्रगल्भ, शूर, संपन्न, शुचि (शुद्ध) असे सुपरीक्षित असावेत असे सांगतात. भीष्मांनी ४ ब्राह्मण, १८ क्षत्रिय, २१ वैश्य आणि ३ शूद्र असलेले मंत्रिमंडळ असावे असा सल्ला दिला आहे.

चतुरो ब्राह्मणान् वैद्यान्, प्रगल्भान् स्नात्कान् शुचीन् ।
क्षत्रियान् दशचाष्टौच बलिनः शस्त्रपाणिनः ॥
वैश्यान् वित्तेन् संपन्नान् एकविंशतिः संख्या ।
त्रींश्च शूद्रान् विनीतांश्च शुचीन् कर्मणि पूरके ॥

-म.भा. शान्ति, राज धर्म 85.7-8

या यादीतील प्रत्येक वर्णाची वैशिष्ट्ये ज्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने आढळतात. अशीच माणसे निवडावीत असे त्यांच्या विशेषणांवरून दिसते. 'मंत्र्यांची निवड पात्रते वरून करावी, जातीवरून किंवा घराण्यावरून करू नये. फक्त भोजन आणि लग्न याबाबतीतच जातीचा विचार करावा असे शुक्राने स्पष्ट सांगितले आहे.

न जात्या न कुलेनैव श्रेष्ठत्वं प्रतिपद्यते ।
विवाहे भोजने नित्यं कुलजाति विवेचनम् ॥

- शुक्र II.54

सेनापती किंवा सैनिक निवडताना ते शूद्र आहेत का म्लेंछ आहेत का संकर जातीचे आहेत हा विचार न करता, ते स्वामिभक्त, आपापल्या धर्मांप्रमाणे वागणारे, आपल्या शत्रूंचा द्वेष करणारे किंवा शत्रूंना सामील नसणारे असावेत:

स्वधर्म-निरता नित्यं स्वामिभक्त-रिपुद्विष : ।
शूद्रा वा क्षत्रिया वैश्या म्लेच्छाः संकर संभवाः ।
सेनाधिपाः सैनिकाश्च कार्या राज्ञा जयार्थिनी ॥

त्या काळाच्या मानाने हा दृष्टिकोन प्रगतिशील नाही का ?

**परराष्ट्रधोरण :**

मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने परराष्ट्रधोरण ठरते. तेव्हा येथे परराष्ट्रधोरणाचा विचार करणे औचित्यपूर्ण होईल. परराष्ट्रधोरणाची ही चर्चा १५०० वर्षांपूर्वीच्या भारताची आहे. अर्वाचीन काळातील उदाहरण घेतले तर सर्व बाबतीत लागू पडेल असे नाही. प्रत्येक राष्ट्राची सरहद्द दुसऱ्या राष्ट्रांच्या सीमांना लागून असते. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला आपल्या परिस्थितीप्रमाणे व कुवतीप्रमाणे आपले धोरण ठरवावे लागते. पूर्वी 'राष्ट्र' शब्द राज्याचा (National territory) एक भाग किंवा अंग म्हणून वापरत. राज्य म्हणजे विष्णुधर्म सूत्रात(III33) सांगितल्या प्रमाणे : ''स्वामी (राजा), अमात्य, दुर्ग, कोश, दण्ड(सैन्य), राष्ट्र (भौगोलिकस्थान Territory) आणि मित्र या सात प्रकृतींनी (अंगांनी) मिळून राज्य होते. 'सप्तांगं राज्यमुच्यते' असे मनूने म्हटले आहे (IX 294) .

परराष्ट्रधोरणाच्या दृष्टीने जास्तीत जास्त मित्र राष्ट्रांचे सहकार्य असणे जरूर असते. पण राजकारणात कुणी कुणाचा मित्र नसतो अगर शत्रू नसतो. शत्रुत्व किंवा मैत्री राष्ट्रहित ठरवते. कामंदकाने म्हटले आहे :

कारणेन हि जायन्ते मित्राणि रिपवस्तथा ।

कामकन्दकनीतिसार VIII .52

परराष्ट्र धोरणाविषयी त्या काळी मांडलेले सिद्धांत- राजमण्डल, षाड्गुण्य पद्धती-आजही विचार करण्यासारख्या आहेत. हे सिद्धांत कौटिलीय अर्थशास्त्र(VI.2 आणि VII), मनुस्मृती (VII.154-210) , याज्ञवल्क्य स्मृती (1345-348) अग्निपुराण , नीतिवाक्यामृत(317-343) इत्यादिं मध्ये मांडले आहेत. यांपैकी नीतिवाक्यामृताने कौटिल्याचे मत मांडले आहे. यांत महत्वाचा ग्रंथ कौटलीय अर्थशास्त्र. त्यावेळी राजसत्ता दृढमूल झाल्यामुळे राजसत्ता डोळ्यासमोर ठेवूनच हा ग्रंथ लिहिला गेला आहे. त्यामुळे राजा हा सत्तेचे केंद्रस्थान होता. 'राजा' या संज्ञेचा अर्थ 'विजिगीषु राजा' किंवा नुसता 'विजिगीषु'. 'विजिगीषु' कोण हे सांगताना कामंदक म्हणतो : '' जो प्रकृतींचे बाबतीत म्हणजे राज्याच्या कोश, दंड इत्यादि अंगांच्या बाबतीत संपन्न असतो, अत्यंत उत्साही, परिश्रम करणारा असतो आणि ज्याला विजयाची नैसर्गिक महत्त्वाकांक्षा असते आणि त्याला 'विजिगीषु' म्हणतात.

संपन्नस्तु प्रकृतिभिः महोत्साहः कृतश्रमः ।
जेतुमेषणशीलश्च विजिगीषुरिति स्मृतः ॥

-कामन्दक VIII-6

''राजकारण जाणणारा (नयज्ञः), प्रकृती म्हणजे राज्याच्या अंगरूप संपत्तीने युक्त असेल, अशा राजाचे राज्य

लहान असले तरी तो आपले राज्य कमी होऊ देत नाही. इतकेच नव्हे तर सर्व पृथिवी जिंकतो' असे कौटिल्याने सांगितले आहे.

आत्मावन् स्वल्पदेशोऽपि युक्तः प्रकृतिसंपदा।
नयज्ञः पृथिवीं कृत्स्नां जयत्येव न हीयते ॥

-कौटिलीय अर्थशास्त्र ६.१.१८

कौटिल्याने हा श्लोक अवतरण म्हणून घेतला आहे त्यावरून हे मत त्याच्या पूर्वी रूढ होते असे दिसते.

२. परराष्ट्रधोरणाच्या चर्चेत दुसरी संज्ञा 'अरि' (=शत्रू). राज्याभोवती सीमेला सीमा लागून युद्ध पुकारले असेल किंवा नसेल सुद्धा पण सीमेला लागून असणाऱ्या राजांना (राष्ट्रांना) 'अरि' म्हटले आहे. पण नीतिवाक्यामृतकारानी अरित्व किंवा शत्रुत्व हे भौगोलिक स्थानावर अवलंबून नसते, त्या त्या राजांच्या हेतूवर, धोरणावर किंवा उद्देशावर अवलंबून असते असे म्हटले आहे.

कार्य मित्रत्वामित्रत्वयोः, कारणं न पुनः विप्रकर्ष- संनिकर्षौ।

-नीतिवाक्यामृत्त (षाड्गुण्या P-121)

कौटिल्य अमित्र किंवा शत्रू कोण ही व्याख्या देऊन थांबत नाही, त्याचा बंदोबस्त कसा करावा हे सांगतो. शत्रूंचे किंवा अरींचे वर्गीकरण करताना तो म्हणतो :

१) अरी संकटात सापडला तर त्याच्यावर चालून जाण्यास योग्य तो यातव्य. २) ज्याला दुर्ग किंवा मित्र यांचा आश्रय नाही किंवा ज्याचा आश्रय दुर्बल आहे असा 'अरी' उच्छेदनीय (समूळ नाहीसा करण्यास योग्य) ३) जर अरीला आश्रय बलवान असेल तर तो पीडनीय (त्रास देण्यास योग्य) किंवाकर्शनीय (दुर्बल करण्यास योग्य) असतो. अशा रीतीने कौटिल्याने अरींचे १) यातव्य २) उच्छेदनीय ३) पीडनीय आणि ४) कर्शनीय असे चार प्रकार वा वर्गीकरण केले आहे (कौट. अर्थ. ६.२.१७) याज्ञवल्क्यस्मृति १.३४५ 'मिताक्षरा' टीकेत असेच वर्गीकरण आहे.

'पार्ष्णिग्राह' म्हणजे 'पिछाडीचा शत्रू' विजिगीषु (राजा) मोहिमेवर गेला असता किंवा मोहिमेवर निघण्याचे वेळी राज्याला उपद्रव करणारा

यो विजिगीषौ प्रस्थितेऽपि प्रतिष्ठानमाने
वा पश्चात् कोपंजनयति स पार्ष्णिग्राहः ।

- नीतिवाक्यामृत P-319

३. मध्यस्थ :

अरी आणि विजिगीषू यांच्या राज्यांना राज्य लागून असणारा पण अरी आणि विजिगीषू एकत्र झाले असता किंवा एक झाले नसता त्यांना मदत करण्यास समर्थ अन् अरी आणि विजिगीषू या दोघानी एकत्र होऊन चढाई केली असता त्यांचे दमन करण्यास समर्थ असलेला राजा.

अरि-विजिगीष्वोः भूम्यन्तरः संहत-असंहतयोः अनुग्रह समर्थः, विग्रहे वा असंहतयोः ।

-कौटि. अर्थशास्त्र ६.२२

४. उदासीन :

'उदासीन' म्हणजे विजिगीषु, अरी आणि मध्यस्थ यांच्या राज्यांच्या बाहेर असलेल्या, वर उल्लेखलेल्या राज्यांच्या प्रकृतीपेक्षा (राज्यांच्या अंगापेक्षा) अधिक बलवान् असलेला, ते तिघे एकत्र आले असताना किंवा नसताना त्यांना मदत करण्यास समर्थ आणि त्या तिघांची एकजूट झाली तर तिघांचेही दमन करण्यास समर्थ. उदाहरणार्थ आजच्या जागतिक परिस्थितीत 'युनायटेड स्टेट्स् ऑफ अमेरिका'. कौटिल्य म्हणतो : " अरि-विजिगीषु मध्यानां बहिः प्रकृतिभ्यो बलवत्तरः संहत-असंहतानां अरि विजिगीषु मध्यमानां अनुग्रहसमर्थः निग्रहे च सहेतानामुदासीनः ।

-कौटि. अर्थशास्त्रVI.2.22

परराष्ट्रधोरण - काल आणि आज :

प्राचीन ग्रंथांच्या आधारे मी जे विवेचन करीत आहे ते आपल्या दृष्टीने उद्बोधक असले तरी ते आजच्या भारताला लागू नाही. कौटिल्याने मांडलेली राजमण्डलांची

कल्पना, शक्तित्रय, षाड्गुण्य हे विजिगीषू राजाला उद्देशून केलेले आहे. भारत विजिगीषू नसल्यामुळे त्याला ते लागू नाही. याआधी कामंदकाने दिलेल्या विजिगीषू राजाच्या व्याख्येतील दोन महत्त्वाच्या लक्षणांत आपण कमी पडतो ती लक्षणे म्हणजे 'संपन्नस्तु प्रकृतिभिः' आणि 'जेतुं एणशीलस्य'. यापैकी प्रकृती म्हणजे अमात्य, राष्ट्र, दुर्ग, कोश, बल आणि सुहृत्. अस्थिर मंत्रिमंडळामुळे आम्ही मंत्रशक्तीत(Statecraftमध्ये) कमी पडलो. आमचे सैन्यबळ चांगले मजबूत असूनही, आम्हाला इतक्या वर्षात ईशान्य आणि वायव्य प्रान्तांत शांतता प्रस्थापित करता आली नाही. कारण आपले मंत्रबळ कमी पडले.

राष्ट्र म्हणजे भूभाग (Territory). स्वातंत्र्यप्राप्तीचे वेळी आपल्या वाटणीला आलेल्या प्रदेशापैकी काही प्रदेश आम्ही गमावला आहे. पण तो परत मिळवू शकलो नाही हा आपण मंत्रबळात कमी पडल्याचा पुरावा नाही का? भारतीय सैनिक शूर आहेत हे शत्रू देखील मान्य करतात. दुसऱ्या महायुद्धात भारतीय सैन्याने रणांगण गाजवले. पण त्या सैन्याला १९६२ मध्ये कमीपणा आला हे आपले मंत्रबळ कमी पडल्याचे चिह्न आहे.

तीच गोष्ट कोशाची-आर्थिक मजबुतीची. दुसऱ्या महायुद्धात उद्ध्वस्त झालेली जर्मनी, जपानसारखी राष्ट्रे ४० वर्षात आर्थिक दृष्ट्या अमेरिकेला आव्हान देण्याइतपत प्रबळ होतात. आणि आपल्याला दुसऱ्या महायुद्धातील विध्वंसाची फारशी झळ पोहोचली नसताना सुद्धा आपण कमालीचे कर्जबाजारी झालो आहोत.

दंडशक्तीपेक्षा मंत्रशक्ती प्रबळ असते हे प्राचीन भारतीयांचे मत विचार करण्यासारखे आहे असे मला वाटते.

**परराष्ट्रधोरण : मंडल-सिद्धांत :**

कालाचा संदर्भ बदलला म्हणजे प्राचीन विचारवंतांची मते वा सिद्धान्त कसे बदलावे लागतात याचे उदाहरण म्हणजे कौटिल्याचा मंडलसिद्धान्त. कौटिल्याने राज्यांच्या भौगोलिक स्थानावरून व्यवहारज्ञानावर आधारलेला हा सिद्धान्त आहे. त्याच्या मते सीमेला लागून असणाऱ्या राज्यांत स्पर्धा वा वैर असणे स्वाभाविक असते हे त्याचे पहिले गृहीतकृत्य आणि दुसरे गृहीतकृत्य शत्रूचा जो शत्रू तो आपला मित्र. कौटिल्याने १) विजिगीषू राजा हा मध्य कल्पून २) त्याचा शेजारी असणारा राजा त्याचा शत्रू आणि त्याच्या शत्रूच्या पलीकडील राजा हा शत्रूचा शत्रू म्हणजे विजिगीषू राजाचा मित्र असे एकापलिकडले एक असे सहा राजे घेतले आहेत.

तसेच विजिगीषू राजाच्या (राज्याच्या) पिछाडीस असलेला 'पार्ष्णिग्राही' -शत्रू असून त्याच्या पलिकडे असणारा विजिगीषू राजाचा मित्र असे सहा राजे अनुक्रमे शत्रु-मित्र मानले आहेत. कौटिल्याने विजिगीषू राजाच्या पुढे आणि मागे असे बारा राजांचे राजमंडल कल्पिले आहे. कामंदकाने यावर आक्षेप घेतला की व्यवहारात असे आढळत नाही. सीमेला असणारी राज्ये (राजे) मित्र असू शकतात. याचे अर्वाचीन उदाहरण फ्रान्स आणि जर्मनी यांच्या स्नेहाचे. फ्रेंच सेना जर्मन प्रदेशात आणि जर्मन सेना फ्रेंच प्रदेशात ठेवण्याचा निर्णय हा कौटिलीय राजमंडलाला अपवाद ठरला आहे. स्वित्झर्लंड आणि त्याच्या शेजारचे देश यांचे शतकानुशतके मैत्रीचे संबंध आहेत आणि त्या देशात फ्रेंच, जर्मन आणि इटालियन या तीन भाषा बोलणारे लोक असूनही त्या देशाचे ऐक्य अबाधित राहिले आहे. पाकिस्तान हे भारताशी परकीयांमार्फत लढाई करते (War by proxy) म्हणून जर ते शत्रुराष्ट्र मानले तर त्याच्या पलिकडील अफगाणिस्थान मित्रराष्ट्र असावयास हवे. पण शीख आणि हिंदू अफगाण नागरिक निर्वासित होऊन भारतात येत आहेत हे काय मैत्रीचे लक्षण आहे?

कौटिल्याने राजमंडलाची मांडणी दुसऱ्या प्रकाराने केली आहे, ती अशी :

१) विजिगीषू राजा - त्याचा मित्र-त्याच्या मित्राचा मित्र

२) शत्रू-शत्रूचा मित्र-त्याच्या मित्राचा मित्र

३) मध्यस्थ-त्याचा मित्र-त्याच्या मित्राचा मित्र

४) उदासीन-उदासीनाचा मित्र-त्याच्या मित्राचा मित्र

**षाड्गुण्य :**

'वातव्याधी' या कौटिल्यपूर्व आचार्यांनी विजिगीषू

राजा प्रबळ होण्यासाठी १) संधी आणि २) विग्रह असे दोनच उपाय किंवा गुण मानले आहेत. १) संधी म्हणजे काही अटींवर केलेला समझोता किंवा तह आणि २) विग्रह म्हणजे युद्ध . तो म्हणतो :

संधिविग्रहाभ्यां षाड्गुण्यं संपद्यते ।

षाड्गुण्य म्हणजे परराष्ट्र व्यवहारात उपयुक्त असणारे सहा गुण किंवा उपाय. हे सहा गुण किंवा उपाय पुढीलप्रमाणे आहेत : १) संधी (तह करणे), २) विग्रह (युद्ध करणे), ३) आसन (स्वस्थ राहणे), ४) यान (चढाई करणे), ५) संश्रय(आश्रयाला जाणे), ६) द्वैधीभाव (एकाशी तह करून दुसऱ्याशी युद्ध पुकारणे). परिस्थितीच्या भेदामुळे (अवस्थाभेदात्) हे प्रकार भिन्न आहेत असे कौटिल्याने म्हटले आहे. ह्या षाड्गुण्याचे उल्लेख पुराणग्रंथातही आढळतात. उदाहरणार्थ स्कंद पुराणाच्या काशीखंडात (IV 44.68) राजा दिवोदास षाड्गुण्यात श्रेष्ठ तज्ज्ञ होता असे म्हटले आहे.

संधि-विग्रह-यानास्ति (अस्ति=आसना) संश्रयं द्वैतभावनम्।
यथा स राजा संवेत्ति न तथा अत्रापिकश्चन ॥

कौटिल्याने परराष्ट्रव्यवहाराची चर्चा (अधिकरण ७ मधील ९८ प्रकरणापासून प्रकरण १२६ -कंगले मराठी अनुवाद (पृ. १७२ ते ४५५) पुढे विग्रह (युद्ध) विषयक प्रकरणे १३५ ते १५९ (कंगले-पृ.४८२ -५४१), संघराज्याबद्दल धोरण (प्रकरणे १६० ते ६१) आणि बलहीन राजा विषयी (प्रकरणे १६२- १७०, पृ. ५४२ -५६१) अशी तपशीलवार चर्चा केली आहे. तो विषय इतका मोठा आहे की तो एका मालेचा विषय होईल.

### षाड्गुण्याविषयी-कौटिल्यमत

कौटिल्याच्या षाड्गुण्यविषयक विवेचनाचा सारांश सूत्ररूपाने असा सांगता येईल :

### १) संधी :

षाड्गुण्यातील पहिला गुण 'संधी'. दुर्बल राजाला संधी (तह) करणे आवश्यक असते. संधीच्या अटींत काही सैन्य प्रबळ राजाच्या दिमतीला द्यावे अशी अट असेल तर तो 'दण्डोपनत' संधी होय. तहात खंडणी देण्याचे ठरले असेल तर तो 'कोशोपनत' संधी आणि दुर्बळ राजाने आपला काही मुलूख तोडून दिल्यास त्याला 'देशोपनत' संधी म्हणतात. कौटिल्याच्या मते तहाच्या अटी पाळण्यात चुकारपणा करणे किंवा तह मोडण्याचा प्रयत्न करणे राजमान्य आहे आणि कौटिल्याची त्याला संमती आहे. राजपुत्राला ओलीस ठेवल्यास त्या राजपुत्राने निसटून कसे जावे याबद्दल कौटिल्याने मार्गदर्शन केले आहे.

### २. विग्रह :

परराष्ट्रधोरणाचा पाया लष्करी सामर्थ्य आहे असा त्रिकालाबाधित सिद्धान्त आहे. यासाठी कौटिल्याने युद्धविषयक स्वतंत्र अधिकरण (प्रकरण १४७ ते १५९) दिले आहे. आता युद्धशास्त्र इतके प्रगत झाले आहे की त्या काळच्या तपशीलवार सूचना आता कालबाह्य झाल्या आहेत. पण त्या काळी कौटिल्याने राजकारणाचा एक भाग म्हणून युद्धशास्त्राचा किती सखोल विचार केला होता, याचा ते प्रकरण म्हणजे पुरावा आहे. तथापि त्याचा आजही मानण्याजोगा सल्ला म्हणजे इतर उपाय शक्य असतील तर युद्ध टाळावे. शत्रुसेनेचा नाश करण्यासाठी त्याने औषधी, मंत्र इत्यादींचा प्रयोग करणे, गूढ पुरुषाकडून वध करविणे इ. वाममार्ग सांगितले आहेत. पण प्राचीन काळापासून आता पर्यंत सर्व राजकारणी लोक हे उपाय राजकारणात वापरत आले आहेत. त्यामुळे या बाबतीत कौटिल्याला दोष देण्यात अर्थ नाही.

मॅकियाव्हेलीने Prince (Discourses III 41) मध्ये म्हटले आहे :

" For where the safety of the country concerned depends upon the resolution to be taken, no consideration of justice or injustice, humanity or cruelty should be allowed to prevail-- But putting all other considerations aside, the only question should "What course will save the life and liberty of the country."

छोट्या छोट्या राज्यांनी तुकडे झालेल्या इटली

देशाची प्रबळ राष्ट्र म्हणून मॅकियाव्हेलीला बांधणी करावयाची होती म्हणून प्रत्यक्ष व्यावहारिक राजकारणात वावरलेल्या त्या ग्रंथकाराने हा सल्ला दिला आहे. भारतात प्रबळ मध्यवर्ती सत्ता निर्माण करण्यासाठी कौटिल्याने कठोर विवेचन केले आहे हे लक्षात येईल. स्वतःच्या खाजगी जीवनात कटाक्षाने नीतिनियम पाळणारी ही माणसे देशाच्या हितासाठी राजकारणात अशीच वागतात.

**३) आसन :**

षाड्गुण्यातील तिसरा गुण 'आसन'. 'आसन' म्हणजे बसणे, वाट पाहणे. शत्रू दुर्बल होईल अथवा संकटात सापडेल याची वाट पाहत आपले बल वाढवत जाणे. सामान्यतः शत्रूशी संधी करूनच या उपायाचा अवलंब करावयाचा असतो.

**४) यान :**

चौथा गुण 'यान' म्हणजे शत्रूवर चाल करून जाणे. विग्रहाचा अवलंब केल्यावर हे आवश्यक असते. पण संधी करून चढाई (यान) करणे याला 'संधाय यान' म्हणतात. हे विश्वासघाताचे कृत्य असले तरी प्रत्यक्षात या घटना घडत असल्यामुळे राजनीतीत याची दखल घेतली आहे. इतर राजाच्या बरोबर करार करून त्यांचे सहाय्याने शत्रूवर चाल करणे याला 'संभूय यान' असे म्हणतात. विजिगीषू राजाने विजय मिळताच मदतनिसाशी केलेले करार पाळावेत. राजाने करार न पाळल्यास इतर राजांनी काय करावे याचेही दिग्दर्शन कौटिल्य करतो.

**५) संश्रय :**

'संश्रय' म्हणजे आश्रय. बलवान् शत्रूने हल्ला केल्यास आपण एखाद्या प्रबळ राजाचा आश्रय घ्यावा पण असे करताना त्याचे मांडलिकत्व न पत्करण्याची दक्षता घ्यावी. स्वर्गीय इंदिरा गांधींनी अमेरिकेकडून धोका निर्माण होईल हे ओळखून रशियाशी परस्पर-सहकार्याचा केलेला करार हे त्याचे एक अर्वाचीन उदाहरण आहे.

**६) द्वैधीभाव :**

पण संश्रयापेक्षा 'द्वैधीभाव' हा शेवटचा गुण अधिक श्रेयस्कर. 'द्वैधीभाव' म्हणजे संधी आणि विग्रह याचा एकाच वेळी अवलंब करणे. एका किंवा अनेक राजांच्या कडून द्रव्याचे किंवा सैन्याची मदत घ्यायची आणि दुसऱ्या बरोबरीच्या विग्रहात त्यांचा उपयोग करून घ्यावयाचा हे ह्या धोरणाचे स्वरूप आहे.

**आणखी काही उपाय :**

महाभारतात आणि पुराणांत साम, दाम, दण्ड आणि भेद हे उपाय सांगितले आहेत. त्यांचा उपयोग करताना पहिला उपाय फलप्रद न झाल्यास दुसरा उपाय करावयाचा असतो आणि ही उपाययोजना करताना देश आणि काळ यांचे भान राखणे आवश्यक असते. यापैकी साम हा उपाय आर्य, गुणवान लोकांच्या बाबतीत उपयुक्त ठरतो. दान लोभी लोकांशी व्यवहार करताना, दण्ड, दुष्ट लोकांचे दमन करण्यासाठी उपयोगात आणावयाचा आणि भेद संशयास्पद वृत्तीच्या राजांशी व्यवहार करताना वापरावयाचा असतो. स्कंद पुराणामध्ये म्हटले आहे :

साम दामं च भेदश्च चतुर्थो दण्ड एव च ।
नीतौ क्रमात् प्रयोज्याश्च देशकाल विशेषतः ॥
तत्र साम प्रयोक्तव्यं आर्येषु गुणवत्सु च ।
दानं लुब्धेषु भेदश्च शंकितेष्विति निश्चयः ॥
दण्डश्चापि प्रयोक्तव्यो नित्यकालं दुरात्मसु ॥

स्कंद, माहेश्वर-कौमारिका खण्ड १६.३९.४१

**समारोप :**

आतापर्यंत आपण पुराणकालीन राज्यव्यवहाराचा विचार करताना, राज्यसत्तेची आवश्यकता संरक्षणाच्या गरजेतून निर्माण झाली हे पाहिले. राज्यपद्धतीने व्यक्तिप्रधान किंवा राजसत्ताक आणि प्रजासत्ताक वा गणराज्य अशी दोन रूपे-प्रवाह म्हणा हवे तर-धारण केली. या दोन्ही राज्यपद्धती वेदकालापासून अलेक्झांडरच्या काळापर्यंत चालू होत्या. राजसत्ताक पद्धती ही एक प्रकारच्या सामाजिक करारातून निर्माण झाली. पुराणकारांनी आणि स्मृतिकारांनी ती ईश्वरनिर्मित आहे असा भास निर्माण करण्याचा प्रयत्न केला. आपल्याकडील राजनीतिज्ञ प्रत्यक्ष राज्यकारभाराशी संलग्न

(पान क्र. ३१ वर)

# समान नागरी कायदा आवश्यक की अनावश्यक ?

श्री. गणेश खराडे

Common Civil Code म्हणजेच समान नागरी कायदा. पण हा कायदा प्रत्यक्षात कितपत दृष्टिक्षेपात आहे व देशातील किती जणांना मान्य आहे ? हा कायदा असावा असे वाटणारे व नसावा असे वाटणारे या अशा वाटणाऱ्यांमध्ये वादच आहे. समान नागरी कायदा व जीवनदृष्टी म्हणजे तरी निश्चित काय ? हा कायदा आणि इहवादी जीवनदृष्टी या संकल्पना समानार्थी आहेत काय ? तर याचे उत्तर माझ्या मते नकारात्मकच आहे. ही फक्त संकल्पनाच आहे.

समान नागरी कायदा, समान नागरी कायदा असे आपण ओरडतोय, परंतु या कायद्याची अग्रपीठिका व अंत:पीठिका यांचा आपण चाणाक्षपणे सारासार विचार केला आहे का ? आणि केला असेल तरच समान नागरी कायदा राबवण्याचा अट्टाहास धरला पाहिजे. या कायद्याबद्दल गेली कित्येक वर्षे उलटसुलट चर्चा चालू आहे. पुरोगामी धर्मनिरपेक्ष पक्ष, स्त्रीसंघटना, जमातवादी संघटना आणि राजकीय पक्ष हे सर्व या विषयावर आपापली मते मांडत आले आहेत. हिंदुत्ववादी पक्ष केवळ राजकीय स्वार्थासाठी अशा कायद्याची मागणी करीत आहेत. त्यांना मुस्लिम स्त्रीची कणव आहे म्हणून नाही. उलट पक्षी मुस्लिम जमातवादी संघटना समान नागरी कायद्याला कडवा विरोध करतात. कारण त्यामुळे त्यांच्या धर्मात ढवळाढवळ होते. जमातवादी पक्षांनी प्रतिपादन केले की व्यक्तिगत कायदे हिंदूना मारक तर मुसलमानांना पूरक आहेत. परंतु त्या त्या समाजाच्या परंपरा वेगवेगळ्या आहेत आणि विविध धर्मांच्या लोकांनी आपली संस्कृती विसरणे हा समान कायदा नव्हे. कारण संस्कृती परंपरा व त्या देशांतील एकात्मता यावरून त्या राष्ट्राचे वेगळेपण हे ओळखले जाते. आता राष्ट्र म्हणजे नेमके काय ? A nation means a group of people having common aspiration. म्हणजेच माणसाच्या ज्या समूहात एकात्मतेची भावना आहे, त्या समूहाला राष्ट्र म्हणतात. आणि ज्या प्रकारच्या समाजरचनेत स्वहिताचे संवर्धन करता येईल त्या प्रकारची समाजरचना मानवी स्वभावाशी सुसंगत ठरते. तेव्हा भिन्न स्वरूपाचा कायदा एखाद्या जमातीवर लादून त्यांचा धर्म व अधिकार हिरावून घेऊन राष्ट्रीय एकात्मतेची, अस्मितेची जपवणूक होऊच शकत नाही.

समान नागरी कायद्याची मागणी करणारे हिंदुत्ववादी या कायद्याचा नेमका तपशील देण्याची टाळाटाळ करतात. जर का आजचा हिंदू कायदा व हिंदू रुढी परंपराचा आधार सोडून विज्ञानाधिष्ठित भूमिकेवरून वैयक्तिक कायदा स्वीकारण्याची हिंदुत्ववाद्यांची तयारी नसेल तर त्यांची समान नागरी कायद्याची मागणी ही अप्रमाणिकपणाची व संधिसाधूपणाची म्हटली पाहिजे. समान कायदे हे लोकशाहीचे गमक आहे. परंतु राजकीय स्वार्थ साधण्याच्या दृष्टीने ते हानिकारकच आहे. उदा.- 'शहाबानो पोटगी प्रकरण'. शहाबानोच्या बाजूने निर्णय देऊन सर्वोच्च न्यायालयाने तिला पोटगी देण्याचा हुकूम दिला. पण निकालपत्रात सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी समर्थनार्थ कुराण व शरीयत मधले उतारे देऊन त्यावर भाष्य केले होते. तेवढेच निमित्त करून मुल्ला-मौलवींनी आणि जातीय मुस्लिम नेतृत्वाने 'इस्लाम खतरेमें' अशी आरोळी ठोकली, तेव्हा धर्मसंकट निवारण्यासाठी उद्युक्त झालेला मुस्लिम समाज पेटून उठला आणि देशात आगडोंब उसळला. मतासाठी लाचार असलेले तत्त्वशून्य राजकारणी हादरले. तेव्हा सर्व मुसलमानांची मते हातून निसटतील ह्या भीतीने त्यांनी आपली भूमिका बदलली आणि मुस्लिम जात्यंधांना चुचकारण्यासाठी घटनेतील कायदाच बदलून टाकला की कोणाच्या धर्मात ढवळाढवळ करणार नाही म्हणून.

आजची लोकसंख्या पाहून मुस्लिमसुद्धा कुटुंबनियोजन करू लागले. बहुपत्नीत्व अपवादात्मक गोष्टीत असावे व आईवडिलांच्या संपत्तीवर मुलांचाच अधिकार आहे आणि असायलाच पाहिजे. कारण मुलगा आईवडिलांना तारणारा असतो त्यांच्या मृत्यूनंतर अग्नी तोच देतो, व तो दिल्याने त्यांना मोक्ष प्राप्त होतो.

आपण म्हणतो की स्त्रियांवर अन्याय होतो पण त्यालाच स्त्रियाच कारणीभूत असतात. त्या अत्याचार सहन करतात. आज स्त्रियांच्या अन्यायाला दाद देणारी कौटुंबिक न्यायालये स्थापन झालेली आहेत. पण किती टक्के स्त्रिया त्यांत जाऊन दाद मागतात ? तेव्हा स्त्रियांना न्याय हवा असेल तर लोकविरोधी न्यायालयाकडे जाण्यापेक्षा स्त्रियांनी स्वधर्मातील अनिष्ट रुढींविरुद्ध संघर्ष करणे हेच योग्य होईल. पण नाही, कारण त्यांचा स्वधर्मावर विश्वास आहे. तेव्हा अशा वातावरणात समान नागरी कायदा हा कुचकामी ठरतो.

तेव्हा समान नागरी कायदा ही फक्त कल्पना आहे. कारण तिचा वास्तवाशी यत्किंचितही संबंध नाही, आणि असताच तर २६ नोव्हेंबर १९४९ या दिवशी घटना समितीने भारतीय घटना संमत केली व घटनेच्या ४४व्या कलमामध्ये समान नागरी कायद्याविषयी पुढे तरतूद करण्यात यावी अशी मागणी केली होती परंतु आज जवळ जवळ ५० वर्षे होऊन देखील गेली परंतु त्याबाबतीत ठोस पाऊल उचलले गेलेले नाही . आणि हे जमणे म्हणजे उत्तर ध्रुव दक्षिण ध्रुवाला जोडण्यासारखे झाले. समान नागरी कायदा म्हणजे नेमके काय ? याची संकल्पना कोणालाच कळलेली नाही. आणि उगाचच त्याचा घोळ घातला आहे. आणि हा कायदा अमलात आणायचा म्हटले तर मुस्लिमांच्या भावना दुखावतात व हिंदु कोड बील आनले तर हिंदूंवर अन्याय होतो. कारण प्रत्येक धर्म व त्याची परंपरा समाजाच्या भूतकाळाची गुलाम असते. आणि मानसिकता भूतकाळाच्या दावणीला बांधलेली असते. माझा या कायद्याला व्यक्तिगत विरोध नाही. व सर्वच गोष्टी अयोग्य आहेत असेही नाही. परंतु त्यांची दुसरी बाजू मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

हा कायदा खरोखर अस्तित्वात यावा असे वाटत असेल तर त्या दृष्टीने टाकावयाचे पाऊल म्हणजे विविध धर्मांच्या व्यक्तिगत सुधारणा करून सामाजिक वातावरण तयार करणे व सर्व जमातीतील नेत्यांनी, मुल्ला-मौलवींनी व्यक्तिगत अस्मिता व लाभ बाजूला ठेवून सर्वसामान्य जनतेचे प्रबोधन केले पाहिजे व असा कायदा हा अल्पसंख्याकांच्या मूलभूत हक्काशी सुसंगत असला पाहिजे. तेव्हा कुठे या कायद्याबद्दल ठाम असा निर्णय घेतला जाईल, अन्यथा नाही. आता तरी समान नागरी कायद्याची अंमलबजावणी म्हणजे हातांमध्ये वीज धरण्यासारखेच आहे.

• • •

(पान क्र. २९ वरून)

**पुराणकालीन परराष्ट्र धोरण**

कसा करावा, परराष्ट्र धोरण कसे आखावे इ. व्यावहारिक चर्चा केली. युरोपीय राज्यशास्त्रचर्चेचा उगम ग्रीक नगर-राज्ये (City States) कशी असावीत अशा तत्वचर्चेतून होऊन राज्यशास्त्र हे तत्वज्ञान, नीतिशास्त्र यांच्याशी संलग्न झाल्यासारखे दिसते. पुराणकालानंतर १५०० वर्षे लोटल्यामुळे काळाचा संदर्भ बदलला. जुने युद्धशास्त्र (ज्यात बल आणि दुर्ग या अंगांचा समावेश होतो ) आता कालबाह्य झाले. तथापि परराष्ट्रधोरणाच्या दृष्टीने सामदामादी उपाय, षाड्गुण्य, मंत्रशक्तीचे (statecraft) महत्व इ. अनेक बाबतीत आज आपल्याला शिकण्यासारखे पुष्कळ आहे. इतिहास हा एक श्रेष्ठ शिक्षक आहे. बदलत्या परिस्थितिनुरूप त्याच्या अनुभवसिद्ध ज्ञानाचे आचरण करण्यात राष्ट्रोद्धार आहे.

• • •

# ग्रंथालय कायदे आणि सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास-
# काही वस्तुस्थितींचे निर्देशन

**प्रा. मोहन पाठक**

*( नोव्हेंबर महिन्यात १४ ते २० नोव्हेंबर राष्ट्रीय ग्रंथ सप्ताह आपल्या देशात साजरा केला जातो. त्या निमित्ताने सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाच्या दृष्टीने विद्यमान ग्रंथालयकायद्यांच्या माहितीसह लिहिलेला लेख येथे देत आहोत.)*

सार्वजनिक ग्रंथालयांची समजण्यास सोपी अशी व्याख्या म्हणजे 'जे ग्रंथालय सर्व जनतेच्या वापरासाठी सहजपणे उपलब्ध असते ते ग्रंथालय होय' अशी करता येईल. आपल्या सार्वजनिक जीवनात सार्वजनिक संस्थांकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कधीच बरोबर नव्हता. त्यामुळे सार्वजनिक संस्थाचा इतिहास असूनही या कामांकडे पाहण्याची आपली वृत्ती औदासीन्याने भरलेली असते. ग्रंथालयांचा विचार करू जाता १९७२ साली युनेस्कोने प्रसिद्ध केलेल्या व नंतर पुनरावृत्ती निघालेल्या जाहीरनाम्यामध्ये स्पष्टपणे सूचित केल्यानुसार ग्रंथालयांची निर्मिती, वाढ व संवर्धन याला कायद्याने संरक्षण देण्यात आले पाहिजे तरच सार्वजनिक ग्रंथालयांचा सर्वांगीण विकास शक्य होईल. सार्वजनिक ग्रंथालये निर्माण करणे, त्यांचे संवर्धन करणे ही प्रामुख्याने शासन व स्थानिक संस्थांची जबाबदारी असते. या ग्रंथालयांचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे या ग्रंथालयातील प्रवेश हा जात, धर्म, पंथ तसेच वय, वर्ण व लिंग यांच्या निरपेक्ष असतो, तसा तो असणे अपेक्षित असते.

आपल्या देशाच्या संदर्भात सार्वजनिक ग्रंथालयांची अवस्था, या विषयाबाबत असणारी कमालीची अनास्था व एकूण सर्व समाजाची उदासीन वृत्ती यामुळे सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास करणे ही जबाबदारी आहे असे वाटतच नाही. डॉ. एस्.आर्. रंगनाथन यांचे ग्रंथालय क्षेत्रातील एकूणच कार्य मूलभूत स्वरूपाचे व दूरदृष्टी ठेवून केलेले आहे. १९३० साली त्यांनी सार्वजनिक ग्रंथालयांसाठीच्या कायद्याचा केलेला मसुदा ही याच दृष्टीने महत्त्वाची कामगिरी आहे. १९२४ मध्ये लंडन येथे भरलेल्या एका ग्रामीण ग्रंथालयांच्या परिषदेमध्ये या विषयावर झालेले प्रकट चिंतन डॉ. रंगनाथन यांनी अनुभवलेले होते त्यांच्या मनातील विचारांना व त्यांच्या अभ्यासाला चालना देण्याच्या दृष्टीने त्यांचा हा अनुभव महत्त्वाचा होता. स्वातंत्र्यपूर्वकाळात ग्रंथालयकायद्याच्या दृष्टीने काही वाटचाल, काही प्रयत्न झाले हे मान्य करूनही ग्रंथालयकायदा अस्तित्वात येऊन त्याची अंमलबजावणी झाली ती मात्र स्वातंत्र्योत्तर काळातच. महाराष्ट्रापुरते बोलावयाचे झाल्यास केणी समितीचा अहवाल, एस्.के. बोले, एम्.व्ही. दोंदे इत्यादींची नावे निश्चितच महत्त्वाची आहेत. परंतु १९४७ नंतर डॉ. एस्.आर्. रंगनाथन यांना जेव्हा परिस्थितीची अनुकूलता जाणवली तेव्हा तत्कालीन मद्रास राज्याचे शिक्षणमंत्री (टी.एन्. अविनासलिंगम चेट्टियार) व शिक्षणमंत्रालयाच्या साहाय्याने मद्रास राज्यात भारतातील पहिला ग्रंथालयकायदा अस्तित्वात येईल या दिशेने खूप प्रयत्न केले. परिणामस्वरूपी डॉ. रंगनाथन यांच्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होऊन ४८-४९ या वर्षात पहिला सार्वजनिक ग्रंथालय कायदा अस्तित्वात आला.

आजच्या संदर्भात जेव्हा आपण विचार करू जातो तेव्हा सार्वजनिक ग्रंथालयांना कायद्याचे संरक्षण देणारी, म्हणजेच ज्या राज्यात ग्रंथालय कायदा अस्तित्वात आहे अशी फक्त दहा राज्ये आहेत. याचाच अर्थ १६ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशांत शतक संपत आले तरी ग्रंथालय कायद्याचा मागमूसही नाही. ज्या राज्यांत हा कायदा अस्तित्वात आहे ती राज्ये व अंमलबजावणी सुरू झाले ते वर्ष पुढील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | मद्रास (तामिळनाडू) | १९४८ |
| २) | आंध्रप्रदेश | १९६० |

| | | |
|---|---|---|
| ३) | कर्नाटक | १९६५ |
| ४) | महाराष्ट्र | १९६७ |
| ५) | प.बंगाल | १९७९ |
| ६) | मणिपूर | १९८८ |
| ७) | केरळ | १९८९ |
| ८) | हरियाणा | १९८९ |
| ९) | मिझोराम | १९८९ |
| १०) | गोवा | १९९४ |

१९९१ साली देशात जी शिरगणती झाली तिच्या आकडेवारीवरून नजर फिरवली तर असे दिसते की १६ राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेशांतील या कायद्याला वंचित असणारी जनसंख्या ४८३,६५३,८८१ झाली आहे. तर दहा राज्यांतील जनसंख्या ३६२,५९८,८०७ इतकी आहे. विशेष म्हणजे मध्यप्रदेशासारखे आकाराने मोठे असणारे राज्य व उत्तरप्रदेश राज्यासारखे जनसंख्या अधिक असणारे (१३९,११२,२८७) अजूनही कायद्यापासून मिळणाऱ्या लाभांना वंचित आहे.

## ग्रंथालयांच्या जाळ्याच्या दृष्टीने

युनोस्कोच्या ज्या जाहीरनाम्याचा वर उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यानुसार सर्वच राज्यांमध्ये सार्वजनिक ग्रंथालयांच्या अभिवृद्धीकरिता कायद्याची अंमलबजावणी केली जाणे अत्यंत आवश्यक आहे. आपल्या देशात सार्वजनिक ग्रंथालये हा विषय राज्य सरकारांच्या अखत्यारीत येणारा आहे. त्यामुळे विद्यमान असणाऱ्या ग्रंथालय कायद्यांत कोणतीही सुसूत्रता आपल्याला आढळत नाही. सर्व राज्यांमध्ये कायदा लागू होणे व त्यात सूत्रबद्धता असणे यासाठी राज्य शासनाच्या अखत्यारीत जाणे हा एक पर्याय आहे किंवा राज्य सरकारांवर सूत्रबद्धतेच्या दृष्टिने केंद्राचे नियंत्रण असणे हे तरी आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतरच्या ५०वर्षांनंतरही काही राज्यांत कायदा असतो, काहींमध्ये नावाला कायदा असतो तर बहुतेक राज्यांत कायदाच नसतो हे काही भूषणावह चित्र नाही. यासाठी ग्रंथालये ही आमच्या प्राधान्यक्रमांच्या यादीत असणे, त्या दृष्टीने वेळप्रसंगी घटना दुरुस्तीची गरज वाटल्यास ती करणे महत्त्वाचे आहे.

याची गरज काय असा प्रश्न पडल्यास एकीकडे माहिती तंत्रज्ञानात होणारा विकास, माहिती या घटकाचे मानवी जीवनात वाढत चाललेले महत्व व सार्वजनिक ग्रंथालयांतून दिल्या जाणाऱ्या पारंपरिक व माहिती सेवांचा दर्जा यामधील तफावत पाहिली तर उत्तर स्पष्ट आहे. माहितीशिवाय समाजातील कोणताही घटक कोणतेही काम करू शकत नाही असे असताना माहिती उपलब्धतेमध्ये अडसर निर्माण होणे हे प्रगतीचे लक्षण नाही. यासाठी देशामधील सर्व जिल्हास्तरीय ग्रंथालये संगणकांच्या साहाय्याने जोडण्याचे महत्त्वाकांक्षी काम शासनाला करावे लागेल. यातील खर्चाचा भाग मान्य करूनही पुढील शतकातील विकासाच्या स्वप्नांना दिशापूर्ण आकार द्यावयाचा असेल तर या खर्चाला पर्याय नाही. INFLIBNETया अजूनही परिपूर्ण न झालेल्या पण तत्त्व म्हणून आदर्श असणाऱ्या योजनेप्रमाणेच सार्वजनिक ग्रंथालयांचे आधुनिकीकरण व जाळे निर्माण करण्याची योजना टप्प्यांमध्ये विभागून कार्यान्वित करण्यात आली पाहिजे. जिल्हा ग्रंथालये जोडण्याचे काम पूर्ण झाल्यावर पुढील टप्प्यात तालुका स्तरावरील ग्रंथालये व त्यापुढील टप्प्यात ग्रामीण ग्रंथालये या जाळ्याने जोडली गेली तर माहिती उपलब्ध करून देणे अधिक सुलभ होईल.

## पैसा ही अडचण

आधुनिकीकरणाचा कोणताही विचार अमलात आणावयाचा म्हटले की 'आर्थिक तरतुदीचा अभाव' हे कारण कोणत्याही कल्याणकारी योजनेच्या बट्ट्याबोळ करण्यास आपल्याकडे कारणीभूत ठरते. ही अडचण दूर करावयाची असल्यास केंद्र व राज्य शासनांनी आपले प्राधान्यक्रम तपासून पाहिले पाहिजेत. कारण लोकशाहीने नागरिकांना प्रदान केलेल्या मूलभूत हक्कांमध्ये माहिती मिळणे, माहिती मिळविणे हा मूलभूत हक्क आहे. शासनाच्या स्वतःच्या कितीतरी चांगल्या योजना असतात पण लाल फितीच्या कारभारापद्धतीमुळे व शासनाची माहिती व जनसंपर्क कार्यालये अस्तित्वात असूनही चांगल्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. लक्षावधी रुपये छपाईवर खर्च करूनही माहिती साधने वाया

(पान क्र. ३७ वर)

# मला आवडलेले पुस्तक

श्री. रवींद्र मांजरेकर

पु.लं नी म्हटल्याप्रमाणे ऐकत रहावेसे वाटते ते चांगले गाणे, पाहत रहावेसे वाटते ते चांगले नाटक आणि वाचत रहावेसे वाटते ते चांगले पुस्तक. किंवहुना -हाती धरल्यावर जे सोडवत नाही ते पुस्तक चांगले. अशी चांगल्या पुस्तकांच्या बाबतीत माझी व्याख्या. 'आपण सारे अर्जुन' ह्या पुस्तकाने माझी ही व्याख्या सार्थ ठरवली.

गेल्या वर्षीची गोष्ट आहे. गुढीपाडव्याचा दिवस होता. आदल्याच दिवशी माझी F.Y.B.A. ची परीक्षा संपली होती. परीक्षा झाल्यानंतर लगेच काहीतरी नवीन वाचण्याचा माझा नियम आहे. त्याप्रमाणे वाचायला काही शोधत असताना नुकतेच घरात आणलेले 'आपण सारे अर्जुन' हे पुस्तक मिळाले. वास्तविक पु.लं चे एखादे पुस्तक वाचावे हा माझा नियम आहे. त्यात व.पु.काळे यांचे लेखन मला फारसे वाचावेसे वाटत नाही. त्या दिवशी मात्र माझा अगदीच नाइलाज झाला आणि मी हेच पुस्तक वाचायचे ठरवले. गेल्या अनेक वर्षांची परंपरा मोडताना माझ्या भारतीय मनात थोडी चलबिचल झालीच. पण मग वाचायला सुरुवात केली. प्रथम अर्पणपत्रिका वाचली आणि मग मात्र एका बैठकीत पुस्तक वाचून पूर्ण केलं. शितावरून भाताची परीक्षा करतात ती अशी.

व.पुं बद्दल माझे मन पूर्वग्रहाने काठोकाठ भरलेले होते. यापूर्वी त्यांची 'पार्टनर' ही मी वाचलेली एकमेव साहित्यकृती, त्यांची सुभाषितवजा वाक्ये, ठराविक विचारशैली यामुळे असेल, पण का कुणास ठाऊक आणखी वाचावेसे वाटलेच नाही.

वाचकहो, मी पु.ल.प्रेमी आहे. भक्त म्हटले तरी चालेल. (पु.लं ना ते आवडणार नाही. कारण ते म्हणतात तुम्ही माझे भक्त झालात, मला परमेश्वर व्हावे लागेल आणि ती जबाबदारी माझ्या खांद्यांना पेलणार नाही. असो) माझं वाचन त्यामुळे कदाचित १ रूपाली, ७७७ डेक्कन जिमखाना, शिवाजीनगर, पुणे-४ या पलिकडे गेले नाही. पु.लं च्या प्रत्येक वाक्याने माझी मानसिकता घडवली आहे. माझे वाचन त्यामुळे कदाचित एकांगी आणि माझी प्रवृत्ती संकुचित असेलही-पण 'आपण सारे अर्जुन' वाचले आणि वाटले-काहीतरी चुकतंय आपण आपला दृष्टिकोन व्यापक करायला हवा. खूप विचार करायला लावले या पुस्तकाने-अस्वस्थ करून टाकले. आपण रोज जे अनुभवतो त्याचेच प्रतिबिंब साहित्यात उमटले की जीवनविषयक दृष्टिकोन अधिक प्रगल्भ होतो. या पुस्तकाने नेमके हेच साध्य केले आणि म्हणूनच मला हे पुस्तक आवडले.

पुस्तकातील काही विचारांच्या आधाराने, हे पुस्तक मला का आवडले याचे विवेचन यापुढे करणारच आहे. पण तत्पूर्वी याविषयी थोडेसे व्यासंगी चिकित्सक लिहायचे तर असे लिहिता येईल-कोणत्याही अधांतरी पोकळीत पुस्तकनिर्मिती होत नाही. जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन देणे हे पुस्तकाचे प्रथम कर्तव्य आहे. ती समाजाशी संबंधित कलाकृती आहे, आणि म्हणूनच जीवनातील अनुभवांची ती मालिका आहे. कारण जीवनाशी सहित म्हणजे बरोबर जात आहे ते साहित्य होय. जो संबंध फुलाचा सुगंधाशी, पाण्याचा तरंगांशी आणि मोराचा पिसाऱ्याशी तोच संबंध जीवनाचा साहित्याशी आणि साहित्याचा पुस्तकांशी. जोपर्यंत पुस्तके व्यक्तीच्या अंतरंगाशी समरस होत नाहीत तोपर्यंत त्या कलाकृतीला पूर्णत्व येत नाही. कलात्मक अनुभवाने जीवन समृद्ध करण्याचे सामर्थ्य पुस्तकात असावे लागते- ते या पुस्तकात आहे. मला वाटते इतका व्यासंग पुरे झाला.

खरे तर,

श्वासाइतकं सहजपणे जेव्हा लिहिता येतं
शब्दातून तेव्हाच हृदय खोलता येतं

या मंगेश पाडगावकरांच्या रचनेवर माझा विश्वास आहे. त्यामुळे माझे यापुढचे लिखण मी तोच सल्ला लक्षात ठेवून करणार आहे.

लग्न, नाते, शत्रुत्व, त्याग, षड्रिपू, अर्थयुद्ध, धर्मयुद्ध या सान्यांच्या परस्पर सहयोगाने आयुष्याची ही अज्ञातयात्रा सुरू आहे. व.पुं चे हे लिखाण याच अज्ञाताचा शोध घेणारे आहे. महाभारतातला माणूस आणि माणसाचे महाभारत ही या यात्रेतील दोन महत्वाची स्थानके -

माणूस ही परमेश्वराची सर्वोत्कृष्ट निर्मिती आहे. माणूस म्हणजे दुसरा किंवा समोर येणारा कोणताही माणूस नव्हे-माणूस म्हणजे आपण स्वतः. स्वतः तल्या माणसाचा विचार करणारे हे लिखाण आहे.

कॉम्प्यूटरचा जमाना आला असला तरीही षड्रिपूंनी घेरलेला माणूस बदलला आहे का ? भ्रष्टाचार, व्यभिचार, हिंसाचार, सत्तेसाठी पक्षबदल, टोळीयुद्ध हेही कमी नाही. उलट सगळे वाढत्या प्रमाणात आहे. महाभारत हे काल्पनिक मानले तरी आता महाभारतापेक्षा काय वेगळे चालले आहे ? म्हणूनच व्यासांची प्रतिभानिर्मिती ही केवळ प्रतिभाच नाही तर त्रिकालाबाधित सत्य आहे.

कौरव, पांडव यांच्यातील अवस्था झाली तीच आज आपलीही झाली आहे. नीती-अनीती, धर्म-अधर्म, योग्य-अयोग्य, चांगला-वाईट या सान्यांबद्दल आपण संभ्रमावस्थेत आहोत. माणूस म्हणून आपलं अस्तित्वच संभ्रमित झाले आहे. ह्या सूत्राभोवती हे सारे लेखन गुंफलेले आहे.

माणसातल्या माणूसपणाचा शोध घेणे आवश्यकच आहे. नाही तर केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे 'नरेचि केला हीन किती नर !' हे तर आपण पदोपदी अनुभवतोच आहोत. फार दूर नको जायला. रोजच्या व्यवहारातील उदाहरणे असतात. 'कुटुंब' हा आपल्या समाजव्यवस्थेचा पाया आहे, पतीकडून पत्नीचा छळ ही नित्याची गोष्ट आहे, अलिकडे पत्नीही पतीचा छळ करते अशा घटना उजेडात येत आहेत. संसारात 'शुभविवाह' इथेच आम्ही थांबलो, शुभ संसाराशी कोणालाच कर्तव्य नाही. संघर्षात दोघांपैकी एकाने अरेरावी वाढवयाची आणि दुसऱ्याने सहनशक्ती. एक फार जुनी संपन्न संस्कृती इथे आहे. पण आजघडीला त्याचा विचारच होत नाही. एकीकडे पैशाला पैसा ओढतो या नियमाने धनाढ्य झालेली माणसे आणि दुसरीकडे जगण्याच्या मूलभूत गरजांपैकी साधे अन्नही वाट्याला न येणारी माणसे. एका विनाशाची बीजे पेरणारेही आपणच आहोत अशा द्विधा मनस्थितीत सापडलेला महाभारतातला अर्जुनच तुमच्या-माझ्या सगळ्यांचे प्रतीक आहे. तणाव हे त्याचे दुसरं नांव.

माणसातल्या संवेदनशीलतेला अनुत्तरित करणारी एक घटना नुकतीच घडली. जयवाला आशर ज्या रेल्वेच्या डब्यात होती त्यात आणखी तीन स्त्रिया होत्या. त्यांनी थोडा आरडाओरडा केला असता, साखळी ओढली असती तर कदाचित तिचे पाय वाचले असते -पण तसे झाले नाही. रोज घडणाऱ्या हिंसाचाराने, अत्याचाराने शेकडो हजारो लोक बळी जात असतात. पण तो प्रत्येक बळी एकटा असतो-या माणसांच्या गर्दीत देखील-खरयं-या जगात आपण एकटेच असतो. आपण जिला अनेक वर्षे ओळखतो असा दावा करतो तीच व्यक्ती एखाद्या क्षणी अशी वागते की त्या क्षणी ती अपरिचित वाटू लागते. असे अपेक्षाभंगाचे अनेक क्षण आपल्या वाट्याला येतात. वास्तविक हे अपेक्षाभंग दीपस्तंभ व्हायला हवेत-पण तसे घडत नाही. सगळे गोंधळलेले असतात. हे करू की ते ? हे बरोबर की ते, हे झाले साधे प्रश्न, त्याहीपेक्षा आपण परंपरेने किती जखडलेले असतो. पाप-पुण्य, नीती-अनीती, चारित्र्य, समाज, रूढी, संस्कार ह्या मालगाडीच्या न संपणाऱ्या प्रवासात आपण आपल्याला हवे ते आयुष्य हवे तसे जगतो का ? कशाच्या आधारावर आपण स्वतःला माणूस म्हणवून घ्यायचे ? हे असे प्रश्न या पुस्तकाने माझ्या मनात निर्माण केले.

एका जुन्या पडक्या इमारतीच्या निमित्ताने सगळ्या देशात अशांतता निर्माण करणे हा धर्म नव्हे; ते राजकारण- आणि तो तर मती गुंग करणारा विषय आहे. आमचे राजकारणी -माणसाच्या अस्तित्वासंदर्भातले प्रश्न सोडवायचे सोडून रेल्वे स्थानकांची नावे बदलणे, शहरांची नावे बदलणे अशा गोष्टी करण्यात गढून गेले आहेत - काय तर म्हणे-बोरीबंदराला छत्रपती शिवाजी टर्मिनस म्हणायचे-छत्रपतींची शिस्त आणि वेळेचे भान रेल्वेला पेलणार का ? हा विचारच नाही. राजकीय पातळीवरचे प्रश्न आपल्या आकलनाच्या पलिकडचे आहेत हेच खरे-हे सारे आहे, तरी राज्य- चालते -तुमच्या माझ्या सकट सगळा मध्यमवर्ग , नोकरवर्ग बातम्या वाचतो आणि गप्प बसतो. कारण याच यंत्रणेने प्रत्येक माणसाचे दैनंदिन आयुष्य इतके धकाधकीचे केले आहे की वैयक्तिक पातळीवरचे प्रश्न सोडवण्यातच त्याचा दिवस जातो.

संसार हे भावगीत आहे. जो सूर गोड वाटेल त्याचा स्वीकार व्हावा. भगवद्‌गीता हे भगवंताचे गीत आहे. तर्कापेक्षा भक्तीनेच त्याचे स्वागत करायचे पण अर्जुन जसा तर्कावर तर्क करीत राहिला तेच आपणही आयुष्यभर करतो आहोत. हा या पुस्तकाचा गाभा आहे.

व.पूं.चे विचार ठिकठिकाणी स्वानुभवांची व्यवस्थित पेरणी केल्यामुळे अधिक परिपक्व आणि थेट हृदयालाच हात घालणारे आहेत. 'अनुभव' हाच जगातला सर्वश्रेष्ठ शिक्षक आहे याची प्रचिती हे पुस्तक वाचताना येते. कोणतीही निर्णयक्षमता विकसित न करू शकणाऱ्या शिक्षणपद्धतीमुळेच समजात जगत असताना प्रत्येक जण अगतिक झालेला आहे. संध्याकाळच्या वेळेला मुंबईच्या एखाद्या उंच इमारतीवर उभे राहून पाहिले तर धो-धो माणसे वाहताना दिसतात. हे वाहणे त्यांच्या हातात नसतं-ती कळसुत्री बाहुली असतात. असे अगतिकतेचे विविध चेहरे आपण अनेकांच्या डोळ्यांत पहात असतो. ती अगतिकता कधी यांत्रिक असते तर कधी मानसिकही. वपूंनी नेमके याच अगतिकतेवर बोट ठेवले आहे. त्यात भारतीय समाज दैववादी-नशिबावर प्रचंड भरवसा असलेला. ही अगतिकता हेच आपलं नशीब मानून जगण्याची सवय हेच आपल्या जीवनाचे व्यवच्छेदक लक्षण झाले आहे. म्हणून व.पूं चे हे लिखाण पटते कारण त्यांनी हेच वास्तव चितारले आहे.

आजचे चित्र हे बदलत्या समाजाचे चित्र आहे. प्रत्येक क्षेत्रातील व्यक्ती संभ्रमात आहे. मी जे काम करतो आहे ते बरोबर की चूक असा सवाल प्रत्येकाच्या मनात आहे. दुर्दैवाने आपला देश हा अमेरिका, युरोप येथे वास्तव्य असणाऱ्यांच्या आईबापांनी चालवलेला आहे त्यामुळे आपल्याकडे प्रगतीही उमलून न येता एखाद्या रोपट्यावर कलम करावे किंवा चेहऱ्यावर सर्जरी करावी तशी होत आहे. त्याचे परिणाम गंभीरच होत असतात.

अर्थात्, या साऱ्या विवेचनात निराशा आहे, पण ती सार्वत्रिक होत नाही. कारण त्या निराशेचा आविष्कार हा Kafka च्या Castle सारखा किंवा भालचंद्र नेमाड्यांच्या 'कोसला' सारखा आहे की ज्यामुळे निराशा येते पण त्याची चीडही येते. मग त्यातून बाहेर पडण्याची धडपड सुरू होते. ही ताकद ह्या निराशेत आहे आणि म्हणून मी या पुस्तकाच्या प्रेमात आहे.

शेवटी असे आहे, माणसातल्या माणूसपणाची जाणीव महत्त्वाची. कुटुंब, समाज, धर्म, देश, त्याग ह्या साऱ्या संकल्पना आहेत. संपूर्ण व्यक्तित्व हेच केवळ वास्तव आहे. हा विचार आणि व्यक्तित्वाविषयीची अनुभूती ह्याच पुस्तकाने मला दिली. संकुचितपणा सोडून सभोवताली घडणाऱ्या घटनेकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहण्याची शिकवण या पुस्तकाने मला दिली. आणि म्हणून हे पुस्तक मला आवडले.

एखाद्या पुस्तकाने संमोहन टाकल्यामुळे वाचताना भोवतालचे भान विसरून त्यात गुंतून जाणे हा अनुभव निराळाच. तो शब्दात पूर्णपणे उतरवणे मला जमणारच नाही. मला हा अनुभव व.पुं. चे 'आपण सारे अर्जुन' वाचताना मिळाला. साहित्यातील अभिव्यक्ती

ज्या वेळी जाणिवेच्या कक्षा रुंदावून विचार व अनुभवांचा सुंदर प्रवाहाच्या संगमातून वाहत असतो त्याच वेळी हा अनुभव येत असावा.

कलेचा आस्वाद घेताना मी त्या निर्मितीचा अखंडपणे आस्वाद घेतला. निर्मितीतले सगळेच घटक सारख्याच प्रमाणात मला भावले असे नाही. पण ही कलाकृती अविघटित, एकसंध स्वरूपात मला भावली. तिचा मी आनंद घेतला. इतरांनीही तो घ्यावा ह्या उत्साहाने त्या अनुभवांबद्दल हे थोडेफार लिहिले. गाण्यातल्या एखाद्या जागेला दाद दिल्यानंतर ती दाद का दिली असे कोणी विचारले तर माझ्यापाशी त्याचे उत्तर नाही.

व.पुं नी जीवनातल्या अनुभवांचे विचारांच्या सान्निध्यातले क्षण सुरेख टिपले आहेत. माणसाच्या आयुष्याची अज्ञानयात्रा शोधण्यातून एक उत्कृष्ट कलाकृती मराठीला मिळाली. त्याच आनंदात या पुस्तकाची वाचनयात्रा इतरांनाही घडावी असे मनापासून वाटते. शेवटी वाचकांशी जमावा लागतो तो असा स्नेह !

अनेक व्यर्थ समजुतींचा स्वतःच्या स्वार्थासाठी वापर करून आजच्या काळात 'आपण सारे अर्जुन' ने विचारांना-अनुभूतीला जे स्थान दिले त्याबद्दल कृतज्ञताच व्यक्त करायला हवी, हे केवढे मोठे काम आहे याची कल्पनाच येत नाही, तसला काही आव नाही. हेच या पुस्तकाचे मोठेपण आहे.

• • •

(पान क्र. ३३ वरून)

## ग्रंथालय कायदे आणि सार्वजनिक ग्रंथालयांचा विकास- काही वस्तुस्थितीचे निर्देशन

घालविली जातात. त्या ऐवजी ही यंत्रणा व यावर होणारा पैशाचा खर्च अधिकसत्कारणीलागणे सहज शक्य आहे.

शासनावर, शासनपद्धतीवर टीका करणे सोपे व कित्येकदा सोईचेही असते हे खरे आहे. पण आजच्या काळातील ज्ञानक्षेत्रांचा विकास व माहितीचे आयोजन यांची गरज लक्षात घेता राष्ट्रीय स्तरावर ग्रंथालयांबद्दल असणारी उदासीनता झटकणे, सामूहिक इच्छाशक्तीची इच्छा धरणे हे राष्ट्र म्हणून टिकण्यास आवश्यक आहे. आज माहिती निर्मिती व प्रसार यांचा वेग इतका अवाक् करणारा आहे की माहितीच्या उपभोक्त्याला माहितीपर्यंत पोहोचणेही अवघड होऊन बसत आहे. अशा वेळी ई.मेल, हॉटमेल इत्यादि सुविधांचे ज्ञानही आवश्यक आहे. सार्वजनिक ग्रंथालयांनीही आपल्या सेवांच्या कक्षा वाढवीत राहणे गरजेचे आहे. यासाठी पैसा ही अडचण सांगणे वस्तुस्थितीचे निर्देशन आहे.

### पुढील युग-वाचनसंपन्न राष्ट्रांचे

जे राष्ट्र अधिक वाचते, माहितीसंपन्न होते ते जगाचे नेतृत्व करते ही वस्तुस्थिती आहे, इतिहाससिद्ध गोष्ट आहे. ज्या सुवर्ण युगातील भारताची आठवण अजूनही आम्हाला सुखावते त्या युगात भारताने सर्वच ज्ञानक्षेत्रांमध्ये केलेली प्रगती हे वाचनसंपन्नतेचे, ज्ञानसंपन्नतेचेच द्योतक होते. परंतु नंतरच्या काळातील औदासीन्य व त्या पार्श्वभूमीवर पाश्चात्य जगातील वाचनसंपन्न जगाने आपल्याकडे ओढून घेतलेले नेतृत्व यांचा विचार करता आपल्या देशाने अधिकाधिक वाचन व माहिती यांनी संपन्न होण्याची गरज आहे हे सिद्ध होते. अजूनही आमच्या देशात शिक्षणाच्या पद्धतीत स्पष्टता नाही, अजूनही अमूक टक्के लोक निरक्षर आहेत याची नोंद करावी लागते, याचा अर्थ देश म्हणून, राष्ट्र म्हणून आम्ही काय असणार आहोत या विचाराने अस्वस्थ व्हावे अशीच स्थिती आहे.

म्हणूनच सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकासाच्या भविष्यातील दिशा योजनापूर्वक पद्धतीने स्पष्ट करून घेतल्या पाहिजेत. त्यासाठी ग्रंथालय कायद्याला दुसरा पर्याय नाही.

• • •

# दिवाळीची सुट्टी-लागलीही आणि संपलीही !

प्रा. मोहन पाठक

महाविद्यालयांच्या परिसरातील दिवाळीच्या कालावधीमधील दिवस हे तसे शांत असणारे. पण यंदा दिवाळी संपली आणि विविध परीक्षांची वेळापत्रकं घड्याळाच्या काट्यानुसार अमलात येऊ लागली. कोणाची टर्मिनल तर कोणाची केटी किंवा युनिव्हर्सिटी ! ऑगष्ट -सप्टेंबर मधील संपाच्या काळातील दिवस भरून देण्यासाठी प्राध्यापकांची वर्दळही सुरू झाली.

दरम्यान आमच्या कलावाणिज्य महाविद्यालयात व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालयामध्ये संगणकाचे आगमन झाले. गेले दोन महिने डेटा एण्ट्री शीट्स् बनविण्याचे काम चालू आहे. त्या शीट्स् मधील डेटा लवकरच संगणकाच्या मेमरीत साठविला जाईल.दिवाळीची सुटी लागण्यापूर्वीच ज्या काही लहान मोठ्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्यात आमच्या विज्ञान आणि कला वाणिज्य महाविद्यालयात विजयादशमीनिमित्ताने ग्रंथालयामध्ये सरस्वतीपूजन झाले.सरस्वतीपूजनात आमच्या ग्रंथालयातील सर्व सहकाऱ्यांचा सहभाग असतो.आराध्यदेवता असणाऱ्या सरस्वतीचे मनोभावे पूजन हा आमच्या ग्रंथालयाचा अनेक वर्षांचा प्रघात.

**बांदोडकर विज्ञान महाविद्यायालय**

प्रतिवर्षाप्रमाणे 'संयुजा' या वार्षिक अंकाच्या तयारीस सुरुवात झाली. प्रा. सौ. एस्.एन्.जोगळेकर (गणित विभाग) या संयुजा समितीच्या यंदाच्या प्रमुख आहेत. यंदाचा अंक कसा असावा यासंबंधी झालेल्या समितीच्या सभेत विद्यार्थ्यांशी संवाद साधला गेला. विद्यार्थ्यांनी कांदा या विषयावर एक सुरेख भित्तिपत्रिकाही तयार केली. विशेष म्हणजे सध्याचा ज्वलंत व जनसामान्यांच्या जीवनाशी निगडित असणारा हा प्रश्न विद्यार्थ्यांनी कांद्याच्या आकाराच्या कागदावरच मांडला.

**कला वाणिज्य महाविद्यालय**

जोशी बेडेकर महाविद्यालयामध्ये असणाऱ्या 'ओअॅसिस' या निसर्गमंडळाच्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या सर्पप्रदर्शनास उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला.

सर्पतज्ञ श्री. कैलास दारोळे प्रमुख अतिथी तर प्राचार्य सदाशिव गोखले, कला विभागाचे उपप्राचार्य वडगुजर, वाणिज्य विभागाच्या उपप्राचार्या सौ. दोशी, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या सौ. गीता पिंगे आदी मान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते. या कार्यक्रमात श्री. दारोळे यांनी, सर्प चावल्यास करावयाचे प्रथमोचार , बिनविषारी साप ओळखण्याच्या खुणा इ. बद्दल उपयुक्त माहिती सांगितली. पारदर्शिकांचा उपयोग करून व प्रत्यक्ष सर्प हाताळण्यास देऊन, सामान्यांच्या मनात असणाऱ्या अनेक शंकांचे त्यांनी निरसन केले. अरवी नगरवाला या विद्यार्थिनीने त्यांचा परिचय करून दिला. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश खराडे याने केले. पूनम परब हिने आभारप्रदर्शन केले. प्रत्यक्ष साप पहायला मिळणे, हाताळता येणे यामुळे कार्यक्रमास खूपच गर्दी झाली होती.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. सौ. राधा नटराजन, प्रा.अनिल ढवळे, प्रा. रीटा अलेक्झांडर, प्रा. सुप्रिया घोष यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली मंदार सावंत, ओझवाला लुर्डस, रेशमा लोबो, विशाल गजरे, मीनल लोणकर इ. विद्यार्थ्यांनी कष्ट घेतले. सदर कार्यक्रम ३० सप्टेंबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृहात दोन गटात घेण्यात आला, अशी माहिती निसर्गमंडळप्रमुख प्रा. राधा नटराजन यांनी दिली.



सर्पप्रदर्शनातील एक दृश्य

### विशेष व्याख्याने


तृतीय वर्ष कला शाखेतील मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमपूरक अशा विशेष व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. 'साहित्य आणि समाज' या विषयासाठी मुंबई विद्यापीठाचे माजी मराठी विभागप्रमुख गुरुवर्य प्रा. केशव मेश्राम, 'काव्यशास्त्र' विषयासाठी कीर्ती महाविद्यालयातील मराठी विभागाचे निवृत्त विभाग प्रमुख प्रा. सुभाष सोमण तर 'लेखकाचा अभ्यास' या विषयासाठी महर्षी दयानंद महाविद्यालयातील प्रा.सौ. मांजरेकर यांनी मार्गदर्शन केले. मराठी विभागातील प्रमुख प्रा. दामोदर मोरे यांनी पाहुण्या व्याख्यात्यांचा परिचय करून दिला.

### विद्यार्थिनींसाठी

विवाहपूर्व जीवनातील समस्या व विवाहविषयक मार्गदर्शन यांची गरज साधारण १७ ते २१ वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांना प्रकर्षाने असते. अशा मार्गदर्शनाचा एक कार्यक्रम ९ व १० ऑक्टोबर ९८ रोजी आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य सदाशिव गोखले यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी मार्गदर्शनासाठी अनुराधा जोगळेकर, ज्योती म्हापसेकर, ललिता महाजन, स्मिता कर्वे आदी तज्ज्ञ उपस्थित होते.

### एक सुन्न करणारी बातमी

दिवाळी झाली. एकूणच समाजपरिस्थिती, लांबलेला पाऊस यात दिवाळी असे जाणवलेच नाही. पुन्हा महाविद्यालये सुरू झाली. आणि एस्.बी. वझे गेल्याची बातमी समजली. मी विद्यार्थी होतो त्याच दरम्यान वझे सर महविद्यालयात लागले तेव्हापासून मी सरांना पाहत होतो. गणित या विषयाचा संबंध नव्हता म्हणून, नाही तर सरांच्या वर्गात शिकण्याची संधीही मिळाली असती. कलावाणिज्य महाविद्यालयात गणित विभागात ७३ सालापासून अध्यापन करणारे वझे सर अतिशय शांत, मितभाषी स्वभावाचे होते. काम हाती घेतले की त्याला वाहून घेणे; कार्यक्षमतेने ते पूर्ण करणे ही त्यांच्या कामाची रीत होती.



कै. एस्.बी. वझे

अवघ्या पन्नासाव्या वर्षी सर आमच्यातून निघून जावेत हा दैवदुर्विलास आहे. २५ वर्षांच्या अध्यापकीय जीवनात त्यांनी कित्येक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सर्व ज्ञात अज्ञात विद्यार्थ्यांच्या वतीने, आमच्या परिसराच्या वतीने, सरांच्या आत्म्यास शांती लाभो अशी प्रार्थना करून त्यांना 'दिशा' तर्फे श्रद्धांजली!

### वक्तृत्वस्पर्धा

एरोनॉटिकल सोसायटी ऑफ इंडियाच्या मुंबई शाखेतर्फे आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. एयरोस्पेस इंजिनियरिंगच्या आय.आय.टी. मधील विभागाने घेतलेल्या या स्पर्धेत आमच्या वाणिज्य महाविद्यालयातील तृतीय वर्षात शिकणाऱ्या वासुदेव देशपांडे याला विशेष प्रमाणपत्र

मिळाले.

**डॉ. बेडेकर विद्यामंदिर**

या आमच्या शाळेच्या माध्यमिक विभागातर्फे प्रकाशित होणारा पालक व शाळा यातील दुवा साधण्याचे काम करणारा 'सेतु' चा अंक हा एक विशेष उपक्रम १५ फेब्रुवारी ते १० ऑक्टोबर ९८ या कालखंडातील उपक्रमांची माहिती देणारा सेतूचा १२ पानी अंक अलिकडेच प्रकाशित झाला. शाळेत झालेले उल्लेखनीय कार्यक्रम, विद्यार्थ्यांचे यश, स्पर्धापरीक्षा इत्यादींची माहिती 'सेतु' मध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.

या अंकावरून, पर्यवेक्षिका सौ. विनिता आंबेडकर निवृत्त झाल्या व त्यांच्या जागी श्री. सुहास साठे यांची नेमणूक झाली असे समजते. या अंकातील इतरही बातम्या 'दिशा' मध्ये नोंदल्या जाणे गरजेचे होते. पण वेळोवेळी ती माहिती 'दिशा' स उपलब्ध झाली नाही त्यामुळे 'दिशा'त या माहितीचा समावेश केला गेलेला नाही. या अंकाचे संपादन शाळेचे माननीय मुख्याध्यापक श्री. अ.वि. सहस्त्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे. हा अंक खाजगी वितरणासाठी आहे

**त्याचा वेलू गेला...**

विद्याप्रसारक मंडळ या आमच्या मातृसंस्थेचा साठ वर्षांचा इतिहास दोन वर्षांपूर्वी 'वेलू गेला गगनावरी' या नावाने प्रकाशित करण्यात आला होता. विद्याप्रसारक मंडळाचे कार्यवाह श्री. अ.धों. टिल्लू यांनी लिखाण केले होते व मी संपादनाचे काम केले होते. साठ वर्षांच्या वाटचालीतील सर्व तपशिलांचा शोध घेणे, माहितीचे बारकाईने संकलन करणे हे अत्यंत जिकिरीचे काम श्री. टिल्लू सरांनी अथकपणे केले. या पुस्तकाचे प्रकाशन साहित्यिक रवींद्र पिंगे यांच्या हस्ते थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले होते.

या ग्रंथाची दुसरी आवृत्ती काढण्याचा निर्णय आमच्या मातृसंस्थेने अलिकडेच घेतला. संस्थेचा इतिहास व तोही शैक्षणिक संस्थेचा इतिहास मराठीत लिहिला जाणे ही अपवादात्मक बाब आहे. दुसरी आवृत्ती काढण्याच्या दृष्टीने हा इतिहास अद्ययावत् करण्याचे काम श्री. टिल्लू सर करीत आहेत. दरम्यान या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद करण्याचेही ठरले असून आमच्या विज्ञान महाविद्यालयातील प्रा. सौ. उषा तांबे यांचे सहकार्य या कामी होणार आहे.

**इंटरनेटवर वेबसाइट**

विद्याप्रसारक मंडळाच्या वेबसाईटचे काम चालू असून या वेबसाईटवर आता ग्रंथालयांची माहितीही लवकरच उपलब्ध होणार आहे. श्री. चेतन यांनी दिलेल्या माहितीनुसार ही वेबसाईट www.vpmthane.com या पत्त्यावर उपलब्ध आहे.

**तंत्रनिकेतन**

प्राचार्य मुजुमदार व उपप्राचार्य प्रा. नायक यांच्या अथक प्रयत्नांना यश येऊन ९८-९९ या वर्षापासून I.S. च्या ३० जागा अधिक वाढल्या या कामी मंडळाच्या कार्यकारी मंडळाचे बहुमोल सहकार्य लाभले.

२९ ऑक्टोबर रोजी भारती विद्यापीठाचे प्राचार्य एस्.एस्. इनामदार व मुंबईच्याच शासकीय तंत्रनिकेतनामधील इन्स्ट्रुमेंटेशन विभागाचे प्रमुख व्ही. आर.जाधव यांनी आपल्या तंत्रनिकेतनाची पाहणी करून दिलेल्या अहवालानुसार तंत्रनिकेतनात अर्धवेळ अभ्यासक्रमांची सुरुवात करण्यात येणार आहे. केमिकल, इन्स्ट्रुमेंटेशन या विषयांत हे अभ्यासक्रम सुरू करण्यात येतील.

• • •

# आमची प्रकाशने

❑ **स्तबक**
❑ मूल्य रु. ८५
**डॉ. मो. दि. पराडकर**
ISBN No. 81-900976-1-X

❑ **शोध अंधश्रद्धेचा**
❑ मूल्य रु. ५०
**डॉ. विजय बेडेकर**
ISBN No. 81-900976-3-6

❑ **शाकुंतल शैलीशास्त्रीय अभ्यास**
❑ मूल्य रु. २५०
**डॉ. वामन केशव लेले**
ISBN No. 81-900976-7-9

❑ **बोध अंधश्रद्धेचा**
❑ मूल्य रु. १५०
**विंग कमांडर शशिकांत ओक**

❑ **Sanskrit Outside India**
❑ Rs. 150
Papers read at a Seminar on 'Sanskrit Outside India' held at Thane in 1993
ISBN No. 81-900976-0-1

❑ **Historical Truths & Untruths Exposed**
❑ Rs. 25
by **Shri Jeevan Kulkarni**
ISBN No. 81-900976-2-8

❑ **Agriculture in Ancient India**
❑ Rs. 250
Papers presented at the Seminar held at Thane under the auspices of the Institute for Oriental Study, Thane in 1992.
ISBN No. 81-900976-4-4

❑ **British Policies & IndianCulture**
❑ Rs. 15
**By Dr. Vijay Bedekar**

❑ **Education in ancient India**
❑ Rs. 50
Papers presented at the Seminar held at Thane under the auspices of the Institute for Oriental Study, Thane in 1995.
ISBN No. 81-900976-6-0

❑ **Tajmahal ?**
❑ Rs. 15
A simple analysis of a great deception by
**Shri V.S. Godbole**

❑ **Riddles of Buddha & Ambedkar**
❑ Rs. 5
**By Shri V.N. Utpat**
translated by
**Shri S.K. Mutalik**

❑ **Jati, Varna & Genetics**
**By Dr. V.V. Bedekar & Dr. U.M. Vaidya**
A paper read at Seminar"Varnashrama Institutions in Ancient India" held at Thane in 1988 (Supplied free on request)

❑ **Tajmahal & The Great British Conspiracy**
❑ Rs. 250
**By V.S. Godbole**
Bedford, U.K.
ISBN No. 81-900976-5-2

**For Copies write to :-**

**Itihas Patrika Prakashan**
"Shivashakti", Dr. Bedekar Hospital,
Naupada, Thane- 400 602.
Maharashtra

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्थ जागा.

संपर्क

कार्यवाह,
विद्याप्रसारक मंडळ, ठाणे
दूरध्वनी : ५४२ ६२७०